




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, सोमवार १५ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# भारताने पाकिस्तानला ७ विकेट्सने हरवले

**कर्णधार सूर्यकुमार यादवने लगावला विजयी षटकार, कुलदीपने 3 विकेट्स घेतल्या**




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताने सूर्यकुमार यादवच्या विजयी षटकारासह पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला आहे. भारताच्या गोलंदाजांनी चांगली सुरूवात करत संघाच्या विजयाचा पाया रचला. तर फलंदाजीत टॉप-४ फलंदाजांनी शानदार फलंदाजी करत पाकिस्तानला सामन्यात पुनरागमन करण्याची संधी दिली नाही. पाकिस्तानने दिलेल्या १२८ धावांचं लक्ष्य भारताने १५.५ षटकांत गाठत ७ विकेट्सने विजय मिळवला.पाकिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पण हा निर्णय मात्र भारताच्या पथ्यावर पडला. पाकिस्तानच्या संघाला भारतीय गोलंदाजांनी फार (पान २ वर)

# राज्यभरात 'माझं कुंकू-माझा देश' आंदोलन

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईमध्ये भारत-पाकिस्तान हा सामना खेळला जाणार आहे. या सामन्यामुळे राज्यात आणि देशात राजकारण तापले आहे. पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय संघाने हा सामना खेळू नये, टीम इंडियाने या सामन्यावर बहिष्कार घालावा अशी मागणी होत आहे. या सामन्याविरुद्ध शिवसेना ठाकरे गटाकडून माझं कुंकू-माझा देश हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. राज्यात ठिकठिकाणी ठाकरे गटाकडून आंदोलन झाले. भारत विरुद्ध पाकिस्तान क्रिकेट सामन्याच्या पार्श्वभूमीवर आजचा हा सामना खेळणा-या भारतीय क्रिकेटपटूंना शिवसैनिक आणि जनता काळे फासणार असल्याचे वादग्रस्त विधान ठाकरे गटाचे अकोला जिल्ह्यातील आमदार नितीन देशमुख यांनी केले होते. माझा देश-माझं कुंकू या आंदोलनावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. यावेळी ठाकरे गटाच्या महिला कार्यकर्त्यांनी कुंकू आणि बांगड्यांची भेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना पाठवली. आंदोलनादरम्यान देशमुख यांनी केलेल्या वक्तव्याने नवा वाद निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मुंबई, पुणे यांसारख्या राज्यभरात ठिकठिकाणी शिवसेना ठाकरे गटाकडून माझा देश, माझं कुंकू हे आंदोलन सुरू आहे. कोल्हापूर, नाशिक, नांदेड, जळगाव, भिवंडी, यवतमाळ अशा अनेक ठिकाणी रोष व्यक्त केला जात आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात सौभाग्य गमावलेल्या माता-भगिनींचे अश्रू सुकले नसताना मोदी सरकारने पाकिस्तानशी क्रिकेटचा डाव मांडण्याचा (पान २ वर)




## पंतप्रधानांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रत्येक शाळेत निबंध आणि चित्रकला स्पर्धा

**मुंबई :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दि. १७ सप्टेंबर, २०२५ रोजी ७५ वा वाढदिवस आहे. या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यातील सर्व शाळांमध्ये निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. सर्वसाधारणपणे राष्ट्र प्रथम, आत्मनिर्भर भारत, स्वदेश, ऑपरेशन सिंदूर, पर्यावरण हे या स्पर्धांचे विषय असणार आहेत.



यामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना वाढीस लागेल असा विश्वास शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला आहे.तालुका आणि जिल्हास्तरावर आयोजित करण्यात येणा-या या निबंध व चित्रकला स्पर्धांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावरील विजेत्या स्पर्धकांना सन्मानपत्र/प्रमाणपत्र देउन गौरव करण्यात येणार आहे.

## मुंबईत आणखी एक कबुतरखाना

**मुंबई :** कबुतराखान्यांची राजधानी असलेल्या मुंबईत आणखी एका कबुतरखान्याची भर पडली आहे. राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढांनी रविवारी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील तीन मूर्ती जैन मंदिर येथे नव्या कबूतरखान्याचे उद्घाटन केले. त्यामुळे मुंबईतील कबुतरखान्यांची संख्या आता ५२ इतकी झाली आहे. मुंबईतील प्रत्येक वार्डमध्ये कबुतरखाना उभारला जावा, अशी इच्छाही यावेळी लोढांनी व्यक्त केली.मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की दिगंबर जैन समाजातर्फे ही जागा उपलब्ध केली आहे. त्यामध्ये आज आपण कबूतर खाण्याचे उद्घाटन केले. हा नॅशनल पार्कचा भाग आहे. नॅशनल पार्कमध्ये सर्व प्राणी वावर करत आहेत. तसेच पक्षी पण वावर करत आहेत. माझी अपेक्षा आहे की प्रत्येक वार्डमध्ये अधिकृत कबुतरखाने उभे करू. प्रत्येक ॲडमिनिस्ट्रेशन वार्डमध्ये हे कबुतरखाना उभारावेत. मुंबईमध्ये हा प्रॉब्लेम होता म्हणून आपण इथे सुरुवात केली आहे. मंगलप्रभात लोढा म्हणाले की मुंबईतील कबुतरखाने बंद होत असताना दिगंबर जैन समाज पुढे आला. त्यांच्या मालकीच्या जमिनीवर कबुतरखाना सुरू केला. राष्ट्रीय उद्यान परिसरात दिगंबर जैन समाजाची नउ एकर जमीन आहे. या ठिकाणी सर्व प्राणी-पक्षी मुक्तपणे संचार करू शकतात. मुंबई उच्च न्यायालयाच्या कबुतरखाने बंद करण्याच्या आदेशानंतर, त्यामध्ये कायदेशीर मार्ग काढून हा मुंबईतील पहिला कबुतरखाना सुरू केला याचा तुम्हाला नेहमीच अभिमान असेल.





## टीम इंडियाच्या विजयासाठी महाकाल मंदिरात पूजा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आशिया कप २०२५ मध्ये आज दुबईमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होत असतांना देशभरातील क्रिकेट चाहते विभागले गेले आहेत. कुठेतरी निषेध होत आहे, तर कुठे टीम इंडियाच्या विजयासाठी हवन पूजा केली जात आहे. २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर आणि ७ मे रोजी झालेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर दोन्ही देशांचे क्रिकेट संघ एकमेकांसमोर येण्याची ही पहिलीच वेळ आहे. टीम इंडियाच्या विजयासाठी महाकाल मंदिरात आज पूजा करण्यात आली तर महाराष्ट्रात शिवसेना उद्धव गटाच्या कार्यकर्त्यांनी टीव्ही फोडून निषेध केला. त्याच वेळी महिला कार्यकर्त्यांनी पंतप्रधानांना सिंदूर पाठवला आणि बीसीसीआयसाठी (पान २ वर)

## मराठा आरक्षण मिळत नसल्याने आंदोलकाने आयुष्य संपवले

**मुंबई/प्रतिनिधी :** बीड तालुक्यात एका ३९ वर्षीय व्यक्तीने मराठा आरक्षण मिळत नसल्याची खदखद व्यक्त करत विषारी औषध प्राशन केले होते. या व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मराठा आरक्षण मिळत नसल्याच्या उद्वासीनतेतून संतोष वळे यांनी आत्महत्या केल्याचे म्हटले जात आहे. बीडच्या आहेर धानोरा गावाचे संतोष वळे हे रहिवासी होते. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी करण्यात आलेल्या अनेक आंदोलनांमध्ये ते सहभागी झाले होते. आरक्षणाच्या मुद्यावरुन त्यांनी विषप्राशन केले होते.

## 99 वे मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विश्वास पाटील

**पुणे /प्रतिनिधी-** यंदाचे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साता-यात पार पडणार आहे. पुण्यात अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये पार पडलेल्या साहित्य महामंडळाच्या बैठकीवेळी सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेमध्ये साहित्य महामंडळाची बैठक पार पडली. या बैठकीला महामंडळाचे चारही घटक संस्थांचे तसेच संलग्न आणि समाविष्ट संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत अध्यक्षपदासाठी विविध संस्थांनी विविध नावे सुचवली होती. या सुचवलेल्या नावांवर चर्चा करण्यात आली. या चर्चेनंतर बहुतांश सदस्यांनी विश्वास पाटील यांच्या नावावर सहमती दर्शवली. त्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले. मराठा साम्राज्याची एकेकाळची राजधानी असलेल्या सातारा येथे होणारे आगामी साहित्य संमेलन होणार आहे. यंदाचे हे संमेलन शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर आहे. याच अनुषंगाने पानिपत या ऐतिहासिक कादंबरीसाठी प्रसिद्ध असलेले विश्वास पाटील यांची संमेलनाध्यक्षपदी निवड होणे, हा एक अनोखा योगायोग मानला जात आहे. (पान २ वर)



## स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे 'टार्गेट 51 टक्के'-चंद्रशेखर बावनकुळे

**नागपूर/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत भाजपने प्रत्येक मतदारसंघात किमान ५१ टक्के मते मिळविण्याचे टार्गेट ठेवले आहे. या दृष्टीने जागोजागी कार्यकर्ता संवाद मेळाव्यांना सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे विरोधकांच्या आरोपींना मोडून काढण्याचे मोठे आव्हान भाजपसमोर आहे. त्याच दृष्टीने पक्षाच्या नेत्यांकडून कार्यकर्त्यांना त्यासंदर्भातील नियोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. नागपूर जिल्ह्यातील महादुला व बहादुरा भागात भाजपच्या कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टच आवाहन केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या



निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराला किमान ५१ टक्के मते मिळतील या अनुषंगाने काम करा आणि पंचायत ते पार्लमेंट भारतीय जनता पक्षाला मजबूत करा, असे आवाहन त्यांनी केले. भाजप हा समाजाच्या शेवटच्या व्यक्तीचा विचार करणारा पक्ष आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी केंद्र आणि राज्याच्या योजना सामान्यांपर्यंत पोहचविल्या पाहिजे. जो वचन मी विधानसभा निवडणुकीत तुम्हाला दिले होते ते मी पूर्ण करणार आहे. ज्यांना घर नाही त्यांना पंतप्रधान आवास योजनेतून घरे देणार आहे. लाडकी बहीण योजना बंद केली जाणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. ते महिलांपर्यंत पोहोचवा. त्यामुळे तुम्ही पक्ष मजबूत करण्यासाठी घरोघरी भेट द्या, असे बावनकुळे यांनी सांगितले. जो जिंकून येउ शकतो आणि जनतेच्या पसंतीचा असलेल्या उमेदवारालाच तिकीट देण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले. (पान २ वर)




## नागपुरात थेट घराच्या बाल्कनीतून उड्डाण पूलाचा रस्ता

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपुरातील अशोक चौकात एक विचित्र दृश्य पाहायला मिळत आहे. ते पाहून नागपूरकरांवरही थक्क होण्याची वेळ आली आहे. सध्या बांधकामाधिन असलेल्या इंदोरा - दिघोरी उड्डाण पुलाच्या रस्त्याचा बाह्यभाग अशोक चौकात थेट रस्त्या लगतच्या इमारतीच्या बाल्कनीतून गेला आहे.नागपुरात ९९८ कोटी रुपये खर्च करून इंदोरा ते दिघोरी या दोन टोकांना जोडणारा उड्डाण पुल बांधला जात आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. हा पुल ग्रेटनाग (पान २ वर)






## जागतिक बॉक्सिंगमध्ये भारताने दोन दिवसांत दोन सुवर्णपदके जिंकली

**■ मीनाक्षीने तीन वेळा विश्वविजेत्याला हरवले; ■ जास्मिनही बनली चॅम्पियन**

**लिव्हरपूल/वृत्तसंस्था :** इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताने दुसरे सुवर्णपदक जिंकले आहे. रविवारी, ४८ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात मीनाक्षीने ३ वेळा विश्वविजेत्या नाझिम कैजिबेचा ४-१ असा पराभव केला. या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी मीनाक्षी ही दुसरी भारतीय बॉक्सर आहे. मीनाक्षीच्या आधी, जास्मिन लम्बोरियाने ५७ किलो वजनी गटात पोलंडच्या ज्युलिया झेरेमेटाचा ४-१ असा पराभव केला.यासह, भारताने जागतिक चॅम्पियनशिपमध्ये चालू हंगामात आपले चौथे पदक जिंकले आहे. यामध्ये एक रौप्य आणि एक कांस्यपदक समाविष्ट आहे.८० किलो वजनी गटात नुपूरला अंतिम सामना गमवावा लागला. तर पूजा राणीला ८० किलो वजनी गटात कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.



**भारतातील विश्वविजेत्यांची संख्या दुहेरी अंकावर पोहोचली-** मीनाक्षीच्या या सुवर्णपदकासह, भारतातील जागतिक विजेत्यांची संख्या दुहेरी अंकी झाली आहे. जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपच्या महिला गटात सुवर्णपदक जिंकणारी ती भारतातील १०वी बॉक्सर आहे.मीनाक्षीने स्पर्धेच्या इतिहासात महिला गटात भारताला १६ वे सुवर्णपदक मिळवून दिले आहे. भारताने या स्पर्धेत आतापर्यंत ९ रौप्य आणि २२ कांस्यपदके जिंकली आहेत.

**आता दोन्ही अंतिम सामन्यांची स्थिती-** मीनाक्षीने नाझीम कैजेबेचा पराभव केला ४८ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात मीनाक्षीने पॅरिस ऑलिंपिक कांस्यपदक विजेत्या नाझीम कैजिबे (कझाकस्तान) हिचा ४-१ असा पराभव केला. बॅकफूटवर असताना तिने (पान २ वर)

## चंद्रावर आधी हनुमान गेला

### कनिमोईच्या विधानाने वादळ

**मदुराई / वृत्तसंस्था-** तामिळनाडूत निवडणुकीमुळे वातावरण तापले आहे. यापूर्वी स्टॅलिन यांच्या मुलाने सनातन धर्म संपवण्याचे विधान केले होते. आता त्यांची बहीण कनिमोई करुणानिधी यांनी पुन्हा सनातन धर्माला लक्ष्य केले. मदुराई येथे निवडणूक प्रचारसभेत त्यांनी (पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

### बोगस आयएएस पूजा खेडकर कुटुंबाचा कारनामा

# नवी मुंबईतून गायब झालेली व्यक्ती पुण्यात घरी आढळली



**पुणे :**पूजा खेडकर आणि त्यांच्या कुटुंबीयांचे वादग्रस्त कारनामे आधीच जनतेच्या चर्चेचा विषय ठरले असताना, आता आणखी एक गंभीर प्रकार समोर आला आहे. नवी मुंबईतील रबाळे परिसरातून अपहरण झालेला ट्रकचा हेल्पर थेट खेडकर कुटुंबाच्या पुण्यातील घरात सापडल्याने खळबळ उडाली आहे.शनिवारी सायंकाळी सुमारे सव्वा सातच्या सुमारास मुलुंड ते ऐरोली मार्गावर सिमेंट मिक्सर ट्रक आणि एमएच १२ आरपी ५००० नंबरच्या कारमध्ये अपघात झाला. या ट्रकमध्ये चालक चंदकुमार चव्हाण आणि हेल्पर प्रल्हाद कुमार हे दोघे होते, तर कारमध्ये दोन अज्ञात व्यक्ती होते. अपघातानंतर दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला आणि त्याच वेळी, कारमधील दोघांनी हेल्पर प्रल्हाद कुमारला जबरदस्तीने त्यांच्या कारमध्ये बसवून घेतले.त्यांनी ट्रक आमच्या मागे आणा, असे चालकाला बजावले, मात्र काही अंतर गेल्यावर कार नजरेआड झाली. घाबरलेल्या ट्रक चालकाने घटनेची माहिती ट्रक मालक विलास ढेंगरे यांना दिली. ढेंगरेंनी तात्काळ नवी मुंबईच्या रबाळे पोलीस ठाण्यात अपहरणाची तक्रार दाखल केली. तक्रार दाखल होताच पोलिसांनी तपास सुरू केला. सदरील कार पुण्यातील पूजा खेडकर यांच्या घरात उभी असल्याचे निष्पन्न झाले. पोलिस घरी पोहोचल्यावर खेडकर यांच्या आईने गेट उघडण्यास नकार दिला. त्यानंतर पोलिसांनी प्रश्नांची सरबत्ती करत छाननी सुरू ठेवली. काही वेळाने खेडकर यांच्या घरातून ट्रक हेल्पर प्रल्हाद कुमार याची सुटका करण्यात आली.अपहरण झालेला हेल्पर खेडकर कुटुंबाच्या घरात कसा पोहोचला? अपघातात वापरलेली कार त्यांच्या ताब्यात कशी आली? अपघातातील दोघे आरोपी कोण होते आणि त्यांचा खेडकर कुटुंबाशी नेमका काय संबंध आहे? या सर्व बाबींची चौकशी नवी मुंबई पोलीस करत आहेत.

## चिमुकलीला जिवंत गाडले, ग्रामस्थांना रडण्याचा आवाज आला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जैतीपूर भागातून हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. येथे अवघ्या १० दिवसांच्या निरागस बालिकेला जिवंत गाडण्यात आले. मात्र तिच्या रडण्याचा आवाज ऐकून ग्रामस्थांनी वेळेत तिला वाचवले आणि रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी सांगितले की, बाळाला हायपोथर्मिया झाला होता, पण सध्या तिची प्रकृती स्थिर आहे. पोलिसांनी बाळाच्या कुटुंबाचा व दोषींचा शोध सुरू केला आहे. शाहजहाँपूर जिल्ह्यातील गोहरवार गावाजवळच्या शेतात ही घटना घडली. दहा दिवसांच्या चिमुकलीला मातीत गाडण्यात आले होते. तिच्या रडण्याचे आवाज ऐकून जनावरे चारत असलेले ग्रामस्थ तिकडे धावले. मातीतून एका बाळाचा हात बाहेर आलेला दिसला. हे दृश्य पाहून ग्रामस्थांनी तात्काळ त्या बाळाला बाहेर काढले आणि पोलिसांना माहिती दिली. सूचना मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि बाळाला सामुदायिक आरोग्य केंद्र (सीएचसी) जैतीपूर येथे दाखल केले. प्रभारी डॉक्टर नितीन सिंह यांनी सांगितले की, सकाळी साडेदहा वाजता बाळाला आणण्यात आले. तिच्या शरीरावर माती लागलेली होती. तिच्यावर तातडीने प्राथमिक उपचार करण्यात आले. तसेच, पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले. सध्या तिची प्रकृती स्थिर आहे. बाळाची ओळख किंवा तिच्या कुटुंबाविषयी काहीही माहिती अद्याप मिळालेली नाही. पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. जैतीपूर पोलिसांचे म्हणणे आहे की, नेमके कोणी व का या चिमुकलीला जिवंतपणी गाडले, याचा तपास सुरू आहे. या घटनेबाबत गावक-यांमध्ये संतापाची लाट आहे.



## महिलेने दिला एकाचवेळी 4 मुलांना जन्म

**सातारा :** साता-यातील जिल्हा रुग्णालयात ही अनोखी घटना घडली आहे. कोरेगाव तालुक्यातील २७ वर्षीय तरुणीने एकाच वेळी दोन-तीन नव्हे तर चार बाळांना जन्म दिला आहे. काजल विकास खाकुर्डिया असे या तरुणीचे नाव आहे. विशेष म्हणजे याआधी पाच वर्षांपूर्वी काजलने तीन बाळांना जन्म दिला होता. म्हणजेच आता तिच्या पदरात दोन-चार नव्हे तर सात अपत्य आहेत. या घटनेने डॉक्टरांपासून नातेवाईकांपर्यंत सर्वांनाच थक्क करून सोडले आहे.



एकाच वेळी चार बाळांना जन्म जेणारी काजल ही मूळची गुजरातची आहे. ती सध्या सासवडमध्ये राहत असून साता-यातील तिच्या माहेरी बाळंतपणासाठी आली होती. काजलचा पती विकास खाकुर्डिया गवंडी म्हणून काम करतो. सी-सेक्शनद्वारे काजलची डिलिव्हरी करण्यात आली आहे. सुदैवाने या डिलिव्हरीदरम्यान कोणत्याही अडचणी निर्माण झाल्या नाहीत. त्यामुळे डिलिव्हरीनंतर आई आणि तिच्या चारही बाळांची प्रकृती ठणठणीत आहे. खाकुर्डिया यांच्या घरात आता दोन-चार नव्हे तर सात बाळांचं संगोपन होणार आहे. या घटनेने परिसरातील नागरिकसुद्धा चकित झाले आहेत. दीपाली राठोड आणि संपूर्ण वैद्यकीय पथकाने काजलची सुरळीत डिलिव्हरी पार पाडली..

# राज्य सरकार एकाच जातीचे नाही -शरद पवार

**नाशिक/प्रतिनिधी :** राष्ट्रवादीचे सर्वासर्वा शरद पवार यांनी नाशिकमध्ये मोठं वक्तव्य केलं आहे. 'राज्य सरकार कुठल्याही एका जातीचे नाही. एकाकडून एक मागणी आल्यानंतर दुसरीकडून दुस-या मागण्या येतात. त्यांना प्रश्न सोडवायचे नाही. तर वाढवायचे आहेत, असं म्हणत शरद पवार यांनी फडणवीस सरकारवर टीका केली. ते नाशिकमध्ये बोलत होते. हे ठिकाण का निवडलं असा प्रश्न विचारण्यात आला? महाराष्ट्रातील महत्वाच शहर नाशिक आहे. आपला पक्ष गांधी नेहरू विचारधारेवर चालणारा पक्ष आहे. नाशिकचा इतिहास पाहिला तर या जिल्ह्यात गांधी नेहरू विचारधारा या लोकांनी स्वीकारली होती. स्वातंत्र्याच्या पूर्वी नाशिकला एक अधिवेशन झालं होतं. वर्किंग कमिटी बैठक झाली होती. महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू उपस्थित होते. गांधी नेहरू विचार पुढे घेउन जाण्यांच काम नाशिक करणी केलं. त्यानंतर भाउराव हिरे, गोविंदराव देशपांडे यांनी विचारपुढे नेला.मराठी साहित्यात योगदान देणारे अनेक लोक याठिकाणी होउ गेले. महाराष्ट्राच्या साहित्य परंपरेत कुसुमाग्रज यांच नाव घेतल्याशिवाय साहित्य पूर्ण होतं नाही. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा महाराष्ट्राला मोठा नेता मिळाला. राज्याला प्रगतीच्या दिशेने घेउन जाणारा हा नेता होता. नाशिकचा इतिहास आहे म्हणून मला आनंद आहे. शशिकांत शिंदे यांनी याच ठिकाणी नियोजित केले.सकाळपासून अनेकांची भाषणे ऐकली. सगळ्या लोकांनी भाषण केले. आपल्यासमोर विचार मांडले. उत्तम शेती करणारा हा जिल्हा आहे. आज देशाची आणि महाराष्ट्राची सगळ्यात जास्त द्राक्ष आणि डाळिंब नाशिक देते. नाशिकचे शेतकरी अतिशय उत्तम शेती करता. त्याच्यामुळे शेतीवर नाशिककरांचे अधिक लक्ष असते. नुसतं लक्ष नाही आहे, तर शेतक-यांचं प्रश्नांशी जाणं आहे.जगात ज्याचे संशोधन होते. याची नोंद घेणारे शेतकरी नाशिकमध्ये आहेत. राज्यातील शेतकरी संघर्ष करतो. रस्त्यावर उतरतो. शरद जोशींनी शेतक-यांचे संघटना नाशिकमधून उभी केली. देशात नाशिकमुळे कांद्याची चर्चा झाली, नाशिक कांद्याची निर्यात करणारा जिल्हा आहे. नाशिक जिल्ह्यात तीन जागा निवडून आल्या. तीनही जागा नाशिककरांनी निवडून दिल्या.

केंद्र सरकारने कांदा निर्यात करायची, त्याच्यावर बंधन आणली. सगळ्या दृष्टिकोनातून उदासीनता आहे. जिल्हा बँक संकटात आली. भारताशेजारच्या अत्यंत जवळच्या असलेल्या नेपाळाची अवस्था काय आहे आपल्याला माहिती आहे. बांगलादेश बघा. बांगलादेश आपल्याबरोबर राहिलेला नाही. श्रीलंका



एकेकाळचा मित्र आपल्याबरोबर राहिलेला नाही. नरेंद्र मोदींच्या हातात देशाचे नेतृत्व आहे. भारत शेतीप्रधान देश आहे. शेतीला जोड हा दुधाचा धंदा आहे. आठ महिन्यात ११८६ शेतक-यांनी आत्महत्या केल्या. केंद्र आणि राज्य सरकार बघ्याची भूमिका घेत असेल तर आपण लढायची तयारी ठेवली पाहिजे. राज्यात काही चांगले चित्र नाही. राज्यातील जिल्ह्यात वेगवेगळे वातावरण आहे. एका समाजाचा व्यवसाय आहे. तिथे दुस-या समाजाचा व्यवसाय जात नाही अशी चर्चा आहे.पिढ्यांपिढ्या सोबत असलेली लोक एकमेकांबद्दल अविश्वास दाखवत आहे. आरक्षणाबाबतीत सवलती दिल्या. व्हीजेएनटी यांच्यात वेगळे धोरण टाकले जात आहे. महाराष्ट्रात बंजारा समाज एसटीमधून आरक्षण मिळण्यासाठी मागणी करत आहे. आदिवासींच्या कोट्यातून मागणी केली जात आहे. राज्य सरकार कुठल्या एका जातीचे नाही. एका कडून एक मागणी केली जात आहे. दुसरीकडून दुस-या मागण्या येतात. त्यांना प्रश्न सोडवायचे नाही. तर वाढवायचे आहे. त्यांना योग्य पद्धतीने हाताळणे गरजेचे आहे. राज्याची सामाजिक वीण विस्कळीत आहे.

## माझ्या लोकांचे रक्त सांडले आहे तर आपण त्यांच्याशी का खेळावे?-नाना पाटेकर

**मुंबई/प्रतिनिधी :** आशिय चषकातील भारत-पाकिस्तान सामन्यावर विविध क्षेत्रातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. शिवसेनेने (ठाकरे) महाराष्ट्रात ठिकठिकाणी आंदोलन करण्याची भूमिका घेतली. तर पहलगाममध्ये बळी पडलेल्या कुटुंबाचे नातेवाईकही या सामन्यावरून बीसीसीआयवर टीका करत आहेत. अशातच आता मनोरंजन क्षेत्रातूनही प्रतिक्रिया येत आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी आजच्या सामन्यावर मोठी प्रतिक्रिया व्यक्त केली.



नाम फाउंडेशनाचा दशकपूर्ती सोहळा पुण्यात पार पडला. या सोहळ्यानंतर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत नाना पाटेकर यांना आजच्या भारत-पाकिस्तान सामन्याला होत असलेल्या विरोधाबाबत प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना ते म्हणाले, मी खरंतर यावर बोलू नये, असं मला वाटतं. पण माझं वैयक्तिक मत असं आहे की, खेळू नये. माझ्या लोकांचं रक्त सांडलं आहे. तर आपण त्यांच्याशी का खेळावं? शेवटी माझ्या हातात असलेल्या गोष्टीवर बोलून फायदा आहे. फक्त मत व्यक्त करून काय होणार? नाना पाटेकरनं मत व्यक्त करून हा विषय सुटणार नाही. सरकारचं धोरण काय आहे? त्यांचे नियम काय आहेत, यावर ते ठरत असतं, असेही पुढे नाना पाटेकर म्हणाले. या दशकपूर्ती सोहळ्याला केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, उद्योग मंत्री उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित आहेत. अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांनी गेल्या दहा वर्षांपासून दुष्काळावर मात करण्यासाठी नाम फाउंडेशनच्या माध्यमातून काम केले आहे. या कामाचा यावेळी गौरव करण्यात आला. २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ लोक मारले गेले होते. त्यापैकी पुण्यातील संतोष जगदाळे हेही एक होते. आज भारत-पाकिस्तान सामना होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जगदाळे यांची कन्या आसावरी जगदाळे आणि पत्नी प्रगती जगदाळे यांनीही नाराजी व्यक्त केली.

आपल्या क्रिकेटपटूंना पाकिस्तानात जावं लागू नये किंवा त्यांच्या क्रिकेटपटूंना इथं यावं लागू नये, यासाठी तुम्ही दुबईमध्ये आशिया चषक ठेवला आहे. याचा अर्थ तुम्ही अप्रत्यक्षरित्या पाकिस्तानला निधी पुरवत आहात. फक्त करार स्थगित करून, पाणी आणि व्यापार बंद करून संबंध तोडले असं होत नाही. तुम्हाला जर मारल्या गेलेल्या लोकांबद्दल सहानुभूती असेल तर भारताने यापुढेही पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळू नये, अशी भूमिका आसावरी जगदाळे यांनी मांडली. दरम्यान शिवसेनेकडून (ठाकरे) माझे कुंकू, माझा देश हे आंदोलन आज राज्यभरात केले जात आहे. या आंदोलनाची माहिती देत असताना शिवसेनेचे (ठाकरे) खासदार आणि प्रवक्ते संजय राउत यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. तसेच मी आजचा सामना वेळ मिळाल्यास पाहणार, असे म्हणणा-या उपमुख्यमंत्री अजित पवारांना लक्ष्य केले. अजित पवारांच्या अंगात पाकड्यांचे रक्तवाहत आहे. अजित पवार अर्धे पाकिस्तानी आहेत. महाराष्ट्राचा मंत्री जर भारत-पाकिस्तान सामना पाहण्याची भाषा वापरत असेल तर ती राष्ट्रभक्त नागरिकाची भाषा नाही. पहलगाम येथे मृत्यूमुखी पडलेल्या २६ लोकांमध्ये तुमच्या घरातील कुणी असते तर तुम्ही असे बोलला नसतात. जर त्या २६ लोकांमध्ये तुमचा एखादा ठेकेदार जरी असता, तरी तुम्ही हे बोलला नसता, अशी टीका संजय राउत यांनी केली.

## ‘व्यक्तीचा निर्णय जनहिताचा, राष्ट्रहिताचा असेल, तर ती संस्कृती‘

### योगींच्या हस्ते 298 कोटींच्या प्रकल्पांचे लोकार्पण

**लखनउ/वृत्तसंस्था :** आपल्या जीवनात तीन अवस्था असतात, पहिली प्रवृत्ती, दुसरी विकृती आणि तिसरी संस्कृती. यांपैकी परिस्थिती आहे तसे राहणे ही प्रवृत्ती आहे. माणसाला बदल हवा असतो, मात्र, तो स्वात:मध्ये बदल करण्यासाठी कचरतो. जर एखादी व्यक्ती किंवा संस्था सातत्याने अधोगतीकडे जात असेल तर ती विकृती आहे. याचप्रमाणे, जर एखाद्या व्यक्तीने निर्णय घेतला आणि तो निर्णय व्यापक जनहित आणि राष्ट्रहिताचा असेल, तर ती संस्कृती आहे. याच संस्कृतीचे एक उत्तम उदाहरण म्हणजे, डा. राम मनोहर लोहिया आयुर्विज्ञान संस्थान. या संस्थेने अवघ्या १९ वर्षांत २० खाटांपासून १,३७५ खाटांपर्यंत विस्तार केला आहे, असे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे. ते शनिवारी इंदिरा गांधी प्रतिष्ठान येथे आयोजित डा. राम मनोहर लोहिया आयुर्विज्ञान संस्थानच्या स्थापना दिना निमित्त आयोजित समारंभात बोलत होते. यावेळी त्यांनी २९८ कोटींच्या प्रकल्पांचेह लोकार्पण आणि शिलान्यास केला.



काळाच्या गतीपेक्षा दोन पावले पुढे राहण्यासाठी तयार रहा -

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले, देश आणि व्यक्तीची गती ही काळाची गती आहे. आपण काळाच्या गतीपेक्षा दोन पावले पुढे राहण्यासाठी तयार असले पाहिजे. जो व्यक्ती, समाज किंवा देश काळाची गती ओळखू शकत नाही, तो काळाच्या तडाख्यात येतो. कारण काळाची गती तीच आहे, ज्याबद्दल डा. श्याम नारायण पांडेय म्हणाले होते की, हे महाकालाचा आसन आहे, यावर कुणाचेही शासन चालत नाही. योगी पुढे म्हणाले, जर कुणाला वाटत असेल की, मी काळाची गती रोखू शकतो, तर हा त्याचा गैरसमज आहे. यामुळे आपल्याला काळाच्या गतीपेक्षाही दोन पावले पुढे चालावे लागेल. जर आपण या गतीने चाललो, तर प्रगती करू; जर चालू शकत नसू, आपण केवळ काळानुसारच स्वत:ला ढाळत असू, तर लोक आपल्याला यथास्थितिवादी म्हणून ओळखतील.

## मायावतींनी देशातील दलितांचे नेतृत्व करावे- मंत्री रामदास आठवले

**कोल्हापूर :**देशातील दलित भविष्यात एकत्र आल्यास त्याचे नेतृत्व मायावती यांनी करावे, कारण त्यांच्याकडे अनुभव आणि ताकद दोन्ही आहे, अशी अपेक्षा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी व्यक्त केली. कोल्हापूर जिल्हा दौ-यावर आलेल्या आठवले यांनी शासकीय विश्रामगृहावर पत्रकार बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. आठवले पुढे म्हणाले, दलित समाजाचे विखुरलेले राजकारण एकत्र करण्याची गरज आहे. संविधानाने अधिकार व आरक्षण दिले असले तरी अनेक ठिकाणी भेदभाव सुरूच आहे. दलितांना स्वतंत्र राजकीय आवाज मिळायला हवा.भाजपसोबतच्या युतीबाबत त्यांनी स्पष्ट केले की, मोदी सरकारने दलितांसाठी अनेक योजना राबवल्या असून, ही भागीदारी सकारात्मक ठरली आहे. मात्र, स्थानिक स्वराज्य निवडणुकीत महायुतीने जागा द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.



***एक ठाकरे आमच्याकडे येतील-*** रामदास आठवले यांनी ठाकरे बंधुंच्या युतीवरही भाष्य केलं आहे. यातील एक ठाकरे आमच्याकडे येतील असा दावा तूनी केला. पण दोन्ही ठाकरे बंधु जरी एकत्र आले तरी महाराष्ट्राच्या राजकारणावर बिलकुल परिणाम होणार नाही. उलट महायुतीला फायदाच होईल. दोन्ही ठाकरेंच्या सगळीकडे बातम्या येतील, मात्र महाराष्ट्रासह मुंबई महानगरपालिकेत त्यांना अजिबात यश मिळणार नाही. मुंबई महानगरपालिकेवर यंदा महायुतीचाच झेंडा फडकणार आहे. रामदास आठवले यांनी प्रकाश आंबेडकरांसोबत युती करण्याबाबतही भाष्य केले आहे. मी आणि प्रकाश आंबेडकर एकत्रित आलो तर दलित समाजाला अत्यानंद होईल.

## राष्ट्रीय तपास यंत्रणेला हवा असलेला जहाल नक्षलवादी पोलिसांच्या जाळ्यात

**गडचिरोली /प्रतिनिधी :** राष्ट्रीय तपास यंत्रणेला हवा असलेल्या जहाल नक्षलवाद्याला अटक करण्यात गडचिरोली पोलिसांना यश आले आहे. शंकर भिमा महाका (वय ३२, रा. परायणार, ता. भामरागड) असे अटक करण्यात आलेल्या नक्षल्याचे नाव असून पोलिसांनी भामरागड तालुक्यातील तिरकामेटा जंगल परिसरातून त्याला ताब्यात घेतले. त्याच्यावर दोन लाखांचे बक्षीस होते.

शनिवारी (१३ सप्टेंबर) ताडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत विशेष अभियान पथक नक्षलविरोधी मोहीम राबवत असताना जवानांना एक संशयित व्यक्ती दिसून आला. त्याला ताब्यात घेउन अहेरी येथील प्राणाहिता पोलीस उपमुख्यालयात आणण्यात आले. चौकशीत त्याची ओळख शंकर महाका अशी पटली. तो भामरागड दलमचा सदस्य असून, घातपाताच्या उद्देशाने तिरकामेटा जंगलात रेकीसाठी गेला होता, असे तपासात स्पष्ट झाले.२१ जानेवारी २०२२ रोजी भामरागड तालुक्यातील धोडराज इरेर मार्गावरील पेनगुंडा रस्त्याच्या कामावर असलेली तब्बल १९ वाहने नक्षल्यांनी पेटवून दिली होती. सुमारे २ कोटी रुपयांच्या या जाळपोळ प्रकरणात शंकर महाकाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. तो २०१६ ते २०२२ या काळात नक्षल्यांच्या जनमिलिशियामध्ये कार्यरत होता. नंतर त्याने भामरागड दलममध्ये प्रवेश केला. जानेवारी २०२२ पासून आतापर्यंत गडचिरोली पोलिसांनी १०९ नक्षल्यांना अटक करण्यात यश मिळवले आहे.

**दिनेश गावडे खून प्रकरणात आरोपी**

१ नोव्हेंबर २०२३ रोजी लाहेरी येथील दिनेश पुसू गावडे याचा पेनगुंडा येथे नक्षल्यांनी धारदार शस्त्रांनी खून केला होता. या गुन्ह्यात धोडराज पोलिसांनी काही आरोपींना अटक केली होती. पुढे ऑक्टोबर २०२४ मध्ये हा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे वर्ग करण्यात आला. त्यानंतर या खटल्यात चार आरोपींविरुद्ध विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. शंकर महाका हा त्याच प्रकरणातील वाँटेड आरोपी होता, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली. नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक (प्राणाहिता) सत्य साई के., पोलीस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे आणि भामरागडचे प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी अजय कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

पान १ व १० वरून

## भारताने पाकिस्तानला

धावा करण्याची संधी दिली. तर नाणेफेक गमावल्यानंतरही कर्णधार सूर्यकुमार निवांत होता, कारण भारताला प्रथम गोलंदाजीच करायची होती. भारताच्या गोलंदाजांनी आपल्या भेदक आणि उत्कृष्ट गोलंदाजीच्या बळावर टीम इंडियाने शानदार कामगिरी केली. आशिया कप ग्रुप-अ सामन्यात भाराविरुद्ध पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ गडी गमावून १२७ धावा केल्या. साहिबजादा फरहानने ४० आणि शाहीन शाह आफ्रिदीने ३३ धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादवने तीन विकेट्स घेतल्या. जसप्रीत बुमराह आणि अक्षर पटेलने प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. हार्दिक पंड्याने पहिल्या षटकातील पहिला चेंडू वाईड टाकला. पुढच्याच चेंडूवर त्याने सईम अयुबची विकेट घेतली. अयुबचा झेल जसप्रीत बुमराहने घेतला. पाकिस्तानने दिलेल्या १२८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अभिषेक शर्माने पहिल्या दोन चेंडूवर चौकार, षटकार लगावत दणक्यात सुरूवात केली. अभिषेक शर्मा १३ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकारांसह ३१ धावा करत बाद झाला. तर शुबमन गिल २ चौकार लगावत १० धावा करत माघारी परतला. यानंतर तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादवने ५० अधिक धावांची भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. तिलक वर्मा ३१ धावा करत बाद झाला. भारतीय संघाने नाणेफेक गमावली असली तरी सामन्यात दबदबा मात्र भारतीय संघाचा होता. भारतीय संघाने पहिल्याच षटकात विकेट घेत सामन्याला सुरूवात केली. हार्दिक पंड्याने गोलंदाजीला सुरूवात करत पहिला चेंडू वाईड टाकला आणि त्यानंतर पहिल्या लीगल चेंडूवर त्याने सईम अयुबला झेलबाद करवत पहिली विकेट मिळवली. सईम अयुब सलग दुस-यांदा शून्यावर बाद झाला.

## राज्यभरात ‘माझं कुंकू-माझा

आरोप शिवसेना ठाकरे गटाने केला आहे. यवतमाळमध्ये रक्तरंजित क्रिकेटचे पिच तयार करून त्यावर टीव्ही, स्टम्प, बॅटवर पेट्रोल टाकून जाळण्यात आला.भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याच्या विरोधात कोल्हापुरातील महाद्वार रोडवर शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. शिवसैनिकांनी हातात सिंदूर आणि केकची पाकिटे घेउन मोदी सरकारविरोधात, पाकिस्तानविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. शिवसैनिकांनी आणलेला केक हा सामान्य नागरिकांना वाटण्यात आला. जर हा सामना हॉटेल, रेस्टारंट, बार कुठेही दाखवण्यात आला, तर ती स्क्रीन फोडली जाईल असा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला होता.पहलगाममध्ये मृत्युमुखी पडलेल्या सिंदूरची किंमत मोदी सरकारला कळणार नाही, त्यांना धडा शिकवण्यासाठी आम्ही सिंदूरच्या डब्या पाठवत आहोत असे महिला आंदोलकांनी म्हटले. नांदेडमध्येही शिवसेना ठाकरे गटाकडून भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याला विरोध केला जात आहे. नांदेड शहरातील अण्णा भाउ साठे चौकामध्ये ठाकरे गटाकडून आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला महिला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने गर्दी केली.पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबत युद्ध पुकारणा-या भारत सरकारने बीसीसीआयला आणि क्रिकेट संघाला पाकिस्तानसोबत क्रिकेट सामना खेळण्यास परवानगी दिल्याच्या विरोधात ठाकरे गटाने आंदोलन पुकारले आहे. भिवंडी शहरात शिवसेना महिला आघाडीच्या वतीने उग्र निदर्शने करण्यात आली. या वेळी सर्व महिलांनी कुंकवाची डबी पेटीमध्ये एकत्रित करून आपला संताप व्यक्त केला आहे. ही कुंकवाची पेटी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवण्यासाठी रवाना केली आहे.

## टीम इंडियाच्या विजयासाठी

देणगीही मागितली. पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांनीही भारत-पाकिस्तान सामन्याविरुद्ध निवेदने दिली. अनेकांनी म्हटले की, ज्यांचे हात रक्ताने माखले आहेत, त्यांच्याविरुद्ध आम्ही सामना खेळत आहोत. हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी सरकारला प्रश्न केला की, सामन्यातून मिळालेला पैसा पहलगाम हल्ल्यात मारल्या गेलेल्या २६ नागरिकांच्या जीवापेक्षा जास्त मौल्यवान आहे का? भारत आणि पाकिस्तानमधील आशिया कप सामन्याच्या प्रसारणाविरोधात दिल्लीतील कॅनाट प्लेसमध्ये तीव्र निषेध सुरू आहे. देश दहशतवाद आणि सीमेवरील शहीदांच्या मुद्द्यांशी झुंजत असताना काही व्यापारी स्वतःच्या फायद्यासाठी हा सामना दाखवत असल्याचा आरोप निदर्शक करत आहेत. दुबई येथे आज आशिया कप स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हायव्होल्टेज सामना होणार आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर दोन्ही देशांतील हा पहिलाच आंतरराष्ट्रीय सामना असल्याने देशभरातील क्रिकेट चाहत्यांमध्ये संमिश्र भावना आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून या सामन्याला विरोध दर्शवण्यात आला असून, माझं कुंकू, माझा देश या घोषवाक्याखाली राज्यभरात महिला आघाडीने केंद्र सरकारचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. भोपाळमधील अखिल भारतीय मुस्लिम समितीने दुबईमध्ये होणा-या भारत-पाकिस्तान सामन्याचा निषेध केला. समितीच्या सदस्यांनी पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा दिल्या.

## 99 वे मराठी साहित्य

या निवडीमुळे मराठी साहित्यविश्वात आनंदाचे वातावरण आहे. विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणारे हे संमेलन विशेष महत्त्वाचे ठरेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विश्वास पाटील हे मराठी साहित्यातील एक अग्रगण्य नाव आहे. त्यांची ओळख प्रामुख्याने पानिपत या ऐतिहासिक कादंबरीमुळे आहे. ही कादंबरी मराठी साहित्यातील एक मैलाचा दगड मानली जाते. या कादंबरीमध्ये त्यांनी मराठ्यांच्या पानिपतच्या युद्धातील शौर्य आणि करुण प्रसंगांबद्दल लेखन केले आहे. त्यांनी आतापर्यंत अनेक ऐतिहासिक कादंब-या लिहिल्या आहेत. सखोल संशोधन आणि प्रभावी भाषाशैली ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या साहित्यकृतींनी मराठी साहित्याला एक नवी उंची प्राप्त करून दिली आहे. आता ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाल्याने त्यांच्या नेतृत्वाखाली हे संमेलन मराठी साहित्याला नवी दिशा देईल, अशी अपेक्षा आहे.दरम्यान अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे मराठी साहित्यविश्वातील सर्वांत मोठे आणि प्रतिष्ठित व्यासपीठ मानले जाते. दरवर्षी आयोजित होणा-या या संमेलनात देशभरातील मराठी साहित्यिक, कवी, लेखक आणि वाचक एकत्र येतात. या व्यासपीठावर साहित्यिक विचार, नवनवीन संकल्पना आणि कलाकृतींवर सखोल चर्चा-विनिमय होतो. यंदाचे ९९ वे संमेलन शतकपूर्तीच्या जवळ पोहोचले आहे. त्यामुळे त्याचे महत्त्व अधिकच वाढले आहे. अशा ऐतिहासिक टप्प्यावर, ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांच्यासारख्या दिग्गज व्यक्तिमत्त्वाच्या नेतृत्वाखाली हे संमेलन मराठी साहित्याला एक नवी आणि सकारात्मक दिशा देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये

यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष आनंदराव राउत, चेतन खडसे, हरीश कंगाली, ब्रम्हा काळे, राजेश रंगारी इत्यादी पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी बावनकुळे यांनी कांग्रेस नेते सुनिल केदार यांच्यावर हल्लाबोल केला. कॉंग्रेस मत चोरीचा आरोप करीत आहे. परंतु ज्यांनी शेतक-यांचे दीडशे कोटी रुपये खाल्ले व जे जामिनावर बाहेर आहेत, त्यांना आरोप करण्याचा अधिकार आहे का असा सवाल त्यांनी केला. कांग्रेसने कामठीमध्ये मोर्चा काढला. मात्र त्या ठिकाणी मी ९५ पैकी ७५ बुथवर मागे होतो. मग मतचोरी कोणी केली, असा सवाल त्यांनी केला. कॉंग्रेस पक्ष खोटा अजेंडा राबवित आहे. ते खोडून काढा, त्यांना उत्तर द्या असे बावनकुळे यांनी सांगितले.

## नागपुरात थेट घराच्या

रोडवरील अशोक चौकातून सक्करद-याकडे जातो. या चौकातून चार दिशांना उड्डाण पुलाचे रस्ते जात आहे. येथील एक व्हीडीओ व्हायरल झाला असून तो सध्या नागपूरमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. उड्डाण पुलाचा एका मार्गाचा बाह्यभाग रस्त्यालगत असलेल्या एका इमारतीच्या बाल्कणीतून जात आहे. इमारत मालकाने अनधिकत बांधकाम केल्याने ही स्थिती उद्भवल्याचा दावा महापालिकेने केला आहे. ते त्यांना पाडावे लागणार आहे. पुलाच्या बांधकामापूर्वीच ही इमारत बांधण्यात आली होती. वाढीव बांधकाम करताना त्याचा नकाशा महापालिकेकडून मंजूर करून घेण्यात आला नव्हता. त्यामुळे ज्यावेळी पुलाच्या बांधकामाचा आराखडा तयार करण्यात आला त्यावेळी ही बाब लक्षात आली नाही. आता पुलाचे बांमधकाम अंतिम टप्प्यात आले आहे.सक्करदराकडे जाणा-या पुलाच्या मार्गाचा बाह्यभाग हा संबंधित इमारतीच्या बाल्कनीतून गेला आहे. हे दृश्य पाहण्यासाठी मुळ रस्त्यावरून जाणारे-येणारे थांबतात. बांधकामाच्या नव्या पद्धतीबाबत चर्चा करतात. दरम्यान प्रकल्पाची उभारणी करणा-या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने संबंधित इमारत मालकास त्याने केलेले अतिक्रमण काढण्यासाठी नोटीस बजावली आहे. महापालिकेलाही याबाबत पत्र देउन अतिक्रमण काढण्याची सूचना करण्यात आली आहे. सध्या तरी मात्र ते तसेच आहे. बाल्कनीतून उड्डाण पुल गेल्याचे दृश्य कायम आहे. याचा व्हीडीओ व्हायरल झाल्याने त्याची चांगलीच चर्चा होत आहे. विशेष म्हणजे केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्र्यांच्या शहरात विचित्र प्रकार घडल्याने चर्चेला अधिक उत आला आहे.

## चंद्रावर आधी हनुमान गेला;

म्हटले की, एक चांगली गोष्ट आहे की, तामिळनाडूमध्ये असा राजकीय नेता नाही, जो म्हणेल की, चंद्रावर सर्वात आधी हनुमान गेला होता. ते असं पण म्हणतील की त्यांची आजी पण चंद्रावर गेली होती आणि ती अद्याप तिथेच थांबलेली आहे. असे वक्तव्य त्यांनी केले. त्यावरून एकच संताप उसळला आहे.त्यांनी यावेळी सनातन धर्माची खिल्ली उडवण्याचा प्रयत्न केला. दक्षिणेतील अनेक नेते देवी-देवतांवर वारंवार टीका करून आपण पेरियरचे खरे शिष्य असल्याचे दाखवण्याचा, भासवण्याचा वारंवार प्रयत्न करतात. त्याचाच हा भाग असल्याचे दिसून येते.आता कनिमोई यांनी हनुमानावरून वाद तयार केला आहे. आक्रमणकर्त्यांनी प्रयत्न करूनही द्रविड संस्कृती टिकून राहिली. द्रविड आंदोलन हा त्याचाच भाग आहे. वोट बँकसाठी कनिमोई यांनी असे विधान केल्याचा दावा करण्यात येत आहे.

**कनिमोईच्या वक्तव्याने संतापाची लाट-** कनिमोईच्या वक्तव्याने देशभरात संतापाची लाट उसळली. समाज माध्यमांवर त्यांच्यावर जनतेचा राग फुटला. अनेक विरोधकांनी त्यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. इतर धर्माविषयी आणि इतर धर्माच्या प्रथांविषयी असं बोलण्याची कनिमोई यांनी हिम्मत दाखवावी असे आव्हान अनेक युझर्स आणि विरोधकांनी त्यांना दिले.

## जागतिक बॉक्सिंगमध्ये भारताने

तिच्या लांब हातांचा फायदा घेतला आणि प्रतिस्पर्ध्यावर सरळ ठोसे मारले. जस्मिनने ज्युलिया झेरेमेटाचा ४-१ असा पराभव केला. पहिल्या फेरीत २-३ असा पराभव पत्करल्यानंतर, भारतीय बॉक्सरने जोरदार पुनरागमन केले. जास्मिनने सामन्यावर नियंत्रण ठेवले. तिने आक्रमण आणि बचाव यांच्यात मजबूत समन्वय प्रस्थापित केला, ज्यामुळे सर्व परीक्षक तिच्या बाजूने झाले. अंतिम सामना जिंकल्यानंतर, जास्मिन म्हणाली- ही भावना शब्दात वर्णन करता येणार नाही. विश्वविजेता झाल्याचा मला खूप आनंद आहे. पॅरिस ऑलिंपिकमधील सुरुवातीच्या पराभवानंतर मी स्वत:ला पूर्णपणे तयार केले. हे यश त्या कठोर परिश्रमाचे फळ आहे.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ सोमवार, १५ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com

mail : jmakola.thakur@gmail.com


# तोरणाळा येथे जीर्ण पाण्याची टाकी जमीनदोस्त
# आ. श्याम खोडे यांच्या पुढाकाराने मोठा धोका टळला



## टाकी कोसळून मोठा अपघात होण्याची होती शक्यता

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**गावातील उंचावर असलेली अतिशय जीर्ण झालेली पाण्याची काँक्रीटची टाकी आमदार श्याम खोडे यांच्या अथक प्रयत्न व पाठपुराव्यामुळे अखेर जमीनदोस्त करण्यात आली. या टाकीच्या जीर्ण अवस्थेमुळे गावातील लहान मुले, वृद्ध नागरिक तसेच आजूबाजूच्या घरांना मोठा धोका निर्माण झाला होता. अखेर आमदार साहेबांच्या पुढाकाराने हा धोका पूर्णपणे टळला आहे.**

गावकऱ्यांनी वारंवार लोकप्रतिनिधी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडे निवेदन देऊनही दुर्लक्ष करण्यात आले होते. 'ही टाकी वापरात नाही' असा उडवाउडवीचा पवित्रा अधिकाऱ्यांनी घेतला होता. त्यामुळे एक दिवस ही टाकी कोसळून मोठा अपघात होईल, अशी भीती गावकऱ्यांमध्ये निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांनी थेट आमदार यांच्याकडे धाव घेतली. त्यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन पाडकाम सुरू करण्याचे आदेश दिले. ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक तसेच सर्व गावकरी यांच्याच्या उपस्थितीत व सहकार्याने ही टाकी सुरक्षित पाडण्यात आली.

या निर्णयामुळे गावकऱ्यांनी मोठा दिलासा व्यक्त केला असून आमदार श्याम खोडे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. आमदारांच्या पुढाकारामुळे गावातील संभाव्य दुर्घटना टळली व सर्वांना सुरक्षिततेची हमी मिळाली आहे.

# 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानांतर्गत आरोग्य शिबिरांना महिलांचा प्रतिसाद आवश्यक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महिलांचे आरोग्य हे संपूर्ण कुटुंब आणि समाजाच्या आरोग्याशी थेट जोडलेले आहे. याच उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील आयुष्मान आरोग्य मंदिरे, प्राथमिक आरोग्य केंद्रे , सामुदायिक आरोग्य केंद्रे आणि जिल्हा रुग्णालये येथे या अभियानांतर्गत आरोग्य शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.



या शिबिरांमध्ये महिलांसाठी प्रतिबंधात्मक, आरोग्यवर्धक आणि उपचारात्मक सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जातील. उच्च रक्तदाब, मधुमेह, स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य रोगांची तपासणी केली जाणार आहे. तसेच रक्तक्षय (ॲनिमिया) तपासणी, क्षयरोग व सिकल सेल तपासणी, गर्भवती महिलांची प्रसूतीपूर्व काळजी , माता व बाल संरक्षण कार्ड वितरण, तसेच लसीकरण सेवा पुरविण्यात येतील.

महिलांसाठी पोषण, मासिक पाळीची स्वच्छता व निरोगी जीवनशैली याविषयी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन होणार असून, रक्तदान शिबिरे व मानसिक आरोग्याबाबत समुपदेशनही करण्यात येईल. याशिवाय आयुष्मान भारत, आभा कार्ड व प्रधानमंत्री जनआरोग्य योजना यांसाठी नोंदणी व मदत डेस्कही उपलब्ध राहील. जागरूकता वाढविण्यासाठी शिबिरांच्या आयोजनात लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे. खासदार, आमदार, सरपंच आणि स्थानिक नेते यांना उद्घाटन कार्यक्रमासाठी व लाभार्थ्यांना कार्ड वितरणासाठी आमंत्रित करण्यात येईल. समुदायातील प्रत्येक महिलेला शिबिराची माहिती मिळावी यासाठी घराघरात जाऊन तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती केली जाणार आहे. दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा कृती दलाच्या बैठकीत या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. त्यांनी महिलांनी मोठ्या संख्येने शिबिरात हजेरी लावून आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन केले. हे अभियान केवळ आरोग्य तपासणीपुरते नसून महिलांना त्यांच्या आरोग्याविषयी सजग करण्याचे व त्यांना सशक्त बनविण्याचे महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

## उपक्रमशील शिक्षकांचा विनोबा ॲपमधील उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान

■ प्रतिनिधी | कारंजा ■

जिल्हा परिषद वाशिम व ओपन लिंक फाउंडेशन यांच्यातील सामंजस्य करार अंतर्गत राबविण्यात येणारा आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम अर्थात विनोबा(बा) ॲपच्या माध्यमातून जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांना प्रत्येक महिन्यात प्रोत्साहन पर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

ऑगस्ट महिन्यातील तालुका स्तरावरील 'पोस्ट ऑफ द मंथ' शिक्षक राजदीप कोकरे , आणि एप्रिल महिन्यातील विनर माधुरी उंद्रे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सदरील पुरस्कार गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी उपाध्ये यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचे शिक्षकांना आवाहन केले.

यावेळी कार्यक्रमाला केंद्रप्रमुख विषय साधन व्यक्ती समग्र शिक्षा पुरस्कार प्राप्त शिक्षक, अजय राठोड (जिल्हा समन्वयक) उपस्थित होते.



## मालेगांव येथे शिवसेना पक्षाची बैठक संपन्न



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शिवसेना नेत्या आमदार भावनाताई गवळी यांच्या आदेशानुसार शिवसेना जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे, यांच्या मार्गदर्शनाखाली नवनिर्वाचित मालेगाव तालुका शिवसेनाप्रमुख प्रदीप पाटील कुटे नेतृत्वात मालेगाव येथील रेस्ट हाऊस वर शिवसेना शिंदे गटाची मालेगाव शिवसेना तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी ची महत्वपूर्ण बैठक दि १२ सप्टेंबर रोजी संपन्न झाली यावेळी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपंचायत च्या निवडणुकी संदर्भात चर्चा करण्यात आली तसेच पक्ष संघटनेबाबत गाव तिथे शाखा स्थापनेबद्दल चर्चा करून सक्रिय कार्यकर्त्याची पदाधिकारी म्हणून निवड करण्याची ठरले असून शासकीय समितीवर नावे पाठवण्या संदर्भात, चर्चा करण्यात आली तसेच महत्त्वाचे म्हणजे १६ सप्टेंबर ते २० सप्टेंबर दरम्यान मालेगाव येथे चार दिवस तालुक्यातील गोरगरीब शेतकऱ्यांना नागरिकांना चार्जिंग फवारणी पंप आणि वॉटर फिल्टर चा वाटप अल्प दरात वाटप करण्यात येणार असल्याचे ठरले याप्रसंगी जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे उपजिल्हाप्रमुख मंगेश महाराज घुगे तालुकाप्रमुख प्रदीप पाटील कुटे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले कार्यक्रमास युवा सेना उपजिल्हाप्रमुख देशमाने माजी तालुकाप्रमुख तथा तालुका शिवसेना समन्वयक विलासराव जाधव ओबीसी सेलचे शिवसेना तालुका प्रमुख गजानन केंद्रे, मालेगाव तालुका वैद्यकीय कक्ष प्रमुख राजेश कव्हर ,अभिषेक मुंदडा, अभी घुगे ,माणिकराव गालट ,अनिल जाधव विवेक गवळी, कैलास राऊत शंकर वाझुळकर मोहन लहाने, गोपाल मुठाळ, रामदास कुटे, सागर मगर, रामभाऊ काटेकर, सारसकर, शुभम बळी, योगेश काटेकर , ब्राह्मणवाडा येथील नागरिक तसेच तालुक्यातील शिवसैनिक उपस्थित होते.

## बौद्ध स्थळे मुक्तिसाठी जन आक्रोश आंदोलन

**अकोला** : देशात अनेक वर्षापासून बौद्ध समाजावर विविध कारणाने अन्याय अत्याचार केल्या जात आहे.देशातीलच नव्हे तर जगातील बौद्ध धर्मियांचे पवित्र स्थळ असणारे बिहार राज्यातील महाबोधी महाविहार हे अन्य धर्मियांच्या जोखडात असून त्यांच्या मर्जीने व बौद्ध धर्माला सोडून कारभार केल्या जात आहे.त्याचप्रमाणे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मभूमी मध्यप्रदेश राज्यातील महू स्थान हे बुद्धांच्या नियंत्रणात नाही.त्याचप्रमाणे लाखो बौद्ध बांधवांचे श्रद्धास्थान असणारी नागपूरची दीक्षाभूमी ही अपवित्र केल्या जात असून दीक्षाभूमीचा कारभार ही वेगळ्या पद्धतीने चालविल्या जात आहे.

## एच. डी. मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सुयश



■ प्रतिनिधी | कारंजा ■

महाराष्ट्र शासन क्रीडा व युवा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद वाशिम द्वारे आयोजित जिल्हास्तरीय शालेय बॉल-बॅडमिंटन क्रीडा स्पर्धा नुकतीच तालुका क्रीडा संकुल, कारंजा येथे १२ व १३ सप्टेंबर रोजी संपन्न झाली. ह्या स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलांच्या गटात व १४ वर्षाखालील मुलांच्या गटात एच. डी. मॉडर्न मदरसा अँड इंग्लिश स्कूलच्या टीमने यश संपादन करून जिल्हास्तरीय स्पर्धे करिता आपला प्रवेश निश्चित केला आहे विद्यार्थ्यांच्या या यशासाठी शाळेचे अध्यक्ष इमरान मोहम्मद पोपटे, सचिव इनाया इम्रान पोपटे, मुख्याध्यापिका तलत अंजुम यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## 'सायबर फ्रॉड' चे हल्ल्यापासुन सावध राहावे

### स्त्रिया बळी पडण्याची शक्यता

■ प्रतिनिधी | मानोरा ■

आपला भारत देश जलद गतीने डिजिटल युगाकडे धावत आहे. सध्याच्या काळात अनेक कामे ही घरबसल्या करण्याची सोय उपलब्ध होत आहे.

बँक, बुकिंग संबंधीची अनेक कामे आता घरबसल्या होत आहेत. डिजिटल इंडिया या मोहिमेमुळे बँकिंग क्षेत्रात क्रांती आली आहे. ऑनलाईन पैसे हस्तांतरीत करणे असो वा, नवीन खाते उघडणे असो. बँकेशी संबंधित अनेक कामे आता झटपट पूर्ण होत आहेत. त्यासाठी बँकेत जाण्याची गरज उरली नाही. या तंत्रज्ञानाचे फायदे आहेत.

मात्र काही तोटे पण सहन करावे लागत आहेत.जलद गतीने डिजिटल इंडिया होणाऱ्या भारतात ऑनलाईन स्कॅम, फ्रॉड, फसवणुकीच्या घटनांमध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. सायबर भामटे ग्राहकांना गंडा घालण्यासाठी युत्त्या वापरत आहेत. तर विदेशी सायबर हल्ल्याची शक्यता नाकारता येत नाही. सायबर हल्ले मोठया प्रमाणात वाढत असून महिलांना आमिष दाखवणारी मॅसेज त्याच्या मोबाईल येतो ज्यामध्ये एक लिंक असते. त्या लिंकवर क्लिक केले की आपोआप मोबाईल फोन मध्ये एक दोर्न ज डाउनलोड होतात आणि मोबाईल फोन पूर्ण पणे हॅक करून मोबाईल मधील सर्व फोटो माहिती डेटा चोरून मोबाईल मधील फोन नंबर वर , ग्रुपवर काही अश्लील फोटो पाठवले जातात त्यानंतर लगेचच पैस्याची मागणी करणारे कॉल सुरु होतात. मित्रांना नातेवाईक यांना अश्लील फोटो पाठवून पैस्याची मागणी करतात. अशा घटना मानोरा तालुक्यात व वाशीम जिल्ह्यात घडत असून सायबर क्राइमला स्त्रिया आणि बालके बळी पडत आहेत.सगळ्या प्रकारचे सायबर क्राइम स्त्रियांच्या संदर्भात घडत असून ते बंद होण्यासाठी अधिक प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच नागरिकांनी यापासून सावध राहणे गरजेचे झाले आहे.

## बालविकास मंदिर प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत रौप्य पदक



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा बोरगाव रोड मालेगाव येथील विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य शालेय क्रीडा संचालयना द्वारे आयोजित जिल्हास्तरीय कराटे स्पर्धा मानोरा येथे पार पडलेल्या स्पर्धेमध्ये बालविकास मंदिर प्राथमिक शाळेचे घवघवीत यश या कराटे स्पर्धेमध्ये शाळेतील चार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यामधून पवन ज्ञानेश्वर सावळकर वर्ग सातवा या विद्यार्थ्याला वयोगट १४,वजन गट ५० या प्रकारात रौप्य पदक मिळाले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मु विठ्ठल भिसडे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार व अभिनंदन केले.व क्रीडा शिक्षक गणेश इढोळे यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेतील शिक्षक वृंदाचे सहकार्य लाभले. पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष विजयराव जाधव व सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक वृंद, कर्मचाऱ्यांनी केले.

## इस्कॉनच्या 'जीवनाचा मंत्र' या दोन दिवसीय आध्यात्मिक सत्राचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) तर्फे विठ्ठल मंदिर, विठ्ठलवाडी येथे दिनांक १३ व १४ सप्टेंबर रोजी 'जीवनाचा मंत्र (Mantra of Life)' या विशेष दोन दिवसीय आध्यात्मिक सत्राचे आयोजन करण्यात आले.



या सत्राचे मार्गदर्शन श्रीमान प्रिय गोपेश प्रभू, इस्कॉन हैद्राबाद येथील प्रख्यात प्रचारक यांनी केले. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात सुमारे ६० जणांनी सहभाग नोंदवला.

सत्रामध्ये कृष्णभावनामृत जीवनशैलीचे वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवी जीवनातील खरी समस्या आणि त्यावर आधारित आध्यात्मिक उपाय, तसेच मंत्रजप ध्यानाचे महत्त्व यांचे सखोल विवेचन करण्यात आले. कार्यक्रमात आध्यात्मिक प्रवचन, उत्स्फूर्त कीर्तन आणि सर्वांसाठी प्रसाद वितरण यांचा समावेश होता.

इस्कॉन वाशीम केंद्र, सिव्हिल लाईन्स येथे नियमितरित्या अशा आध्यात्मिक सत्रांचे आयोजन केले जाते. सर्व इच्छुक नागरिकांना या कार्यक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## चळवळकेंद्री कादंबरीच्या परंपरेत वेगळे स्थान निर्माण करणारी कादंबरी झोलांड - प्रा.डॉ.महेंद्र भवरे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

चळवळकेंद्री कादंबरीच्या परंपरेत वेगळे स्थान निर्माण करणारी रंगनाथ पिराजी धांडे यांची 'झोलांड ' कादंबरी आहे.असे झोलांड प्रकाशन समारंभ प्रसंगी फुले आंबेडकर वाड्मय कोषाचे मुख्य संपादक .प्रा. डॉ.महेंद्र भवरे यांनी प्रतिपादन केले. 'झोलांड ' कादंबरीचा प्रकाशन समारंभ पत्रकार भवनात दि.१३ सप्टेंबर रोजी सुप्रसिद्ध समीक्षक तथा फुले - आंबेडकारी विचारवंत प्रा.डॉ.महेंद्र भवरे यांचे हस्ते संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवी व समीक्षक प्रा.अशोक इंगळे होते.यावेळी ज्येष्ठ कवी लोकनाथ यशवंत, सुप्रसिद्ध चित्रकार श्रीधर अंभोरे ,समीक्षक प्रा.डॉ.शत्रुध्न जाधव, कवी प्राचार्य डॉ.मिलिंद बागुल ,पीरिपाचे राज्याध्यक्ष मा.गोपाळराव आटोटे गुरूजी, लेखक प्रा.रंगनाथ पिराजी धांडे आणि कवी शेषराव पिराजी धांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी जगप्रसिद्ध चित्रकार श्रीधर आंभोरे यांचा सत्कार करण्यात आला.कादंबरी प्रकाशन झाल्यानंतर यावेळी कवी लोकनाथ यशवंत म्हणाले, आताच्या काळात भारतीय साहित्याला नोबल मिळत नाही यांची खंत वाटते.आपण जे जीवन जगतो तेच लेखनात अवतरलं पाहिजे.डोळ्यांने जे बघतो तेच लिहा. तेच अस्सल असतं.लेखक जे लिहितो तो त्या काळचा इतिहास असतो.म्हणून जे जगतो तेच लिहा.कवी मिलिंद बागुल म्हणाले

चळवळ गतिमान होण्यासाठी लेखकांची भूमिका महत्वाची आहे.या झोलांड कादंबरीतून 'कार्यकर्ता जीवंत राहिला पाहिजे' हा संदेश प्रकर्षाने जातो.कादंबरीचे भाष्यकार प्रा.डॉ.शत्रुघ्न जाधव यांनी कादंबरीचे समीक्षणात्मक विश्लेषण केलं.या कादंबरीतला नायक राहुल हा कणखर आहे.अनेक संकटांना सामोरे जाणारा आहे.हा नायक सर्वसामान्य माणसातला आहे.मात्र त्याची निष्ठा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर अगाध आहे.

# सेवा पंधरवड्यासाठी रिसोड महसूल प्रशासन सज्ज

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महसूल विभागाच्या वतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'सेवा पंधरवडा' साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रिसोड तालुक्यातील महसूल प्रशासनाने विशेष तयारी सुरू केली आहे.



तहसील कार्यालय, रिसोड येथे तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत तालुक्यातील शेत रस्ते व पाणंद रस्त्यांचे सीमांकन करून त्यांना क्रमांक देणे, नकाशावर रस्त्यांची नोंद करणे, तसेच समाधान शिबिरे आणि संवाद सभेद्वारे तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याचे ठरले. गृहनिर्माण योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचा निर्णयही घेण्यात आला.

सेवा पंधरवडा अधिक प्रभावी करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्यात युवा संवाद, शेतकरी संवाद सभा, ग्रामसभा, निबंध स्पर्धा, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर, 'जिवंत सातबारा' उपक्रम आणि विमुक्त भटक्या जमातींसाठी 'आदिशेतू' योजना यांचा समावेश आहे. तसेच बंजारा तांड्यांना महसूली गावाचा दर्जा देणे आणि गावनिहाय अनाथ मुलांना शासनाच्या योजनांचा लाभ देणे यासंदर्भातही निर्णय घेण्यात आले.

**समाधान शिबिरे व स्मशानभूमी नियोजन :** रिसोड तालुक्यात २९ व ३० सप्टेंबर रोजी मंडळ स्तरावर समाधान शिबिरे आयोजित करण्यात येणार असून शेतकरी संवाद सभेद्वारे रस्त्यांशी संबंधित तक्रारींचे तातडीने निराकरण केले जाईल.

ज्या गावांमध्ये स्मशानभूमी नाही, त्या ठिकाणी जागा निश्चित करण्यासाठी संबंधित गावांनी प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश तहसीलदार तेजनकर यांनी दिले आहेत. बैठकीत नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि महसूल विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

'रिसोड तालुक्यातील सर्व नागरिकांनी सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत आयोजित शिबिरे, ग्रामसभा व कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी व्हावे. असे आवाहन तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी केले आहे.

# जनमाध्यम

E-paper - www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा, सोमवार १५ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४ ■ वर्ष - १३ ■ अंक- २८८


## भर पावसात ताडपत्रीचा वापर करून भारसवाडा (आर्वी) येथे अंत्यसंस्कार



**आर्वी जनमाध्यम**

तालुक्यातील भारसवाडा गावात जोरात पाऊस सुरू असताना, अंत्यसंस्कारासाठी पारंपरिक ताडपत्रीचा वापर करून मृतदेहावर पाऊस येऊ नये याची विशेष काळजी घेतली गेली. या अनोख्या पावसाळी परिस्थितीतही स्थानिकांनी अंत्यसंस्कारासाठी ताडपत्रीचा उपयोग करून पुढील अडचणी टाळल्या. ही घटना गावातील अस्पष्ट स्मशानभूमीच्या अभावाचा आणि अवघड पाण्याच्या हंगामात अंत्यविधी करण्याच्या आव्हानांचा दाखला आहे. गावकऱ्यांच्या एकजुटीने हा अंत्यसंस्कार यशस्वीपणे पार पडला.

# रमाई आवासच्या 561 घरकुलांना पालकमंत्री डॉ. भोयर यांची मंजूरी

### शौचालयासह लाभार्थ्यांच्या घराचे बांधकाम, लाभार्थ्यांना मिळणार ७ कोटींचे अनुदान, बांधकामासाठी प्रत्येकी १ लाख ३२ हजार

**वर्धा जनमाध्यम**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत लाभार्थ्यांना हक्काचे घर उपलब्ध व्हावे यासाठी रमाई आवास योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत जिल्ह्यात सन २०२४-२५ या वर्षासाठी पालकमंत्री डॉ. भोयर यांनी ५६१ घरकुले मंजूर केली आहे. या लाभार्थ्यांना बांधकामासाठी ७ कोटी ४० लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात घरकुलांना मंजूरी देण्याबाबत पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पालकमंत्री डॉ.भोयर यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, जिल्हा परिषद बांधकामचे कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त अंकेश केदार यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आर्थिक अडचणींमुळे अनेक गरीब कुटुंब आपले स्वत:चे पक्के घर बांधू शकत नाही. अशा कुटुंबांना स्वत:चे व हक्काचे घर



उपलब्ध व्हावे यासाठी शासन विविध घटकांसाठी घरकुलाच्या विविध प्रकारच्या योजना राबवितात. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी राबविण्यात येत असलेली रमाई आवास ही एक अत्यंत महत्वाची योजना असून या योजनेने या घटकातील हजारो गरीब कुटुंबांना हक्काची पक्की घरे उपलब्ध करून दिली आहे.

या योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागामधील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घरांच्या जागेवर २६९ चौरस फुटाचे पक्के घर शौचालयासह बांधून देण्यात येते. या योजनेची अंमलबजावणी ग्रामीण भागासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत केली जाते. घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय खर्चाची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यात ग्रामीण भागात घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्यांना १ लाख ३२ हजार रुपयांचे अनुदान दिले जातात.

पालकमंत्री डॉ. भोयर यांनी मंजूर केलेल्या ५६१ घरकुलांमध्ये आर्वी तालुक्यातील १६२ घरकुलांचा समावेश आहे. आष्टी तालुक्यातील ४४ घरकुले, हिंगणघाट तालुक्यातील ७९ घरकुले, कारंजा तालुक्यातील ७ घरकुले, सेलु तालुक्यातील ५५ घरकुले, समुद्रपुर तालुक्यातील १०६ घरकुले, वर्धा तालुक्यातील १०० घरकुले तर देवळी तालुक्यातील ८ घरकुलांचा समावेश आहे.

ज्या लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे, त्या लाभार्थ्यांना मंजूरीबाबत कळवून त्यांच्या घरकुलाचे बांधकाम तातडीने सुरु करण्याच्या सूचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी समाजकल्याणे सहाय्यक आयुक्त व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प अधिकारी यांना दिल्या आहे.

**जिल्ह्याला १ हजार घरांचे उद्दिष्ट**

रमाई आवास योजनेंतर्गत जिल्ह्याला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी १ हजार घरकुलांचे उद्दिष्ट आहे. यासाठी पात्र ठरलेल्या ५६१ लाभार्थ्यांना पालकमंत्र्यांनी मंजूरी दिली आहे. उर्वरीत ४३९ घरकुल मंजुरीची प्रक्रिया तातडीने पुर्ण करण्याच्या सूचना पालकमंत्री डॉ.भोयर यांनी बैठकीत दिल्या.

# 'बाप.. हाच माझा गुन्हा' विरूळची जोडी रंगभूमीवर ठरली विजय अनासपुरेचा हस्ते दांपत्याचा सत्कार

**विरुळ (आ,) / सचिन देवताळे**

सिनेसृष्टीतील राज्यस्तरीय भव्य स्पर्धेत विरूळचा 'बाप.. हाच माझा गुन्हा' हा लघुपट पहिल्या क्रमांकावर झळकला. राष्ट्रवादी काँग्रेस व सांस्कृतिक विभाग आयोजित स्त्री सक्षमीकरण या विषयावरील लघुपट, रील्स व डॉक्युमेंटरी स्पर्धेत या लघुपटाने राज्यभरातील प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत बाजी मारली.

या लघुपटात विरूळचे योगेश जाधव आणि पत्नी रेखा जाधव यांनी आई-वडिलांची मुख्य भूमिका उत्तमपणे साकारत आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. पुण्यात झालेल्या पुरस्कार सोहळ्यात सिनेअभिनेता मकरंद अनासपुरे यांच्यासह अरुण नलावडे, प्रभाकर मोरे, देविका दफ्तारदार, असित रेडीज आणि सुनील गोडबोले यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण झाले. खास करून जाधव दाम्पत्याचा मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार झाल्याने वातावरण दुमदुमले.

हा लघुपट नंदनवन फिल्म प्रोडक्शन अंतर्गत दिग्दर्शक व लेखक रीतेश अढाऊ आणि रोषण बोंद्रे यांनी साकारला आहे. त्याला निखिल नंदेश्वर, पूजा



कांबळे, दीपक पाटील, जयेश शिरभाते, गौरव बनसोडे, संतोष तायडे आणि अविनाश तेलंग यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

'बाप.. हाच माझा गुन्हा'च्या राज्यस्तरीय विजयानंतर विरूळ गाव तसेच जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, गावाकडील कलाकारांकडूनही मोठी स्वप्ने पूर्ण होऊ शकतात हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## पालकमंत्री डॉ. भोयर यांची भुजाडे कुटुंबाला सांत्वनपर भेट

### तातडीने मदत देण्याचे निर्देश

**पुलगाव जनमाध्यम**

जिल्ह्यात दोन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे नाचणगाव येथील बढे प्लॉटमधील घराची पडझड झाली.



या दुर्दैवी घटनेत भुजाडे कुटुंबातील एका ३२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला होता. जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. भोयर आणि आ. राजेश बकाने यांनी भुजाडे कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

या भेटीदरम्यान पालकमंत्री डॉ.भोयर यांनी पीडित कुटुंबाला तातडीने मदत देण्याचे निर्देश दिले. या कुटुंबाला घरकुल मंजूर असल्याने, प्राधान्याने घराचे बांधकाम सुरू करण्याचे त्यांनी सांगितले. तसेच, इतर शासकीय योजनांचा लाभही प्राधान्याने उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला केल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, संजय गाते, मंगेश झाडे, प्रशांत इंगोले, अरविंद भार्गव, माजी नगरसेवक आशीष गांधी, पुलगावच्या अपर तहसीलदार स्नेहा क्षीरसागर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना कारखेले, पोलिस निरीक्षक यशवंत सोलसे आदी उपस्थित होते.

## देवळीतील 41 वी श्यामसुंदरजी अग्रवाल स्मृती व्याख्यानमाला शुक्रवारी

**देवळी जनमाध्यम** – स्व. श्यामसुंदरजी अग्रवाल स्मृती व्याख्यानमालेच्या ४१ व्या वर्षातील कार्यक्रम मोठ्या उत्साहात होणार आहे. सलग ४१ वर्षे चालू असलेली ही व्याख्यानमाला या वर्षीही दोन दिवसांची असणार आहे.

पहिला दिवस, शुक्रवार १९ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता कविसंमेलनाने सुरू होणार आहे. यावेळी देशभरातील प्रख्यात कवी कविता सादर करून उपस्थितांचे मन जिंकणार आहेत.

या कविसंमेलनाचे अध्यक्ष आमदार राजेश बकाणे असतील तर प्रमुख अतिथी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते राहणार आहेत. प्रमुख सहभागी कवींमध्ये डॉ. खालिद नैयर, कुणाल दानिश, डॉ. शांतिलाल कोचर, कवी साहिल कुमार, ॲड. दिनेश शर्मा, ॲड. अनिकेत तापडिया व ॲड. इब्राहिम बख्श आजाद यांचा समावेश आहे.

व्याख्यानमालेचा दुसरा दिवस, शनिवार २० सप्टेंबर रोजी, माजी पोलीस महासंचालक भूषणकुमार उपाध्याय यांच्या विशेष मार्गदर्शनात होईल. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माजी पोलीस सहआयुक्त चंद्रकांत उदगीरकर व अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस असतील.

या सांस्कृतिक कार्यक्रमाचे मुख्य आयोजक वरिष्ठ समाजसेवक मोहन अग्रवाल असून, देवळी येथील श्यामसुंदर मन्नालाल अग्रवाल धर्मशाळा येथे हा कार्यक्रम होणार आहे.

नगर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या गौरवशाली सांस्कृतिक परंपरेला यशस्वी करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.ही व्याख्यानमाला देवळीची एक अभिमानास्पद सांस्कृतिक परंपरा असून देशभरातील मान्यवर कवी आणि साहित्यिकांची उपस्थिती यामुळे याला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

## जलजीवन मिशनच्या कामांच्या थकबाकीमुळे कंत्राटदार आर्थिक तंगीमुळे त्रस्त- खा.काळे

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्रात जलजीवन मिशन अंतर्गत शुद्ध पाणी पुरवठा योजनेचे काम करणाऱ्या कंत्राटदारांचे थकीत देयकाव्यवस्थेने गंभीर आर्थिक समस्या निर्माण केल्या आहेत. सांगली जिल्ह्यातील तरुण कंत्राटदार हर्षल पाटील यांनी १.४० कोटी रुपयांच्या थकबाकीमुळे आत्महत्या केल्याने या विषयाने भूमिकात्मक ताण वाढवला आहे.राज्य सरकारने विधान सभेत नोंदवलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्राला सलग २०२४ च्या ऑक्टोबरपासून केंद्राकडून जलजीवन मिशनसाठी निधीचा मिळकत नाही. त्यामुळे या योजने अंतर्गत ५१,५५८ योजना मंजूर होऊनही २६,००९ अजून सुरू आहेत. राज्य सरकारने निधी उपलब्ध करुन काम पूर्ण करण्यासाठी आपला निधी वापरत असल्याचे मान्य केले आहे.महाराष्ट्र स्टेट कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनच्या मते, राज्यात जवळपास ८९ हजार कोटी रुपयांच्या थकबाकी आहेत, ज्यात जलजीवन मिशन अंतर्गत १२ हजार कोटींची थकबाकी आहे. कंत्राटदारांनी ६५ लाख रुपयांचे कर्ज घेत कामं पूर्ण केली तरीही देयक न मिळाल्याने आर्थिक तंगी वाढल्याचा आरोप केला आहे.

# जगद्गुरू नरेंद्राचार्यजींच्या प्रेरणेने हरित संकल्पांची दिंडी

**वर्धा जनमाध्यम**

मोठ्या प्रमाणावर होत असलेली वृक्षतोड थांबविण्याच्या इशाऱ्यासह आणि पर्यावरण संवर्धनाचा ठोस संदेश घेऊन रामानंद संप्रदायाची 'वसुंधरा पायी दिंडी २०२५' नागपूर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र मोहगाव झिल्पी (ता. हिंगणा) येथून रत्नागिरी जिल्ह्यातील श्रीक्षेत्र नाणीजधामकडे निघाली आहे.

जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणेने आयोजित ही दिंडी सलग तिसऱ्या वर्षी निघाली असून, यावेळी आणखी दोन दिंड्यांचा सहभाग वाढल्याने ती अधिक भव्य स्वरूप धारण करत आहे. या प्रवासात तब्बल १०५९ किमी अंतर ४० दिवसांत पार केले जाणार असून सुमारे ६५० भाविकांचा सहभाग आहे.

स्वच्छतेचा आदर्श

या प्रवासाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वच्छता व शिस्त. भाविकांनी दररोज सुमारे २४ किलोमीटरचा प्रवास केल्यानंतर मुक्कामाची व्यवस्था केली जाते. कचरा व्यवस्थापनासाठी विशेष सेवेकऱ्यांची नियुक्ती आहे. दिंडीमार्गावर कुठलाही कचरा न राहता स्वच्छतेचा आदर्श निर्माण होतो आहे.

भाविकांच्या सोयीसाठी फिरते शौचालय व्हॅन, पाणी टँकर्स आणि अन्ननिवासाची सोय





करण्यात आली आहे.

वृक्षारोपण व आरोग्यसेवा

दररोज वृक्षारोपणाचा उपक्रम राबवला जात आहे. भाविकांच्या आरोग्यासाठी रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक सोबत कार्यरत आहे. सर्व वयोगटांतील महिला, पुरुष व तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग समाजातील एकात्मतेचे दर्शन घडवतो आहे.

**सामाजिक बांधिलकी**

नागपूरपासून रत्नागिरा पर्यंतचा हा प्रवास धार्मिक भावनेपलीकडे जाऊन सामाजिक संदेश देणारा ठरत आहे. स्वच्छता, वृक्षसंवर्धन, व्यसनमुक्ती, रक्तदान यासारख्या उपक्रमांबरोबर वसुंधरेच्या संरक्षणाचा संदेश देत ही दिंडी पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करते आहे.

ही दिंडी २१ ऑक्टोबर रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील श्रीक्षेत्र नाणीजधाम येथे पोहोचणार असून, त्याच दिवशी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींचा ५९ वा जन्मदिन उत्साहात साजरा केला जाणार आहे.

दिंडीचे खास वैशिष्ट्य- दररोज २४ किलोमीटर प्रवासानंतर मुक्कामाची व्यवस्था, भाविकांसाठी पोषक आहार, निवास, फिरते शौचालय आणि पाण्याची सोय, स्वच्छ कचरा व्यवस्थापन पथकामुळे मागे कुठलाही अपघाती कचरा न राहणे, दररोज वृक्षारोपणाचे आयोजन, स्वतंत्र वैद्यकीय पथक व रुग्णवाहिका सोबत.


*महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत*

**शाश्वत महिला शेतकरी उत्पादक कंपनी, सेलू वडगाव रोड, देवतारे हॉस्पिटल समोर ता. सेलू जि. वर्धा.**

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत शाश्वत महिला शेतकरी (10 K प्रकल्प) उत्पादक कंपनी सेलू येथे लेखापाल पदाकरिता दि, २०/०९/२०२५ पर्यंत ऑफलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्तपद | पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | लेखापाल (Accountant) | १ | B.Com १२वी (वाणिज्य) | संगणक ज्ञान आवश्यक |

मानधन / वेतन (10 K) प्रकल्प अंतर्गत मार्गदर्शक पत्रानुसार अदा करण्यात येईल, अर्ज प्रत्यक्ष FPC कार्यालयात सादर करावे.

**अध्यक्ष**
शाश्वत महिला शेतकरी
उत्पादक कंपनी सेलु


## नाशिकमध्ये राष्ट्रवादी स्टार प्रचारकावर पोलिसांचा 20 मिनिटांचा थांबवण्यात घोटाळा

**वर्धा जनमाध्यम :** नाशिकमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या अधिवेशनात पक्षाचे स्टार प्रचारक नितेश कराळे मास्तरांना शरद पवार यांची भेट घेण्यासाठी हॉटेलच्या गेटवर पोलिसांनी जबरदस्त अडथळा आणला. तब्बल १५ ते २० मिनिटे ताटकळत उभं राहिल्यानंतर त्यांना दूरध्वनीद्वारे संपर्क करून आणि जोरदार प्रयत्न करून हॉटेलमध्ये प्रवेश मिळवावा लागला. ही घटना राजकीय वर्तुळात मोठा गदारोळ उडवून टाकणारी आहे कारण राष्ट्रवादी गटातील दमदार आणि आक्रमक प्रचारकावरही अशा प्रकारची मनमानी लागू करणे विरोधकांसाठीही मोठा मुद्दा बनला आहे.

या घटनेने पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये संताप उफाळून आला असून 'जर स्टार प्रचारकांसोबतच असे वागणूक होत असेल तर सामान्य कार्यकर्त्यांचे काय उचित हक्क राहतील?' या प्रश्नाने वातावरण तापले आहे. यामुळे नाशिकचा राजकीय तापमान प्रचंड वाढला असून, भाजपच्या 'देवा भाऊ' कॅम्पेनला राष्ट्रवादी गटाकडून शेतकरी कर्जमाफी, रोजगार आणि अन्य गरजू मुद्द्यांवर मोर्च्यांनी पुरळ देण्याची रणनीती आखली गेली आहे.

नितेश कराळे मास्तर यांची दमदार शैली आणि आक्रमक भाषणशैली पक्षासाठी मोठा धन आहे.

मात्र या घटनांमुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उद्भवलेल्या तणावाचे राजकारणावर मोठे परिणाम दिसून येऊ शकतात. सत्तेच्या रणनितीत आता हा प्रसंग नवीन वळण घेण्याचा आस आहे, ज्याचा परिणाम आगामी काळात दिसून येईल.

## चोरट्यांचा धाडसी सुळसुळाट; सहा दुकाने फोडून लाखोंवर डल्ला

**हिंगणघाट जनमाध्यम –** शहरातील आठवडी बाजारात शनिवारी मध्यरात्री चोरट्यांनी धाडसी चोरीची घटना घडवून आणली.

अज्ञात चोरट्यांनी सहा दुकाने फोडून रोख रक्कम आणि साहित्य असा लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला.



मिळालेल्या माहितीनुसार, इंदिरा गांधी चौकाजवळील आठवडी बाजारातील दुकाने चोरट्यांनी धारदार शस्त्राने टिन शेड कापून फोडली. त्यानंतर त्यांनी दुकानातील रोख रकमेसह साहित्यावर हात साफ केला.

न्यू पायल ट्रेडर्स (धान्य) प्रवीण मॅडमवार, स्वस्त कापड दुकान सुरेश बसंतानी, सगुण मॉल जय बुलानी, दीपक किराणा दीपक पाखराणी, गुरुदेव लॉथ अशोक खिलवानी, शंकर हार्डवेअर सुनील जेस्वानी, चोरी झालेल्या दुकानाचे नावे आहे,

विशेष म्हणजे, विठोबा चौकाजवळील हे बाजारपेठेचे ठिकाण रात्री पोलिसांची गस्त असणाऱ्या भागात मोडते. तरीदेखील चोरट्यांनी धाडसाने दुकानांच्या छतावरून आत प्रवेश करून लाखो रुपयांचा माल व रक्कम लंपास केली. पुढील तपास हिंगणघाट पोलीस करीत आहे,

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# ‘अजित पवारांच्या अंगात पाकड्यांचे रक्त’

## संजय राऊतांची जहाल टीका; भारत-पाकिस्तान सामन्यांवरून जुंपली



**मुंबई-** पहलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर झालेल्या ऑपरेशन सिंदूरमुळे अनेक लोकांचे प्राण गेले. त्या जखमा अद्याप भरल्या गेलेल्या नसताना पाकिस्तानशी क्रिकेट सामना कशासाठी खेळत आहात? असा सवाल उपस्थित करत शिवसेना (ठाकरे) पक्षाकडून आज राज्यभरात आंदोलन केले जात आहे. पाकिस्तान बरोबर होत असलेल्या क्रिकेट सामन्याला शिवसेनेचा विरोध असून ‘माझे कुंकू, माझा देश’ हे आंदोलन केले जात आहे.या आंदोलनाची माहिती देत असताना शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी सामन्याला पाठिंबा देणाऱ्या नेत्यांवर जहाल टीका केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल केलेल्या विधानाचाही त्यांनी समाचार घेतला.

भारत-पाकिस्तान सामन्याबद्दल माध्यमांशी बोलताना अजित पवारांनी म्हटले की, खेळाकडे खेळाच्या नजरेतून बघावे की नाही बघावे. हा प्रत्येकाचा अधिकार आहे, तो संविधानाने आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेने दिला आहे. सत्ताधारी पक्षाच्या विरोधात काहीना काही भूमिका घेण्याचे निमित्त विरोधक पाहत असतात. फक्त त्या गोष्टीला भावनिक मुद्दा करू नये, असे माझे आवाहन आहे.

अजित पवारांच्या विधानावर संजय राऊत यांना माध्यमांनी प्रश्न विचारला असता ते चांगलेच संतापले. अजित पवारांवर टीका करताना ते म्हणाले, अजित पवारांच्या अंगात पाकड्यांचे रक्त वाहत आहे. अजित पवार अर्धे पाकिस्तानी आहेत. महाराष्ट्राचा मंत्री जर भारत-पाकिस्तान सामना पाहण्याची भाषा वापरत असेल तर ती राष्ट्रभक्त नागरिकाची भाषा नाही. पहलगाम येथे मृत्यूमुखी पडलेल्या २६ लोकांमध्ये तुमच्या घरातील कुणी असते तर तुम्ही असे बोलला नसतात. जर त्या २६ लोकांमध्ये तुमचा एखादा ठेकेदार जरी असता, तरी तुम्ही हे बोलला नसता.

संजय राऊत यांनी अजित पवारांबरोबरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही टीका केली. एकनाथ शिंदे यांचा पक्ष हा पक्ष नसून अमित शाह यांची छोटी कंपनी आहे. तात्पुरत्या स्वरुपात शेअर बाजारात टाकलेला माल आहे. देशाच्या आज भावना काय आहेत आणि ही लोक काय बोलत आहेत, असे संजय राऊत म्हणाले.माध्यमांशी बोलत असताना आज संजय राऊत यांनी बीसीसीआय, भाजपा आणि जय शाह यांच्यावर टीका केली. भारतीय क्रिकेट संघालाही आजचा सामना खेळायचा नाही. काही क्रिकेटपटूंशी आमचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संवाद झाला असून त्यांचा या सामन्याला विरोध आहे. मात्र त्यांची अडचण असल्यामुळे त्यांना सामना खेळावा लागत असल्याचा दावा, संजय राऊत यांनी केला.

# नागपूरच्या रूश सिंधूच्या डोक्यावर सौंदर्यवतीचा मुकुट

## मिस इंडिया इंटरनॅशनलचा किताब जिंकला




**नागपूर-**मिस इंडिया इंटरनॅशनल २०२५ चा सौंदर्यवतीचा मानाचा मुकुट नागपूरच्या रूश सिंधू या तरुणीने पटकावला आहे. ही स्पर्धा जिंकल्यानंतर ती नागपूरला पोहोचली. नागपूर विमानतळावर तिचे जंगी स्वागत करण्यात आले. मिस इंडिया इंटरनॅशनलचा किताब जिंकल्यानंतर रूश सिंधू आता २७ नोव्हेंबरमध्ये जपानची राजधानी टोकियो येथे होणाऱ्या मिस इंटरनॅशनल २०२५ स्पर्धेत हिंदुस्थानचे प्रतिनिधित्व करणार आहे. रूशने याआधी मिस युनिवर्स इंडिया २०२५ च्या टॉप ६ मध्ये स्थान मिळवले होते. मी हा खिताब जिंकला आहे, त्यामुळे मी प्रचंड आनंदी आहे. माझ्यासाठी हे स्वप्नवत आहे, असे रूश म्हणाली.

## संक्षिप्त



### लखनऊ एअरपोर्टव टेकऑफदरम्यान विमानात तांत्रिक बिघाड

**दिल्ली-**उत्तर प्रदेशातील लखनऊ विमानतळावर सुदैवाने मोठी दुर्घटना टळली आहे. रविवारी दिल्लीला जाणारे इंडिगोचे विमान टेकऑफ दरम्यान धावपट्टीवर थांबले. यावेळी वैमानिकाने वेळीच प्रसंगावधान दाखवत विमान थांबवले. यामुळे १५१ प्रवाशांचे प्राण वाचवले. यावेळी समाजवादी पक्षाचे खासदार आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्या पत्नी डिंपल यादव देखील या विमानात होत्या.दिल्लीला जाणारे विमानाने सकाळी ११ वाजता धावपट्टीवर येताच उड्डानासाठी वेग पकडला, परंतु तरीही हवेत उड्डाण करू शकले नाही. त्यामुळे धावपट्टी संपण्यापूर्वीच वैमानिकाने हुशारीने विमान थांबवले. या घटनेमुळे विमानातील प्रवासी घाबरले होते. मात्र वैमानिकाच्या हुशारीमुळे सर्व प्रवासी सुरक्षित असल्याची माहिती आहे. नंतर एअरलाइनने प्रवाशांसाठी दुसऱ्या विमानाची व्यवस्था केली.

### आयटीआर फाइलिंगसाठी आज शेवटचा दिवस

**मुंबई-**२०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी इन्कम टॅक्स रिटर्न (आयटीआर) फाईल करण्यासाठी आता केवळ आज आणि उद्याचा दिवस उरला आहे.




करदात्यांना १५ सप्टेंबरपर्यंत आयटीआर करण्याची अखेरची डेडलाईन आहे. त्यामुळे ज्या करदात्यांनी अद्याप आयटीआर फाईल केली नसेल त्यांनी लवकरात लवकर करणे गरजेचे आहे. गेल्या वर्षभरात ९ कोटींहून अधिक करदात्यांनी आयटीआर फाईल केली होती. आयटीआर दाखल करण्याची तारीख आधी ३१ जुलैपर्यंत होती, परंतु नंतर ही तारीख वाढवून १५ सप्टेंबरपर्यंत करण्यात आली. देशभरात १ कोटींहून अधिक इन्कम असलेल्या लोकांची संख्या वाढली आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत १० कोटींहून अधिक इन्कम असलेल्या १०,८१४ लोकांनी आयटीआर भरला आहे. जर करदाते असूनही दिलेल्या तारखेपर्यंत आयटीआर भरला नाही, तर त्या व्यक्तीला ५ हजार रुपये विलंब शुल्क भरावे लागेल. ज्या करदात्यांचे उत्पन्न ५ लाखांपेक्षा कमी असेल तर त्या व्यक्तीला १ हजार विलंब शुल्क भरावे लागेल. जर तुमच्या उत्पन्नातून कर कापला गेला असेल आणि तो सरकारकडे जमा झाला असेल, तर तुमचे उत्पन्न आयकरातील मूलभूत सूट मर्यादेत असले तरीही तुम्हाला आयटीआर दाखल केल्याशिवाय तो परत मिळू शकत नाही. जर तुम्हाला कर परतावा मागायचा असेल, त्यासाठी आयटीआर दाखल करणे आवश्यक आहे.

### कंगना राणावतला सुप्रीम कोर्टाचा झटका

**मुंबई-**अभिनेत्री आणि भाजप खासदार कंगना राणावत यांना शुक्रवारी सुप्रीम कोर्टाने झटका दिला.



२०२०-२१ मध्ये शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या पृषी कायद्यांविरुद्ध केलेल्या आंदोलनाशी संबंधित रिट्विटवरून कंगणा यांच्याविरुद्ध फौजदारी मानहानीची तक्रार दाखल झाली होती. ती तक्रार रद्द करण्याची मागणी करीत कंगणा यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तथापि, न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने याचिकेत हस्तक्षेप करण्यास स्पष्ट नकार दिला. तुमचे कोणते साधारण रिट्विट नव्हती. तुम्ही त्यासोबत स्वतःची टिप्पणी जोडली आणि त्यात मसाला टाकला, अशा शब्दांत न्यायालयाने कंगना यांना फटकारले.

### ऐश्वर्यानंतर अभिषेकही दिल्ली हायकोर्टात

**मुंबई-**ऐश्वर्या रायने ‘पर्सनॅलिटी राईट्स’साठी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.



तिच्या पाठोपाठ आता बॉलीवूड अभिनेता अभिषेक बच्चनने बुधवारी दिल्ली उच्च न्यायालयाचे दार ठोठावले. त्याने न्यायालयाला त्याच्या प्रसिद्धी आणि व्यक्तिमत्त्व हक्कांचे (इमेज अँड पर्सनॅलिटी राईट्स इन पब्लिक) संरक्षण करण्याची विनंती केली. त्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयाने गुगल, अॅमेझॉन, फ्लिपकार्ट, ईबे आदी प्लॅटफॉर्मवरील त्याच्या पर्सनॅलिटी हक्कांचे उल्लंघन करणारे कंटेंट हटवण्याचे निर्देश दिले.

### साई मंदिरातील प्रसाद, दर्शन, सुरक्षा आता एआयच्या नियंत्रणात

**शिर्डी-**श्री साईबाबा संस्थानात भाविकांच्या सुरक्षेसह दर्शन व्यवस्थापन अधिक सुकर करण्यासाठी अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित ‘पीपल काउंटिंग प्रणाली’ कार्यान्वित करण्यात आली आहे.



प्रिस्मा एआय या कंपनीच्या देणगीतून उपलब्ध झालेल्या या यंत्रणेचा शुभारंभ संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि प्रिस्मा एआयचे अध्यक्ष डॉ. श्रीराम अय्यर यांच्या हस्ते करण्यात आला.या वेळी संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी, सिसिटीव्ही विभाग प्रमुख राहुल गलांडे यांच्यासह प्रिस्मा एआयचे वरिष्ठ अधिकारी अमिताभ रॉय चौधरी उपस्थित होते.साईबाबा मंदिर व परिसरातील सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी, तसेच दर्शन व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित पीपल काउंटिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

# जीएसटीमुळे महाराष्ट्रातून २० लाख रुपयांची पाकीटमारी

## रोहित पवार यांची टीका



**मुंबई-**जीएसटीमुळे महाराष्ट्रातून २० लाख रुपयांची पाकीटमारी झाली अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केली. तसेच यासाठी पंतप्रधान मोदींनी माफी मागावी अशी मागणीही रोहित पवार यांनी केली.

जीएसटी माफ केला म्हणून वाहनांच्या शोरुममध्ये पंतप्रधान मोदींचा फोटो लावा असे आदेश देण्यात आले आहेत. त्यावर एक्सवर पोस्ट करून रोहित पवार म्हणाले की, मोदी साहेबांचा फोटो जरूर लावा, पण सोबतच ‘गेली सात वर्षे अव्वाच्या सव्वा GST वसूल करून देशातील जनतेची लाखो कोटी रुपयांची पाकीटमारी केल्याबद्दल माफी असावी’, अशी तळटीपही फोटोखाली देणार आहात का? GST मुळं सर्वात मोठी पाकीटमारी (२० लाख कोटी) तर महाराष्ट्रात झाली,मग महाराष्ट्रात तर प्रत्येक घरात ही तळटीप असलेले फोटोच लावावे लागतील.

कदाचित हे फोटो लावण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांना कल्पनाही नसेल पण नेत्यांना खूष करण्यासाठी आजूबाजूचे काही नेते अशा करामती करतात असेही रोहित पवार म्हणाले.

# ३२ टक्के आरक्षणातील सर्व प्रवर्ग रद्द करा

**मुंबई-**मराठा आणि ओबीसी मिळून ६० टक्के लोकसंख्या आहे. ३२ टक्के आरक्षणातच सरकारने वेगवेगळे प्रवर्ग केले आहेत. हे सर्व प्रवर्ग रद्द करून ओबीसीं साठी हे संपूर्ण आरक्षण खुले केले पाहिजे अशी मागणी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली.



मनोज जरांगे पाटील यांची मागणी

आंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी मंडल आयोगाने मराठा समाज मागास सिद्ध केल्याचे सांगितले. मात्र मराठा समाजाला जे दहा टक्के आरक्षण देण्यात आले आहे ते ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून देण्यात आले आहे. मर्यादा ओलांडून देण्यात आलेले आरक्षण टिकत नाही, हेच आम्ही वारंवार ओरडून सांगत आहोत. ओबीसीतून आरक्षण हा मराठयांचा हक्कच आहे. आम्ही वेगळे काही मागत नसल्याचेही ते म्हणाले.

# भाजप खासदार उज्ज्वल निकमांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती रद्द करा

## सरकारला कायदेशीर नोटीस

**मुंबई-**भाजप खासदार उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात यावी अशी मागणी पक्षकार संघ या संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. संस्थेने अॅड. असीम सरोदे यांच्यामार्फत सरकारला कायदेशीर नोटीस बजावली आहे. या नोटीसला सात दिवसांत उत्तर देण्यात यावे अन्यथा उच्च न्यायालयात दाद मागीतली जाईल, असा इशाराही नोटीसमधून देण्यात आला आहे.

उज्ज्वल निकम यांच्या विशेष सरकारी वकीलपदाची आणि राज्य सभेच्या सदस्यत्वाची एकाचवेळी नियुक्ती करण्याबाबत तातडीने घटनात्मक स्पष्टीकरण आणि कारवाईची मागणी नोटीसद्वारे करण्यात आली आहे. पक्षकार संघ या संस्थेचे सचिव मनीष देशपांडे



यांनी अॅड. असीम सरोदे, अॅड. श्रेया आवले, अॅड. रोहित टिळेकर यांच्यामार्फत ही नोटीस पाठवली आहे. विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम काम करू शकतात का? विशेष सरकारी वकील म्हणून काम करत राहिल्यास निकम यांना संविधानाच्या कलम १०२ अंतर्गत अपात्र ठरवता येईल का, असा सवाल विचारण्यात आला आहे.

# ‘देवाभाऊ’ला शरद पवार गटाचे ‘देवा तूच सांग’ने प्रत्युत्तर

**नाशिक –** आगामी महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर, राष्ट्रवादीच्या (शरद पवार) वतीने रविवारी येथे राज्यस्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराच्या दिवशी ‘देवा तूच सांग’ या जाहिरातीतून सत्ताधारी महायुती सरकारला लक्ष्य करण्यात आले. विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ या संत तुकोबारायांच्या ओळीचा संदर्भ देत शरद पवार गटाने राज्यात भेदभाव करून वाद वाढविण्याऐवजी मुद्याच बोलाष्ठ असे सत्ताधाऱ्यांना सुनावले आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या शिबिराला पंचवटीतील स्वामी नारायण कार्यालयात रविवारी सुरुवात झाली. यासाठी पक्षाचे प्रमुख शरद पवार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, सर्व खासदार, आमदार आणि प्रमुख नेते दाखल झाले आहेत. शिबिरात दिवसभरात विविध विषयांवर चर्चा होणार आहे. सायंकाळी शरद पवार हे पक्षाची वाटचाल आणि दिशा स्पष्ट करतील. रात्री ज्ञानेश्वर महाराज वाबळे यांचे तुकाराम विरूध्द नथुराम – हरी कीर्तन होणार आहे. सोमवारी गोल्फ क्लब मैदान येथून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर, पक्षाने स्थानिक दैनिकांमध्ये ‘देवा तूच सांग’ या ठळक अक्षरातील जाहिरातीतून विविध प्रश्नांकडे लक्ष वेधत हे स्वार्थी सरकार पुरस्कृत ग्रहण कधी सुटणार, असा प्रश्न केला




आहे. जाहिरातीतून शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेतकरी आत्महत्या, पीक विमा, पिकाला हमीभाव, भावांतर योजना, युवांना नोकरी, लाडक्या बहिणींना २१०० रुपये, कापूस आयात, असुरक्षित महिला, कांदा निर्यातबंदी, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान आदी प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले आहे. बळीराजाच्या हक्कासाठी मोर्चा काढण्यात येणार आहे. मराठा आरक्षणाबाबत निर्णय झाल्यानंतर गणेशोत्सवात ‘देवाभाऊ’ अशी जाहिरात प्रसिद्ध झाली होती. या जाहिरातीवर मित्रपक्षातील सत्ताधारी मंत्र्यांने कोट्यवधी रुपये खर्च केल्याचा आरोप मध्यंतरी आ. रोहित पवार यांनी केला होता. मराठा आरक्षणाच्या निर्णयाचे श्रेय दोन्ही पक्षांच्या नेत्यांना मिळू द्यायचे नाही असा हेतू होता का असा प्रश्न त्यांनी केला होता. या घटनाक्रमानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाने मेळावा आणि मोर्चाच्या पार्श्वभूमीवर, प्रसिद्ध केलेल्या ‘देवा तूच सांग’ जाहिरातीतून ‘देवाभाऊ’ जाहिरातीला प्रत्युत्तर दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# छटपूजा, दिवाळीनिमित्त मध्य रेल्वेच्या १,१२६ विशेष रेल्वेगाड्या

**मुंबई-**छटपूजा, दिवाळीनिमित्त मोठ्या संख्येने प्रवासी बाहेरगावी जतात. प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाने ९४४ विशेष रेल्वेगाड्यांचे नियोजन केले आहे. आता आणखी १८२ रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. छटपूजा, दिवाळीनिमित्त मध्य रेल्वेवरून एकूण १,१२६ विशेष रेल्वेगाड्या धावतील.

एका महिन्यावर दिवाळी येऊन ठेपली असून, प्रवाशांनी नियमित आणि विशेष रेल्वेगाड्यांची तिकीटे आरक्षित करण्यास सुरुवात केली आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन मध्य रेल्वेने विशेष रेल्वेगाड्यांच्या सेवेत वाढ केली आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस (एलटीटी) – सावंतवाडी रोड – एलटीटीदरम्यान आठ विशेष रेल्वेगाड्या धावतील.



गाडी क्रमांक ०११७९ एलटीटी – सावंतवाडी रोड साप्ताहिक विशेष रेल्वेगाडी १७ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबरदरम्यान दर शुक्रवारी एलटीटी येथून सकाळी ८.२० वाजता सुटेल आणि सावंतवाडी रोड येथे त्याच दिवशी रात्री ९ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०११८० सावंतवाडी रोड – एलटीटी साप्ताहिक विशेष सेवा १७ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबरदरम्यान प्रत्येक शुक्रवारी सावंतवाडी रोड येथून रात्री १०.२० वाजता सुटेल आणि एलटीटी येथे दुसऱ्या दिवशी सकाळी १०.४० वाजता पोहोचेल. या रेल्वेगाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, अरावली रोड, संगमेश्वर, रत्नागिरी, अडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ येथे थांबा असेल.

एलटीटी – दानापूर द्विसाप्ताहिक विशेष ४० फेऱ्या धावतील. गाडी क्रमांक ०१०१७ रेल्वेगाडी २७ सप्टेंबर ते १ डिसेंबरपर्यंत प्रत्येक सोमवार आणि शनिवारी एलटीटी येथून दुपारी १२.१५ वाजता सुटेल आणि दानापूर येथे दुसऱ्या दिवशी रात्री १०.४५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१०१८ रेल्वेगाडी २९ सप्टेंबर ते ३ डिसेंबरदरम्यान प्रत्येक सोमवार आणि बुधवारी दानापूर येथून रात्री १२.३० वाजता सुटेल आणि एलटीटी येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १२ वाजता पोहचेल.

# आयटीआयमध्ये १.२५ लाखांवर प्रवेश!

**मुंबई-**कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) प्रवेशासाठी आणखी एक संधी दिली आहे. तब्बल सहा फेरीत आतापर्यंत १ लाख २५ हजार ८२० विद्यार्थ्यांनी प्रवेश विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. आयटीआय प्रवेशासाठी दिलेल्या मुदतीत प्रवेश अर्ज सादर करू न शकलेल्यांना या महिनाअखेरपर्यंत म्हणजेच ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करुन प्रवेश घेता येणार आहे.

राज्यातील खासगी आणि शासकीय अशा १ हजार आयटीआयमध्ये विविध ट्रेड्ससाठी प्रवेश प्रक्रियेच्या सहा कॅप फेऱ्या आतापर्यंत पार पडल्या.

या सहा फेऱ्यांमधून आतापर्यंत १ लाख २५ हजार ८२० विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले. यामध्ये १ लाख ४ हजार २०० मुले व २१ हजार ६१९ मुली सहभागी झाल्या. शासकीय आयटीआयमध्ये ८८ हजार ४४४, तर खासगी आयटीआयमध्ये ३७ हजार ३७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. विभागनिहाय नाशिक (२४ हजार ३५२), पुणे (२३ हजार २७५) व नागपूर (२२ हजार



५०१) आघाडीवर आहेत. लोकप्रिय ट्रेडमध्ये इलेक्ट्रीशियन (२३ हजार ३६३), फिटर (१५ हजार ४२३) व वेल्डर (१२ हजार ९८५) अभ्यासक्रमांना सर्वाधिक पसंती मिळाली आहे.

या सहा फेऱ्यांनंतरही प्रवेश न घेतलेल्या किंवा नव्याने प्रवेश घ्यायचा आहे अशांना आता संधी देण्यात आली आहे. हे प्रवेश रिक्त जागांवर होणार आहे.

३० सप्टेंबरपर्यंत विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. आतापर्यंत झालेल्या प्रवेशांमध्ये इलेक्ट्रिशियनसाठी सर्वाधिक म्हणजे २३ हजार ३६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्या नंतर फिटर या ट्रेडला १५ हजार ४२३ आणि वेल्डर या अभ्यासक्रमांसाठी १२ हजार ९८५ प्रवेश झाले आहेत. गतवर्षी आयटीआयसाठी १ लाख २६ हजार ३७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले होते. यावर्षी सहाव्या फेरीपर्यंत १ लाख २५ हजार ८२० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.आता प्रशिक्षण महासंचालनालयाकडून वाढवलेल्या मुदतीमुळे प्रवेश वाढवण्याची संधी आयटीआयला मिळाला आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून जाहीर केलेल्या नव्या वेळापत्रकानुसार ज्या विद्यार्थ्यांना यापूर्वी प्रवेश अर्ज भरणे शक्य झाले नाही. तसेच अनेक विद्यार्थ्यांच्या अर्जातील चुकांमुळे किंवा प्रवेश अर्ज शुल्क भरणे शक्य न झाल्याने प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता आले नाही अशा विद्यार्थ्यांना या वेळापत्रकानुसार संधी देण्यात आली आहे. या वाढीव मुदतीत ज्या अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा आहेत, त्या जागांवर या विद्यार्थ्यांचे प्रवेश होणे अपेक्षित असल्याने आयटीआयसाठी गेल्या वर्षीएवढेच किंवा त्यापेक्षा अधिक विश्वास आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## कर्नाटकी राजकारण

महाराष्ट्रातील गुंतवणुकीचा ओघ कायम असून, विविध ठिकाणी माहिती-तंत्रज्ञान, गोदामे, अन्न प्रक्रिया उद्योग, डेटा सेंटर आणि लॉजिस्टिक हब प्रकल्प उभारणी करण्यासाठी सुमारे एक लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी राज्य सरकारने सामंजस्य करार केले. या प्रकल्पांच्या माध्यमातून ४७ हजार लोकांना रोजगार उपलब्ध होईल. गुंतवणूक सामंजस्य करारापैकी अनेक प्रकल्प कागदावरच राहतात; मात्र गेल्या ८ महिन्यांत पाच लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रकल्प मार्गी लागले असून, त्यांना देकारपत्रही दिली आहेत.एकीकडे राज्य शासन विकासाच्या दृष्टीने वेगाने पावले टाकत असतानाच शेजारच्या कर्नाटक राज्याने मात्र या मार्गात काटे पेरण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. कर्नाटक सरकारच्या गेल्या वर्षीच्या हिवाळी अधिवेशनात अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय घेतला. या धरणामुळे कोल्हापूर आणि सांगलीत दरवर्षी पूरस्थिती निर्माण होते. या धरणाची उंची आणखी वाढवली, तर कोल्हापूर आणि सांगलीला पुन्हा महापुराला सामोरे जावे लागेल, अशी भीती आहे. महाराष्ट्र व कर्नाटक सरकारमध्ये २०१९ मध्ये झालेल्या करारानुसार, १५ ऑगस्टपर्यंत अलमट्टी धरणातील पाणीसाठा ५१७ मीटरपेक्षा कमी ठेवायचा आहे; पण कर्नाटक सरकारकडून कराराचे पालन केले जात नसल्याने सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात महापूर येऊन तेथील जनतेला त्याचा नेहमीच फटका बसतो. आताही अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा प्रयत्न कर्नाटक सरकार करत आहे; मात्र तसा निर्णय झाल्यास सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली जाईल आणि निर्णयास सरकार स्थगिती मिळवेल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.सांगली आणि कोल्हापूर हे जिल्हे शेतीप्रधान असून, तेथे असंख्य व्यवसाय व उद्योग आहेत. दरवर्षी पुराची शक्यता निर्माण झाल्यास त्याचा त्या जिल्ह्यांच्या आणि थेट राज्याच्या विकासावर परिणाम होईल. सातत्याने प्रकल्पात पाणी शिरणे, हे कोणत्याही उद्योग-धंद्यास परवडणारे नाही आणि याचा गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो.तसेच शेतीचे अपरिमित नुकसान होईल, हे लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी हा इशारा दिला, हे बरेच झाले. सध्याच्या अलमट्टी धरणाच्या ५१९ मीटर उंचीमुळेच पावसाळ्यात सांगली-कोल्हापुरातील नागरिकांच्या पोटात गोळा येत आहे. कर्नाटकने या धरणाची उंची ५ मीटरने वाढवून ती ५२४ मीटर करण्याचा निर्णय घेतल्यामुळे महापुरांची भीषणता वाढण्याची शक्यता आहे. खरे तर, उत्तर कर्नाटकचा भूभाग हा तसा दुष्काळी व कमी पावसाचा आहे. सिंचनाच्या अभावाने तेथे विकास रखडला आहे. हे चित्र बदलण्यासाठी कर्नाटक शासनाने अलमट्टी धरण बांधण्याचा निर्णय पूर्वीच घेतला होता. कृष्णा नदीवर आणि भौगोलिकदृष्ट्या विजयपुरा जिल्ह्यात हे धरण २००५ मध्ये बांधले.धरणाची पाणी साठवण क्षमता १२३ टीएमसी इतकी आहे. हे जलाशय भरल्यामुळे बागलकोट जिल्ह्यातील मोठा भाग पाण्याखाली जातो; पण धरण उभारल्यामुळे उत्तर कर्नाटकात सिंचन सुविधा वाढली आणि तेथील लोकांचे जीवनमान सुधारले; पण २००५ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात महापुरामुळे प्रचंड नुकसान झाले. कित्येकांच्या घरात पाणी घुसले. पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग काही दिवस बंद राहिला. त्याचा उद्योग-व्यवसायांनाही फटका बसला. कोल्हापूर शहरात बहुतेक भागांत पुराचे पाणी शिरल्यामुळे निम्म्या अधिक शहराचे व्यवसाय व्यवहार खंडित झाले. कोल्हापूर-कोकणाला जोडणारे राज्य मार्ग बंद झाले. सलग दोन वर्षे अशी स्थिती निर्माण झाली.महापुराचे पाणी शेतात व वाड्या-वस्त्यांत तीन-तीन आठवडे तुंबून राहिले. अलमट्टी धरण बांधल्यामुळे त्याच्या जलाशयाचा फुगवटा निर्माण होतो. त्यामुळे कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतून वाहणाऱ्या कृष्णा आणि उपनद्यांचे पाणी प्रवाहित होत नसल्याने पुराचे पाणी बराच काळ साचून राहते, असा निष्कर्ष काढला. २०१९ व २०२१ मध्ये महापुराचे फटके बसत राहिले.अलमट्टी धरणामुळे पश्चिम महाराष्ट्राचा भूभाग संकटात सापडतो. कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाचा पहिला टप्पा पूर्ण केला असला, तरी त्यांना पुढचा टप्पा पूर्ण करायचा आहे. या धरणाची उंची वाढवण्यास महाराष्ट्र व आंध्रचा विरोध आहे. कृष्णा नदी वाटपविषयक ब्रिजेशकुमार न्यायाधीकरणाने धरणाला २०० टीएमसी साठवण क्षमतेसह ५२४ मीटर उंचीवर नेण्यास संमती दिली होती. त्याआधारे कर्नाटक सरकारने धरणाची उंची वाढवण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. या धरणाची उंची वाढल्यास सांगली आणि शिरोळला धोका निर्माण होणार असल्याचा इशारा महाराष्ट्राचे उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मागेच दिला होता.धरणाची उंची वाढवल्यावर, अलमट्टीतील पाणी विसर्जनाचे नियमन योग्य पद्धतीने केले जात नसल्यामुळे त्याचा फटका सागंली-कोल्हापूर जिल्ह्यांना अनेकदा बसला. म्हणूनच आता अलमट्टीची उंची किंचितही वाढवण्यास राज्य शासनाचा विरोध असल्याचे मत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीही व्यक्त केले. अलमट्टीचा आणि कोल्हापूर-सांगलीत येणाऱ्या महापुराचा काहीएक संबंध नसून, अलमट्टीचा कोणताही धोका नाही, असे संतापजनक विधान महाराष्ट्राचे माजी जलसंपदा सचिव नंदकुमार वडनेरे यांनी केले होते. त्यांच्या या विधानाचा आधार घेऊन काहीजणांनी धरणाची उंची वाढवण्यास राज्य सरकारची सहमती आहे, असा जावईशोध लावला होता. त्यानंतर यावरून काही मंडळी जाणीवपूर्वक महायुती सरकारच्या भूमिकेबद्दल गैरसमज पसरवू लागली होती; मात्र अलमट्टीची उंची वाढवण्यास राज्य सरकारचा स्पष्ट विरोध आहे, असा खुलासा विखे-पाटील यांनी केला. पावसाळ्यात महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांच्या जलसंपदा विभागात पुराच्या पाण्याचा विसर्ग करण्याबाबत अलीकडील काळात समन्वय दिसून आला.त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रातील पुराचे पाणी राज्यातील दुष्काळग्रस्त भागात वळवण्यासाठी 'महाराष्ट्र क्लायमेट रेझिलन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास जागतिक बँकेने संमती दिली; मात्र धरणाची उंची वाढल्यास या सर्व प्रयत्नावर पाणी पडण्याचा धोका आहे. त्यामुळे कर्नाटक काँग्रेस सरकारचे हे उपद्व्याप थांबवण्यासाठी केंद्र सरकारनेही महाराष्ट्र सरकारला सहकार्य केले पाहिजे. आता याबाबत काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महायुती सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) काढल्यानंतर आता प्रचंड आक्रमक झालेल्या ओबीसी समाजाच्या अनेक संघटनाची १३ सप्टेंबरला नागपुरात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत दसऱ्यानंतर मुंबईत भव्य मोर्चा काढून मराठ्यांना ओबीसीमध्ये आरक्षण देण्याच्या निर्णयाला विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर आता सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक तयारीचे वेध लागले आहेत.**

# राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक तयारीचे वेध?

ऐन गणेशोत्सवामध्ये पाच दिवस मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने घाईने राज्यात 'हैदराबाद गॅझेट' लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण नको या साठी नागपूरमध्ये ओबीसी समाजाची बैठक पार पडली, या बैठकीला विरोधीपक्षातील ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांची देखील उपस्थिती होती. ते म्हणाले की, या जीआरने मागस लोकांच्या अधिकारांवर कितीही धक्का लागणार नाही म्हटले तरी, धक्का बसला आहे. त्यामुळे ओबीसींचे नुकसान झाले. १० ऑक्टोबर रोजी ओबीसीचा प्रचंड मोठा महामोर्चा नागपुरात आयोजित करण्याचे या बैठकीत ठरले आहे. नागपूरच्या यशवंत स्टेडियममधून हा मोर्चा निघेल आणि संविधान चौकामध्ये या मोर्चाची सांगता होईल अशी माहिती यावेळी विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. दरम्यान सोमवारी नागपूर खंडपीठात याचिका दाखल करणार आहोत. इतर खंडपीठांमध्येही त्या-त्या ठिकाणचे कार्यकर्ते याचिका दाखल करतील, अशी माहिती यावेळी वडेट्टीवार यांनी दिली आहे. ते म्हणाले की मुख्यमंत्र्यांनी आम्हाला बोलवावे आणि चर्चा करावी, मात्र जो कोणी या जीआरचे समर्थन करत असेल, तो ओबीसींच्या लढ्याशी प्रामाणिक नाही असेच आमचे म्हणणे आहे, असेही यावेळी ते म्हणाले. या मोर्चात पक्षाच्या भूमिका बाजूला ठेवून जो जो या आंदोलनात येईल तो या मोर्चात सहभागी होऊ शकतो. या जीआर विरोधात ज्याला ज्याला राग आहे, रोष आहे त्याने या मोर्चात यावे असे आमचे आवाहन आहे, असेही यावेळी वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

**ओबीसीमध्ये 'प्रस्थापित आणि विस्थापीत' असा नवा संघर्ष?**

त्याच वेळी राज्य सरकारकडून घाईने स्थापन करण्यात आलेल्या ओबीसी मंत्र्याच्या उपसमितीची पहिली बैठक मुंबईत पार पडली. त्यात ओबीसींचे नेते छगन भुजबळ यांच्याकडून सरकारच्या जीआर बाबत आक्षेप घेण्यात आल्याचे सांगण्यात येते. ओबीसी मंत्र्याच्या या बैठकीनंतर उपसमितीचे प्रमुख बावनकुळे यांच्याकडून सारवासारव करण्यात आली. मात्र ज्या तत्परतेने जलसंपदामंत्री विखे पाटील यांच्याकडून हा जीआर काढण्याची घाई करण्यात आली त्यावर या मंत्र्यानी नाराजी व्यक्त केल्याचे सांगण्यात येत आहे. एवंच 'सरकार विरुध्द सरकार' असा हा मामला झाला की नाही. कारण सध्या विरोधीपक्षांची उणिव देखील या सरकारलाच भरून काढायची आहे ना राव. त्यामुळे नव्याने ओबीसी होवू घातलेले आणि आधीपासून ओबीसीमध्ये असलेले असे 'प्रस्थापित आणि विस्थापीत' असा नवा संघर्ष राज्यात उभा राहण्याची शक्यता आहे? त्याला येत्या काही महिन्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांच्या मतांच्या राजकारणाची पार्श्वभुमी असल्याने आता सरकारमधल्या मंत्र्याकडून अस्मितेच्या घोषणा देत मतांच्या टक्केवारीच्या राजकारणाचा हिशेब करत संघर्ष पेटवला जाणार आहे. असे राजकीय विश्लेषक मानतात.

**भाजपच्या शत-प्रतिशत राजकारणाचा धसका?**

**दुसरीकडे महायुतीच्या घटकपक्षांमध्ये २०२९च्या भविष्यातील राजकारणाचा वेध घेत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीत जास्तीत जास्त विधानसभा मतदारसंघातील स्थानिक राजकारणावर पकड मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.त्यात मुंबई महापालिकेसह ठाणे पुणे नागपूर संभाजी नगर या महत्वाच्या शहरांप्रमाणेच नाशिक पिंपरी चिंचवड, कल्याण डोंबिवली, नवीमुंबई, मिरा भाईंदर, वसई विरार, मिरजसांगली कुपवाड अहिल्यानगर अश्या अन्य शहरात देखील टोकाचा संघर्ष पहायला मिळण्याची चिन्हं आहेत. ही निवडणूक जिंकण्यासाठी आता सत्ताधारी तीन पक्ष सोबत असल्याचे चित्र असलेतरी भाजपच्या शत-प्रतिशत राजकारणाचा धसका घेतलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना मोठा धोबीपछाड देत भाजपकडून जास्तीत जास्त ठिकाणी ताकद वाढविण्या साठी मोठ्या प्रमाणात अन्य पक्षातून इनकमिंगवर जोर देण्यात आला आहे. अशी सूत्रांची माहिती आहे. दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मुंबई महापालिकेची निवडणूक केंद्रस्थानी असणार आहे. ही महापालिका ताब्यात घेण्यासाठी भाजपा, शिवसेनेचे दोन्ही गट ताकदीने काम करत आहेत. मनसे, राष्ट्रवादी, काँग्रेस सह यांच्या कडूनही या**



**निवडणूकीत जोरदार तयारी केली जात आहे. त्यातच काही दिवसांत ठाकरेंकडे असणारे काही माजी नगरसेवक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात गेले होते. आता हेच नगरसेवक पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंकडे परतणार असल्याची कुजबूज सुरू झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे यांच्याकडे गेलेले १५ ते ३५ नगरसेवक पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्याकडे परतण्याची शक्यता आहे. यात कोणकोणत्या माजी नगरसेवकांना ठाकरे स्विकारणार किंवा त्यांना काहीना मनसेमधून सोबत घेणार याबाबत सध्या उलटसुलट चर्चा सुरू आहेत मात्र माजी नगरसेवक उद्धव ठाकरेंना पुन्हा येऊन मिळण्याच्या या बातम्यांमध्ये मुंबईत ठाकरेंची ताकद चांगलीच वाढणार आहे.त्यातच उद्धव ठाकरे यांची मनसेशी युती करण्यासाठी बोलणी चालू असल्याने एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला मोठा धक्का बसू शकतो.**

शिंदे यांच्या पक्षात गेलेल्या एकूण ४६ माजी नगरसेवकांचा विजय २०१७मध्ये मूळ शिवसेनेच्या तिकिटावर झाला होता. त्यातील १५ माजी नगरसेवकांना ठाकरेंकडे पुन्हा घेण्यासाठी ठाकरेंच्या पक्षाने भूमिका घेतली पाहिजे, असे त्यापक्षाच्या आमदार, खासदारांचे मत असल्याचे सांगण्यात येते अर्था पक्षप्रमुख ठरवतील त्यानंतर नेमका काय निर्णय घेतला जाणार आहे, त्याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

मुंबई सह ठाणे नाशिक पुणे संभाजीनगर अश्या महत्वाच्या काही शहरात ठाकरे ब्रँण्डची शक्ती दाखविण्याचा फॉर्मुला ठरवला जात असल्याने महायुतीसाठी तो नवी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. मुंबईत तर मराठी विरुध्द हिंदीच्या मुद्द्यावर निवडणूकीचा माहोल तयार केला जात आहे. त्यातच भाजपने नुकतेच अमित साटम यांच्याकडे पक्षाचे अध्यक्षपद दिल्यानंतर त्यापक्षांत या पदावर इच्छुक असलेल्या जुन्या जाणत्या सुमारे डझनभर दिग्गजांचा हिरमोड झाला आहे, त्यामुळे भाजपच्या तिकीटवाटपानंतर त्याचा परिणाम दिसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुंबईत देवेंद्र फडणवीस यांचे उजवे हात समजले जाणारे मोहित कंभोज यांच्याकडून अचानक राजकीय संन्यास घेण्याच्या बातमीनंतर तर दया कुछ तो गडबड है असे मानले जात आहे. अर्थात विरोधकांकडून त्याचा राजकीय फायदा घेतला जाण्याची शक्यताही फारशी नसल्याचे सांगण्यात येत आहे. कारण सध्या मुंबईत वेगळेच राजकीय वारे असल्याची चर्चा आहे.

**काँग्रेस नेत्यांना जाग येण्यास सुरूवात?**

त्यातच आता महाविकास आघाडीत फाटाफूट होण्याची शक्यता हेरून काँग्रेसच्या नेत्यांना जाग येण्यास सुरूवात झाली आहे. 'बैल गेला झोपा केला' या म्हणी प्रमाणे राज्यातील भारतीय जनता पक्ष युती सरकारने शहरी नक्षलवादाचा बिमोड करण्याच्या नावाखाली आणलेल्या जनसुरक्षा विधेयका विरोधात विरोध पक्षांनी आक्रमक भूमिका घेण्याचा विचार आता काँग्रेसकडून मांडला जात आहे. या अत्याचारी विधेयकाविरोधात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) शिवसेना (उबाठा), माकपा, भाकपा, शेकाप यांच्यासह समविचारी पक्षाना सोबत घेवून आंदोलनाची हाक दिली असून बुधवार दिनांक १० सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व तालुका व जिल्हा स्तरावर हे आंदोलन करण्यात येणार आहे. जनसुरक्षा विधेयक हे हुकूमशाही पद्धतीचे असून सरकार विरोधातील आवाज दडपण्यासाठी या विधेयकाचा एका अस्त्रासारखा वापर केला जाण्याची भिती आहे. नक्षलवादाच्या बिमोड करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेले कायदे कठोर आहेत, त्यामुळे वेगळ्या कायद्याची गरज नाही पण सरकार अदानी सारख्या भांडवलदारांसाठी काम करत असून त्यांच्याविरोधात कोणीही आंदोलन करु नये, आवाज उठवू नये यासाठी हा कायदा वापरला जाऊ शकतो. या कायद्यानुसार कोणालाही अटक करण्याची, जेलमध्ये टाकण्याची तसेच संपत्ती जप्त करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. हा काळा कायदा हाणून पाडण्यासाठी विरोध पक्षांनी वङ्कामूठ केली असून १० सप्टेंबर व त्यानंतर २ ऑक्टोबर रोजी राज्यात आंदोलन केले जाणार आहे, अशी माहिती प्रदेश काँग्रेस कमिटीने दिली आहे.

तर दुसरीकडे काँग्रेस पक्षासह विविध राजकीय पक्षांच्या नरीमन पाईंट भागात मंत्रालयासमोरच्या कार्यालयांचे मेट्रोच्या कामासाठी सरकारच्या विनंतीवरून तात्पुरते स्थलांतर करण्यात आले होते. मेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याच जागी काँग्रेस पक्षासह सर्व कार्यालये नव्याने बांधून देण्याचे आश्वासन मेट्रो कार्पोरेशनने दिले होते पण आता मात्र काँग्रेस पक्षाला अंधारात ठेवून मेट्रो कार्पोरेशने ही जागा परस्पर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला विकली आहे. मंत्रालयासमोर नरीमन पाईंट येथे काँग्रेस पक्षाचे गांधी भवन हे कार्यालय तसेच राष्ट्रवादी काँग्रेससह विविध पक्षांची कार्यालये अनेक वर्षांपासून होती. मुंबई मेट्रो टप्पा ३ चे काम पूर्ण झाल्यानंतर फ्री प्रेस जर्नल मार्गावरील त्याच जागेत नव्याने कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करून राजकीय पक्षांना श्ईंॐ आणि श्ईंण यांनी कार्यालये देण्याची आवश्यक ती कार्यवाही करावी असा शासन आदेश २१ ऑक्टोबर २०१५ रोजी काढण्यात आला होता. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मेट्रोच्या कामासाठी तात्पुरत्या स्वरुपात कार्यालय हस्तांतरीत करावे असे पत्र दिनांक २ डिसेंबर २०१६ रोजी काँग्रेस पक्षाला दिले होते. आता मात्र मेट्रो कार्पोरेशन व सरकारने त्यांनी दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासला आहे. काँग्रेस पक्षाशी कोणतीही चर्चा न करता ही जागा परस्पर रिझर्व्ह बँकेला ३४०० कोटी रुपयांना विकण्यात आली आहे. ५ सप्टेंबर रोजी या व्यवहाराचे रजिस्ट्रेशनही करण्यात आले आहे. त्यामुळेच आता उशीराने जाग आलेल्या विरोधीपक्षांना जमीन अधिग्रहण प्रकरणात सरकार जर राजकीय पक्षांची अशी फसवणूक करत असल्याचा साक्षात्कार झाला आहे. नरीमन पाईंट येथील या जागेचे बाजारमूल्य ५२०० कोटी रुपये आहे पण ३४०० कोटी रुपयांचा व्यवहार करून १८०० कोटी रुपयांचे नुकसानही झाले आहे. हा व्यवहार अहंकारी, मनमानी तसेच गुन्हेगारी स्वरुपाचा असून तो तात्काळ रद्द करावा अशी मागणी काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी केली आहे.

**किशोर आपटे**

## डॉ.श्रीकांत जिचकार उड्डाणपूल: विद्वत्तेचा सन्मान...

नागपूर-अमरावती महामार्गावरील बोले पेट्रोल पंप चौक ते विद्यापीठ कॅम्पस चौक पर्यंतच्या नवनिर्मित उड्डाणपुलाचे नुकतेच लोकार्पण झाले असून या उड्डाणपुलाला 'ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार उड्डाणपूल' असे नाव देण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत हा लोकार्पण सोहळा पार पडला.डॉ. श्रीकांत जिचकार हे एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते, ज्यांना देशातील सर्वात जास्त शिकलेली राजकीय व्यक्ती म्हणून आज ही ओळखले जाते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ विचारवंत मा.गो.वैद्य आणि डॉ.श्रीकांत जिचकार यांचे नाते गुरुशिष्याचे होते. विशेष म्हणजे एन एस यू आय या काँग्रेस प्रणित विद्यार्थी संघटना तर्फे त्यांनी १९७७ मध्ये नागपूर विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या निवडणुकीत श्रीकांत जिचकार हे काँग्रेसप्रणीत पॅनलचे उमेदवार अध्यक्षपदाचे उमेदवार होते, तर समारंभाचे प्रमुख केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे संघप्रणीत विद्यार्थी परिषद पॅनलचे अध्यक्ष पदाचे उमेदवार होते. डॉ श्रीकांत जिचकार १९८० साली वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी ते महाराष्ट्र विधानसभेवर काँग्रेस तर्फे निवडून गेले आणि सर्वात तरुण आमदार होण्याचा मान त्यांनी मिळवला. युवा मंत्री म्हणूनही त्यांनी आपले योगदान दिले. पण वयाच्या अवघ्या पन्नाशीच्या आसपास याच नागपूर अमरावती महामार्गावर दुर्दैवाने अपघातात मृत्यूने घेरले.नागपूरच्या या महत्त्वाच्या उड्डाणपुलाला डॉ. श्रीकांत जिचकार यांचे नाव देऊन, राज्य सरकारने तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या विद्वत्तेचा आणि समाजासाठी दिलेल्या योगदानाचा यथोचित सन्मान केला आहे. या बद्दल हे दोघंही अभिनंदनास पात्र ठरतात.हा पूल केवळ दळणवळण सुलभ करणार नाही, तर डॉ. जिचकार यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्वाची आठवण करून देत राहील.

**अविनाश देशपांडे**

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

एकीकडे असणारा पाकिस्तानच आपल्याला डोईजड झाला आहे ,तर या निजामाने काय काय गुण उधळले असते ! किती भयंकर वाटते हे! संस्थानातील जनता भारतीय स्वातंत्र्याचाच आपण भाग आहोत असे समजत होती. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने ऑपरेशन 'पोलो' अंतर्गत तत्कालीन हैदराबाद राज्य भारतात विलीन करून घेतले. रजाकारांनी प्रचंड ताकदीने विरोध केला. मराठवाड्यातील संपूर्ण एक गावच रझाकारांनी जाळून टाकले. हैदराबाद मुक्तिसंग्रामाची अखेर पोलिस कारवाईत झाली. निजामाची लढाई १०९ तासात संपुष्टात आली. १९४८ च्या १३ सप्टेंबरला 'पोलो' ऑपरेशन सुरू केले आणि १७ सप्टेंबर १९४८ ला हैदराबादचा निजाम भारत सरकारला शरण आला. आणि हैदराबाद, मराठवाडा भारतात विलीन झाले .मराठवाडा मुक्ती संग्राम चे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले होते. सैनिकी ताकद आणि जनतेच्या प्रचंड विरोधामुळे जुलमी निजाम शरण आला. आणि तिथे सोनेरी पहाट उगवली. हा राष्ट्ररक्षणाचा, राष्ट्राविषयी समर्पणाचा इतिहास आपल्या मुलांना शाळा, महाविद्यालयातून आवर्जून शिकवला तर आपल्या सैन्याविषयी, राष्ट्राविषयी त्यांच्या मनात आदरभाव वाढून, त्यांच्यात राष्ट्राप्रती समर्पणाची वृत्ती निश्चितच निर्माण होईल.

**माधवी पत्की,** नागपूर

## लोकशाहीमुळेच सत्ता लोकांच्या हाती...

लोकशाही म्हणजे अशी शासनप्रणाली, जिथे अंतिम सत्ता लोकांच्या हाती असते आणि नागरिक थेट किंवा प्रतिनिधींच्या माध्यमातून या सत्तेचा वापर करतात.'लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांच्या हिताकरिता, लोकांकरवी चालवलेले राज्य' यात सामान्यतः स्पर्धात्मक निवडणुका, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांचे संरक्षण या गोष्टींचा समावेश असतो.आपल्याकडे समान नागरी कायदा नाही, विशीष्ठ वर्गासाठी आरक्षण आहे. व्यक्ती पेक्षा समाज आणि समाजापेक्षा राष्ट्र महत्वाचे आहे हे न समजणारे व्यक्ती स्वातंत्र्यवाले राष्ट्राला विनाशाकडे नेत आहेत असे म्हंटले तरी वावगे ठरणारं नाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य नागरिकांना आपले विचार मांडण्याचे आणि व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असते. मानवी हक्कांचे संरक्षण नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे संरक्षण केले जाते.सद्या अतिशय वेगाने सोशल मीडियाच्या प्लॅटफॉर्मवरुन विविध पोष्ट व्हायरल केल्या जातात मात्र आपल्याला लिहिण्याचे, बोलण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे म्हणून काहीपण आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध करता कमा नये घटनेने आपल्याला अधिकार दिलेत म्हणून आपण काहीही करु शकतो ही भावना धोकादायक ठरु शकते. मात्र राजकारणी याचा दुरुपयोग करतात याची वेळोवेळी प्रचिती येते.आपल्या देशासारखी लोकशाही जगाच्या पाठीवर कुठेही नसेल असे वाटते त्यासाठी आपले अधिकार आणि कर्तव्ये पाळली तर लोकशाही फार सुंदर आणि निकोप होवून भारत बलशाली होण्यास उभारी मिळेल.

**राजू जाधव**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

**आश्रमशाळांतील ५ ते १५ वयोगटातील बालकांसाठी मोहीम, १५ ते 30 सप्टेंबरपर्यंत अभियान**

# 32 हजार बालकांना देणार गोवर-रूबेला लस

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - गोवर-रूबेला आजाराचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील आश्रम शाळा आणि मदरसा मध्ये ३१ हजार ८६० बालकांना गोवर-रूबेला लस देण्यात येणार आहे. यासाठी आरोग्य विभागाचे २१२ पथक सज्ज झाले आहे. ही मोहिम १५ ते ३० सप्टेंबर या कालावधित राबविण्यात येणार आहे.

गोवर हा विषाणूमुळे होणारा साथीचा आजार आहे. हा आजार झाल्याने मुलांमध्ये मेंदूज्वर, अंधत्व, अतिसार, कानाच्या आणि श्वसन संक्रमणाचे (न्यूमोनिया) आजार दिसून येते. रूबेला मुळे गर्भवती स्त्रिया व नवजात बालकांमध्ये गंभीर परिणाम होऊ शकतात. या आजाराला विशेष उपचार उपलब्ध नसले तरी गोवर रूबेला (एम. आर.) लसीकरण हे सर्वात प्रभावी संरक्षण आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार यवतमाळ

जिल्ह्यामध्ये १५ ते ३० सप्टेंबर या कालावधीत गोवर रूबेला आजाराचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विकास मीना व मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांचे मार्गदर्शनाखाली विशेष लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेत जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ५ ते १५ वयोगटातील आश्रम शाळेतील बालकांना गोवर-रूबेला लस दिली जाईल. त्यासाठी आरोग्य विभागाने २१२ टीम सज्ज केले आहेत. गोवर-रूबेला लसीच्या २ डोस मधील ड्रॉप आउट रेट शून्यापर्यंत आणणे हा या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे लसीकरण मोहिमेची अंमलबजावणी योग्यरीत्या करण्यासाठी या मोहिमेत आरोग्य विभागासह शिक्षण विभाग, आदिवासी विभाग आणि महिला व बाल विकास विभाग सक्रिय सहभाग नोंदविणार आहे.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये एकूण ११४ आश्रम शाळा व १० मदरसा असून यामध्ये ३१ हजार ८६० बालके आहेत. सर्व बालकांचे लसीकरण करण्यासाठी आरोग्य विभागाच्या २१२ टीम सुसज्ज करण्यात आलेले आहेत. प्रत्येक टीम मध्ये प्रशिक्षित समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य साहाय्यक सहायिका, आशा कर्मचारी, अंगणवाडी सेविका व स्वयंसेवी कार्यकर्ता यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांच्यामार्फत सर्व जिल्ह्यातील आश्रम शाळेतील ५ ते १५ वयोगटातील बालकांचे लसीकरण करण्यात येणार आहे. याकरिता लसीचा साठा प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ठेवण्यात आलेला आहे.

गोवर रूबेला लसीकरणाचे उद्दिष्ट ९५ टक्के पेक्षा जास्त साध्य करणे आवश्यक आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व शिक्षकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन आपल्या शाळेतील १०० टक्के बालकाचे लसीकरण पूर्ण करावे. तसेच पालकांनी आपले बालके गोवर रूबेला लसीकरणापासून वंचित राहू नये, याबाबत काळजी घ्यावी, असे विकास मीना, जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी सांगितले.

## खोटा शिक्का बनवून गैरवापर ; एकावर गुन्हा दाखल

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस : तहसील कार्यालयासमोर असलेल्या कॉम्प्युटर टायपिंग ॲड ऑनलाइन वर्कच्या मालकाने वसंतनगर येथील इंजिनिअरचा खोटा शिक्का बनवून शासनाचा बांधकाम कामगारांसाठी मिळणाऱ्या योजनेसाठी गैरवापर केला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध दिग्रस पोलिसात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला. श्री सामतदादा कॉम्प्युटर टायपिंग ॲंड ऑनलाइन वर्कचा मालक निखिल भाऊसिंग चव्हाण (रा. दिग्रस) याने फिर्यादी राजेश जलसिंग जाधव (रा. वसंतनगर) यांचा इंग्रजीत इंजिनिअर असल्याबाबतचा खोटा शिक्का बनवून त्याचा गैरवापर केला. हा प्रकार लक्षात येताच राजेश जाधव यांनी दिग्रस पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीने यापूर्वी खोट्या शिक्क्याचा शासकीय कामासाठी वापर केला आहे का, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

# राष्ट्रीय लोकन्यायालयात ऐतिहासिक तडजोड

## अपघात प्रकरणात सॉफ्टवेअर इंजिनियरच्या कुटुंबाला दीड कोटींची नुकसान भरपाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद-राष्ट्रीयलोकन्यायालयाच्या माध्यमातून जिल्हा पातळीवर पुसद येथील १३/९/२०२५ रोजी लोकन्यायालयात एक ऐतिहासिक तडजोड घडली आहे. गोवा येथे २०१९ मध्ये झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या २८ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनियर स्नेहल हिच्या कुटुंबाला नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडून (एक कोटी ४० लाख) रुपयांची नुकसानभरपाई चेक स्वरूपात मिळाली. या तडजोडीमुळे लोकन्यायालयाची जलद आणि सामोपचाराने न्याय देणारी संकल्पना अधिक बळकट झाल्याचे अधोरेखित झाले.

या प्रकरणात स्नेहलचे पती चंद्रशेखर रामचंद्र हिंगणकर, वय ३२, आई व भाऊ यांना एक कोटी चाळीस लाख रुपयांची भरपाई देण्यात आली. सुरुवातीला सहा कोटी ५७ लाख रुपयांचा दावा दाखल करण्यात आला होता, मात्र दोन्ही पक्षकारांच्या संमतीने हा दावा सामोपचाराने निकाली काढण्यात आला. तडजोडीचा हा निर्णय लोकन्यायालयातील आजचा सर्वात मोठा निकाल ठरला. या प्रकरणात तालुका विधी सेवा समितीच्या अध्यक्षा तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. जे. रामगडिया, पॅनल प्रमुख न्यायाधीश एस. एन. शाह, पॅनल सदस्य ॲड. छाया देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही झाली. अर्जदार पक्षाचे वकील ॲड.मनोज घाडगे (माजी अध्यक्ष, पुसद वकील संघ) व नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडून पॅनल ॲड. अतुल चिद्दरवार, चीफ रिजनल मॅनेजर भावना बीडचंदानी व लीगल ऑफिसर प्रवीण काकडे यांनी सामोपचार घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला. "लोकन्यायालयामुळे वर्षानुवर्षे चालणारे वाद टाळून पक्षकारांना जलद, न्याय्य व समाधानकारक तोडगा मिळतो," असे प्रतिपादन तालुका विधी सेवा समितीच्या अध्यक्षा तथा न्यायाधीश रामगडिया मॅडम यांनी केले. या यशस्वी तडजोडीमुळे न्यायप्रणालीवरील ताण कमी होण्यासोबतच सर्वसामान्य नागरिकांमध्ये लोकन्यायालयावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. तडजोडीचा चेक मिळताच मृतक स्नेहलचे पती, आई व भाऊ यांनी समाधान व्यक्त केले. "तारखांवर तारखा खेळून वेळ वाया घालवण्याऐवजी लोकन्यायालयाच्या माध्यमातून जलद व न्याय्य तोडगा मिळणे हे अधिक फायदेशीर आहे," असे अर्जदार पक्षाचे वकील ॲड. मनोज घाडगे यांनी नमूद केले. या तडजोडीसाठी तालुका विधी सेवा समितीचे प्रमोद भोयर, ढाले, जगदीश जाधव, दीपक रणबावळे, सूर्यवंशी, एस.एन. सोनटक्के, यांनी अथक परिश्रम घेतले.

# बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करू नये – आदिवासी कृती समितीची राज्यपालांकडे मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीला आदिवासी कृती समितीने तीव्र विरोध दर्शवला आहे. यासंदर्भात समितीने एक निवेदन माननीय राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांना दिले असून, त्याची प्रत महागाव तहसीलदार अभय मस्के यांच्यामार्फत सादर करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, बंजारा समाजाच्या काही संघटना व नेते हैदराबाद गॅझेटचा आधार घेत महाराष्ट्रात अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी करत आहेत. परंतु ही मागणी असंवैधानिक असून, महाराष्ट्रातील मूळ आदिवासी समाजाच्या हक्कांवर व हितांवर गंभीर परिणाम करणारी आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, सध्या बंजारा समाज हा व्ही.जे. (VJNT) प्रवर्गात असून त्यांना ३.५ टक्के आरक्षणाचा लाभ मिळतो. तरीदेखील ते अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट होण्याचा प्रयत्न करत आहेत, जो पूर्णपणे बेकायदेशीर आहे. या प्रयत्नामुळे महाराष्ट्रातील मूळ ४५ अनुसूचित जमातींवर गंभीर अन्याय होईल, असा इशारा आदिवासी कृती समितीने दिला आहे. इतिहासाचा दाखला देत आदिवासी समाजाने म्हटले आहे की, भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३४२ नुसार अनुसूचित जमातींमध्ये समावेश करण्याचा अधिकार फक्त संसदेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सादर केलेल्या आयोगांमध्ये देखील बंजारा किंवा धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट केलेले नाही. कारण त्यांच्या भाषा, संस्कृती, जीवनशैली व पारंपरिक क्षेत्रे ही आदिवासी समाजापेक्षा वेगळी आहेत. आदिवासी समाजाने इशारा दिला की, जर बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात सामावून घेतले, तर पुढे धनगर समाजासह इतर जातीदेखील अनुसूचित जमातींमध्ये समावेश होण्यासाठी प्रयत्न करतील. ही बाब आदिवासी समाजाला मान्य नसून, त्यास ठाम विरोध केला जाईल. अनुसूचित जमाती हा स्वतंत्र प्रवर्ग असून त्यामध्ये फक्त मूळ आदिवासी जमातींचाच समावेश असावा, अशी मागणी समितीने केली. आदिवासी समाज हा शांत, संयमी आणि निसर्गावर अवलंबून असलेला समाज आहे. पण जर कुणी त्यांच्या समाजावर अन्याय करण्याचा प्रयत्न केला, तर संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि त्यातून उद्भवणाऱ्या परिणामांची जबाबदारी शासनावर राहील, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर शिवाजी डाखोरे (अध्यक्ष), तुकाराम भिसे, दिलीप भिसे, नागोराव ढोले (माजी सभापती), देविदास मोहकर (माजी जिल्हा परिषद सदस्य), पंढरीक भुरके (संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती), रामराव काळे, विठ्ठल धावस, विठ्ठलराव काळे, प्रल्हाद खराटे, दत्तात्रय खंदारे, विठ्ठल बरगे, अशोक रामराव ठाकरे, रामभाऊ बरगे, भगवान संभाजी भिसे, संतोष पोटे, विठ्ठल भडंगे, विष्णू साखरे, कोंडबा खोकले, संजय शिंदे, अशोक डुकरे, सुरज आसोले, शिवाजी खोकले, मंगल खंदारे, भगवान भिसे, लिंबाजी ठाकरे, संतोष व्यवहारे, बाळू रणमले, दिनाजी खोकले, प्रकाश ढगे यांसह महागाव तालुक्यातील मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी आपला झेंडा तयार करावा : माजी मंत्री बच्चू कडू

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड : या देशात अनेक पक्ष तयार झाले, अनेक झेंडे सुद्धा तयार झाले. परंतु कोणत्याही झेंड्याने शेतकऱ्यांना न्याय दिला नाही. सर्व झेंड्यांनी शेतकऱ्यांचा वापर त्यांच्या सोयीनुसार केला निवडणुका लागल्या की, अनेक झेंडे उदयाला येतात. मोठी आश्वासने देतात शेतकऱ्यांची मते मिळतात व त्यानंतर शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून देतात ही गेल्या अनेक वर्षाची परंपरा शेतकऱ्यांना बदलायची असेल तर त्यांना स्वतःचा झेंडा निर्माण करावा लागेल. याशिवाय शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. असे प्रतिपादन ढाणकी येथील हक्क यात्रेत बोलताना माजी मंत्री बच्चू कडू यांनी केले.

शेतकरी संघटित नसल्यामुळे त्याचा पूर्ण फायदा राजकीय पक्ष आपापल्या परीने घेतअसतात .निवडणूक आली तेव्हा महायुतीच्या प्रचारामध्ये सरसकट सातबारा कोरा करू अशा प्रकारची घोषणा फडणवीस यांनी केली होती. परंतु आजपर्यंत त्यावर कुठलीच कार्यवाही झालेली नाही. शेतकऱ्यांनी खोटे आश्वासन देणाऱ्यांना त्याची जागा दाखवली पाहिजे. आपण नेहमी निवडणुकीमध्ये जात पात, धर्म याचा विचार करतो आपला एकच धर्म असला पाहिजे तो म्हणजे शेतकरी त्याशिवाय आपले कल्याण होणे अशक्य आहे. देशाच्या प्रधानमंत्र्यानी शेतीमालाला दुप्पट भाव देतो असे सांगितले परंतु सोयाबीनचा आजही भाव चार हजाराच्या पार जात नाही. त्यांनी त्यांच्या अनेक कंपन्यांना हजारो कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. परंतु शेतकऱ्यांना देताना मात्र त्यांचा हात आखडला जातो .आज रोजी अमेरिकेतून येणार कापूस 27 हजार रुपये क्विंटल प्रमाणे आपण घेत आहोत. भारतीय कापसाला मात्र दहा हजार रुपये भाव सुद्धा भेटणे अवघड झाले आहे. मराठा आरक्षणासारखे मुद्दे उचलून मूळ विषयाला बगल देण्याचे काम व जाती-जातीत द्वेष निर्माण करण्याचं काम हे शासन करत आहे. शेतकऱ्याच्या मुळावर येणारा सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्प मी कदापि होऊ देणार नाही. त्यासाठी मला जे काय बलिदान करावे लागेल ते मी करण्यास तयार आहे असे आश्वासन त्यांनी सभेमध्ये दिले. शेतकऱ्यांना अनेक प्रश्न विचारून त्यांच्याकडूनच त्यांची उत्तरे गाडगेबाबाच्या स्टाईल मध्ये त्यांनी विचारली. सर्वत्र भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला असून ढाणकी शहरांमध्ये अवैध धंद्याला राजमान्यता आहे असे वक्तव्य यावेळी त्यांनी केले.

# महागाव तालुका कंत्राटदार संघटनेच्या अध्यक्षपदी अरबाज खान पठाण यांची निवड

**जनमाध्यम प्रतिनिधी**




महागाव - तालुक्यात कंत्राटदाराच्या माध्यमातून विविध विकासकामे करण्यात येतात शासनाकडून आलेला निधी व खासदार आमदार यांना मिळत असलेल्या निधीतूनही तालुक्यात विकास कामे साधल्या जातात ही कामे तालुक्यातील कंत्राटदार संघटने कडून व्हावी अशी इच्छा असते परंतु कंट्रकदाराच्या चढा ओढीमुळे तालुक्यातून कंत्राटदारांना कामापासून वंचित राहावे लागते शासकीय कामे तालुक्यातील कंत्राटदारांना मिळावी या उद्देशाने महागाव तालुका कंत्राटदार संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी अरबाज खान कय्युम खान पठाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

महागाव तालुका कंत्राटदार संघटना गेल्या अनेक वर्षापासून तालुक्यात कार्यरत आहे संघटनेची ध्येयधोरणे राबविण्यासाठी संघटनेत असलेले कंत्राटदार नेहमीच तत्पर असतात तांडा वस्ती दलित वस्ती 15 वा वित्त आयोग जन सुविधा ही कामे संस्थेअंतर्गत वाटप होणार नाही असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले तर आमदार खासदार स्थानिक निधी संघटनेमार्फतच कंत्राटदारांना मिळणे हा एकमेव उद्देश आहे तसेच सर्व विभागाची शासकीय ऑनलाइन निविदा संघटनेसोबत विचार विमर्स करूनच वाटपकरण्यात यावे हा या संघटनेचा उद्देश असून यासाठीच महागाव तालुका कंत्राटदार संघटनेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आलेली आहे सार्वजनिक बांधकाम महागावच्या विश्रामगरात रविवारी झालेल्या कंत्राकदाराच्या बैठकीत संघटनेचे अध्यक्षपदी अरबाज खान कयूम खान पठाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तर कार्याध्यक्षपदी प्रणय करे उपाध्यक्ष गोपाल सुरवसे कोषाध्यक्ष किशोर आडे सचिव बबलू मिश्रा सहसचिव अनिल चव्हाण सदस्य म्हणून जमीर नवाब सज्जात आली नितीन राठोड सदस्य सल्लागार आरिफ सुरैया अनिकेत वानखेडे विनोद खोंडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली यावेळी तालुक्यातील कंत्राटदार ताहेरो दिन सय्यद जमुरोदिन नवाब धीरज गावंडे पवन मस्के गजानन चव्हाण नितीन राठोड तारीख खान कैलास मोहिते आदी उपस्थित होते.

# कवीराज भोजन्ना यांचे कार्य स्तुत्य व अनुकरणीय आहे : मुख्याध्यापक

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - वयाची अंशी ओलांडूनही त्याच स्फूर्ती व जिद्दीने समाजातील व्यक्ती व संस्थांशी स्नेहभाव ठेऊन विद्यार्थ्यांशी प्रेम,आपुलकी व जिव्हाळ्याचे नाते जोपासत अनेक कविता व लेखांच्या माध्यमातून चैतन्य निर्माण करणाऱ्या भोजन्ना अरिपेलवार सरांचे कार्य स्तुत्य व अनुकरणीय असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापक गणेश धर्माळे यांनी आनंददायी शनिवार दिनी केले.

मातोश्री सुभद्राबाई जिल्हेवार माध्यमिक विद्यालय श्रीरामपूर येथे आनंददायी शनिवार अंतर्गत विद्यार्थ्यांना समाजातील प्रेरणादायी व्यक्तींचे मार्गदर्शन व दिलखुलास संवादाचे आयोजन करण्यात येते.शनिवारी बळिराजा काव्यास राज्यस्तरीय पुरस्कार मिळणारे सेवानिवृत्त शिक्षक पुसदचे कविराज भोजन्ना अरिपेलवार यांच्या काव्य गायन व लेख सादरीकरणाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश धर्माळे, प्रमुख अतिथी बाळकृष्ण मंदाडे विशेष अतिथी विनोद पडघने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून विद्येची देवता माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच अध्यक्षांच्या हस्ते कवी भोजन्ना यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कविराज भोजन्ना यांनी त्यांच्या नैसर्गिक,सामाजिक,थोर महापुरूषांच्या स्वलिखित कविता व लेखांनी विद्यार्थी प्रेरित झाले त्यांच्या प्रत्येक काव्यावर विद्यार्थ्या व शिक्षकांनी अभिनंदनरुपी टाळ्यांचा वर्षाव केला. यावेळी त्यांनी मुला परिस मुलगी बरी,बळीराजा, जोगवा, कॉन्व्हेन्ट वीर, हाऊस वाईफ नव्हे साऱ्या कुटुंबाची माता, परकी, महती ज्ञान विज्ञानाची, कोजागिरी, दप्तराचे ओझे, ज्येष्ठांच्या व्यथा तसेच देशभक्त व महापुरुषांच्या जीवनावर आधारित काव्य, सहलीचे उद्देश,पसायदानाचा अर्थ, राष्ट्रीय, सामाजिक, जिवन, नैतिक, व शाश्वत मूल्ये सांगुन आपल्या लेखांद्वारे विद्यार्थी व शिक्षकांची मने जिंकली त्यांना भरभरून प्रतिसाद मिळाला. यावेळी विनोद पडघने यांनी भोजन्ना अरिपेलवार यांची कविता व लेखांच्या माध्यमातून समाजजागृती, विद्यार्थ्यांशी ऋणानुबंध वाखानण्याजोगे असुन त्यांचे काव्य वास्तव,सरस,दर्जेदार असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमानंतर कविराज भोजन्ना अरिपेलवार यांनी महाराष्ट्राचे मातृपिठ (साने गुरुजी) व्याख्यानमाला व त्यांच्या कवितांचा संग्रह विद्यालयास भेट दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छाया वाघमारे यांनी तर आभारप्रदर्शन बाळकृष्ण मंदाडे यांनी केले.

# सभासदांचा विश्वास आणि संस्थेची प्रगती हेच आमचे ध्येय : शिवाजीराव माने

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - स्थानिक राज्यस्थानी भवन येथे सहकार महर्षी स्व.भाऊसाहेब माने शेतकरी सहकारी जिनिग अँड प्रेसिंग सोसायटी लिमिटेड र .नंबर १०४ उमरखेडची ६२ वी आमसभा संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव भाऊसाहेब माने यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी आमसभेमध्ये अहवालाचे वाचन व्यवस्थापक जोशी यांनी केले विचार पिठावर उमरखेडचे आमदार किसनराव वानखेडे, संस्थेचे मानद सचिव चिंतगराव कदम, उपाध्यक्ष अँड जितेद्र पवार, माजी आमदार विजय खडसे, डॉ . विजयराव माने, नितीन माहेश्वरी,कृष्णा पाटील देवसरकर, सुदर्शन रावते,भीमराव पाटील चंद्रवंशी, ॲन्ड अनिल माने, बळवंत नाईक, गणेशराव नरवाडे,रमेशराव चव्हाण,रमण रावते,सुरेश कदम, सर्व संस्थेचे संचालक मंडळ उपस्थीत होते.

यावेळी डॉ. विजयराव माने यांनी कापूस पेरा कमी झाल्यामुळे 200 हेडचा रेशीम प्लॅन्ट सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सभासदांना देऊन रेशीमला बाजार भाव मिळत नाही त्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देऊन स्वयंरोजगार करण्याच्या उद्देशाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. जिनीग अँड प्रेसिंग ला गाळ्याच्या रूपाने भाडयाने देऊन संस्थेने आर्थिक व्यवहार चालवण्यापेक्षा शेतकऱ्यांचा फायदा करून संस्थेला आर्थिक सुबकता आणण्यासाठी संस्था व शेतकरी दोघांनाही उत्तम पर्याय म्हणून रेशीम उद्योग करून नव्या युगाची सुरुवात करता येते यासाठी संस्थेच्या उपविधीत बदल करून 200 हेड क्षमतेचा पूर्ण स्वयंचलित रेशीम सूतगिरणी प्रकल्प प्रस्थापित करण्याचा संकल्प असून त्यासाठी जागेची निश्चिती करण्यात आली आहे असे सांगितले. यावेळी अध्यक्षीय भाषणातून शिवाजीराव माने यांनी संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ करून कामगारासह कर्मचाऱ्यांना दिलासा देऊन सन 2023 पूर्वी बंद असलेला कापूस प्रक्रिया युनिट नवीन संचालक मंडळांनी फक्त तीन-चार महिन्यात सुरु केला यामुळे पुन्हा जिनिंग प्रेसिंग सोय उपलब्ध होऊन संस्थेला आर्थिक पाठबळ मिळऊन दरवर्षी वृक्षारोपण, मंदिर सुशोभीकरण, कार्यालयाचे नूतनीकरण, रक्तदान शिबिर, कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड आणि बॅच, पुसद रोडवरील रोडवरील व्यापार संकुलन, विस्तारीकरणाची नियोजन एमआयडीसी लगत असलेल्या जमिनीचे अ कृषीक करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून संस्थेच्या सभासदांचा विश्वास आणि संस्थेची प्रगती हेच आमचे ध्येय असल्याचे स्पष्ट केले. यावेळी नितीन माहेश्वरी, कृष्णा पाटील देवसरकर यांनी आपले विचार मांडले. आभार संस्थेचे संचालक उद्धव गायकवाड यांनी मानले कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात सभासद शेतकरी वर्ग हजर होते.

# कारला येथे स्वच्छता अभियान व प्लास्टिक मुक्त मोहिम

## ब्रॅंड अँबेसिडर राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांचा पुढाकारातून राबविण्यात आले

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दुत राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांच्या द्वारे दिनांक 13 सप्टेंबर शनिवारी पुसद तालुक्यातील कारला येथे ओंकारेश्वर मंदिर परिसरात व गावात स्वच्छता मोहीम राबवून प्लास्टिक मुक्त अभियान यावेळी राबविण्यात आले आहे.

संत बाळगीर महाराज स्वच्छता अभियान आनंद दत्त धाम आश्रम माहुर द्वारे ब्रॅंड अँबेसिडर महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत राष्ट्रसंत साईनाथ महाराज यांनी पर्यावरणाचे रक्षण व संरक्षण करण्यासाठी कॅरीबॅगची होळी करून प्लास्टिक मुक्त करण्याचा संकल्प , स्वच्छता अभियान , झाडे लावा झाडे जगवा , बेटी बचाव बेटी पढाव , वेसन मुक्ती, शिक्षण , पाणी आडवा पाणी जिरवा, अशा विविध विषयावर जनजागृती करून पुसद तालुक्यातील कारला येथे महाराष्ट्र शासनाचे स्वच्छतादूत राष्ट्रसंत सदगुरु साईनाथ महाराज यांच्य संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला आहे यावेळी परिसरातील मोठ्या संख्येने महिला व पुरुष मंडळी व महाराजांचे शिष्य मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम राष्ट्र गीत घेऊन सुरुवात करून कारला देव मंदिर परिसरात व गावात सर्वत्र ठिकाणी हातामध्ये झाडू घेऊन संपूर्ण परिसर स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला आहे यावेळी परिसरातील कॅरीबॅग, प्लास्टिक कचरा जमा करून त्याची होळी करून नष्ट करण्याचा संदेश देऊन प्लास्टिक मुक्त गाव करण्याची शपथ घेतली आहे यावेळी माहूर येथील जवाहरलाल जयस्वाल , रणवीर पाटील, विष्णू वांझाळ, गजानन कलाने , चिकणे, निळू पाटील, राजेश कुबडे, पिंटू शिंदे, संतोष बाभळे , पंजाबराव माने, पत्रकार प्रशांत देशमुख व परिसरातील भक्त महिला व पुरुष मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वेचक

### व्हॉलीबॉल स्पर्धेत गुरुकुल शाळेचा 'चौकार' ! सलग चौथ्या वर्षी तालुकास्तरावर



पांढरकवडा - क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी यवतमाळ व तालुका क्रीडा अधिकारी पांढरकवडा यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धाचे आयोजन स्थानिक गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल येथे करण्यात आले. आयोजित स्पर्धेत शाळेतील विद्यार्थी सहभागी होत तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवित व खेळाचे उत्तम प्रदर्शन करीत जिल्हा स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत आपले नाव कोरले आहे. अतिशय चुरशीच्या झालेल्या या खेळामध्ये विद्यार्थ्यांनी १४ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये तसेच १७ वर्षाखालील मुलांच्या व मुलींच्या गटामध्ये ईरा इंग्लिश मिडीयम स्कूल वर विजय मिळवित जिल्हास्तरावर होणाऱ्या स्पर्धांमध्ये आपले नाव कोरले. व १९ वर्षाखालील झालेल्या मुलांच्या गटामध्ये संकल्प महाविद्यालया वर विजय मिळवित व्हॉलीबॉल खेळामध्ये आपले वर्चस्व कायम ठेवलेले आहे.मागील चार वर्षापासून दरवर्षी गुरुकुल शाळेच्या विद्यार्थ्यांचा व्हॉलीबॉल खेळामध्ये दबदबा कायम राहिला आहे तोच सतत ठेवत याही वर्षी विद्यार्थ्यांनी व्हॉलीबॉल खेळाचे उत्तम प्रदर्शन करीत जिल्हास्तरावर होणाऱ्या स्पर्धेकरिता आपले नाव कोरले आहे. यावेळी राष्ट्रीय कबड्डी खेळाडू वाहेद अली तालुका क्रिया संयोजक सुनील कोपुलवार, संस्थाध्यक्ष मदन जिड्डेवार,गणपत डोंगरे,विनोद ईखार,शाळेचे प्राचार्य स्वप्निल कुळकर्णी सोबतच विविध संघाचे प्रशिक्षक उपस्थित होते. या घवघवीत यशाकरिता विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय शाळेचे संस्थाचालक मदन जिड्डेवार,सचिव राजेश सातुरवार, संचालक वर्ग,प्राचार्य स्वप्निल कुळकर्णी,उपप्राचार्य अमित काळे,सर्व शिक्षक,पालक क्रीडा शिक्षिका नाझिया मिर्झा व रिया गाडेकर तसेच एकता स्पोर्टस क्लबला देतात. विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या या घवघवीत यशाकरिता सर्वच स्तरातून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होतो आहे. यानंतर होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन सुद्धा गुरुकुल शाळेमध्ये करण्यात आलेले आहे.

### महसूल प्रशासनाच्या आशीर्वादाने रेती तस्कर फोपावले




दिग्रस : महसूल यंत्रणेच्या नाकावर टिच्चून शहरात हमरस्त्यावर अनेक ठिकाणी अवैध पिवळ्या व काळ्या रेतीचा ठिय्या करून शहरात खुल्लेआम तस्करीचा बाजार सुरू आहे. स्थानिक महसूल यंत्रणेचे रेती तस्करांशी असलेले अर्थपूर्ण हित संबंधांमुळे महसूल यंत्रणा संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. रेती तस्करीचा आजही शहराच्या अनेक भागात अवैध रेतीच्या ठिय्यावरुन रेती तस्करीचा धुमाकूळ सुरू आहे .शहरात आठवड्यात पाच ते दहा ओव्हरलोड ट्रकने अवैध रेतीचा ठिय्या केला जातो. शहरात रात्री ट्रॅक्टरने रेती उपलब्ध करुन दिली जाते. रात्रीतुन रेती तस्करीचा गोरखधंदा सुरू आहे. महसूल यंत्रणेनेची नेहमीच कारवाईच्या बाबतीत शंकास्पद राहीली आहे. महसूल यंत्रणेना कर्तव्यात कसूर करत असल्याचे दिसून येते आहे. दिग्रस तहसील कार्यालय अनेक वर्षांपासून ठाम मांडुन असलेले अधिकारी, कर्मचारी रेती तस्करांवर मेहरबानी करत 'महसूल बुडवा' कार्यक्रम करत असेल तर चौकशी करून जिल्हाअधिकारी यांनी योग्य कारवाई करतील का? अशा प्रश्न उपस्थित होत आहे.

### पहेलगाम हल्ल्यात निष्पाप बळी घेणाऱ्या पाकिस्तान सोबत क्रिकेट सामन्याच्या विरोधात दिग्रस येथे उबाटा सेनेचे तीव्र आंदोलन



दिग्रस : पहलगाम हल्ल्यात निष्पाप लोकांचे बळी घेणाऱ्या पाकिस्तान देशा सोबत येत्या 14 सप्टेंबर 2025 भारत देश पाकिस्तान सोबत क्रिकेट चा सामना खेळून आमच्या भगिनी च्या सिंदूराचा अपमान करण्याचे काम करत आहे. याचा रविवार दिनांक 14 सप्टेंबर 2025 रोजी उबाटा सेनेचे पश्चिम विदर्भ संपर्कप्रमुख तथा खासदार अरविंद सावंत यांचे आदेशावरून दिग्रस येथील शिवाजी चौक येथे सर्व महिला व उबाटा सेनेची पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्र येऊन पाकिस्तानच्या विरोधात नारे बाजे करून भारताचे पंतप्रधान ना. नरेंद्र मोदी यांना निवेदन सादर करण्यात आले यावेळी दिग्रस तालुका प्रमुख रवींद्र अरगडे, शहर प्रमुख राहुल देशपांडे तसेच महिला प्रमुख संजीवनी कोळसे सह महिला व पुरुष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पाकिस्तान विरोधात घोषणा देत आंदोलन केले आहे. या आंदोलन करतेवेळी महिलांनी हमारा सिंदूर हमारा देश अशा घोषणा दिल्या देशाचे पंतप्रधान नामदार नरेंद्र मोदी यांना निवेदना मधून भारत विरोधी कारवाई करणाऱ्या पाकिस्तान सोबत भारताने क्रिकेट खेळू नये अशी मागणी निवेदनातून केली आहे.

# काउचपफी फर्निचर्स, ड्रीमलँडमध्ये 'अभी नहीं तो कभी नहीं'ची धमाल




### सोफा, डायनिंग आणि बेडरूम सेटवर मोफत रिक्लायनर

**अमरावती/का.प्र.**

भारतातील सर्वात मोठा प्रीमियम फर्निचर आणि एक्सक्लुझिव्ह गिफ्ट मॉल काउचपफी फर्निचर्स, ड्रीमलँड (१लाख चौरस फूट क्षेत्रफळामध्ये पसरलेला) यांनी ग्राहकांसाठी धमाकेदार ऑफर्ससह 'अभी नहीं तो कभी नहीं सेल' ला सुरुवात केली आहे.

या विशेष सेलमध्ये, २५,०००रुपयापेक्षा जास्त किमतीचे फर्निचर (सोफा, डायनिंग टेबल, बेडरूम सेट) खरेदी केल्यास २५,०००रुपये किमतीचा रिक्लायनर अगदी मोफत दिला जाणार आहे.

### सेंटर टेबल/ बेड/वार्डरोबवर मोफत ऑफिस चेअर

तसेच, सेंटर टेबल, बेड किंवा वार्डरोब खरेदीवर ५,००० रुपये किमतीची ऑफिस चेअर मोफत मिळणार आहे.

ग्राहकांच्या सोयीसाठी काउचपफी फर्निचर्स, ड्रीमलँड ने नुकतेच १०,००० चौरस फूटामध्ये एक्सक्लुझिव्ह ऑफिस फर्निचर शोरूम सुरू केले आहे.

येथे ऑफिस चेअर, गेमिंग चेअर, व्हिजिटर चेअर, ऑफिस टेबल, कॉन्फरन्स टेबल, वेटिंग लाउंज चेअर, एअरपोर्ट सोफा आणि इतर सर्व ऑफिस फर्निचर एकाच छताखाली उपलब्ध आहेत. विशेष ऑफर अंतर्गत,

### आर्टिफॅक्ट्स १४,९९० रुपये किंमतीवर ५,००० रु.किमतीची ऑफिस चेअर फ्री

१ व्हिजिटर चेअर खरेदी करा आणि दुसरी चेअर अगदी मोफत मिळवा ही योजना लागू आहे.

याचबरोबर, काउचपफी फर्निचर्स, ड्रीमलँड मध्ये आता ग्राहकांसाठी एक्सक्लुझिव्ह गिफ्ट आर्टिफॅक्ट्स गॅलरीही सुरू करण्यात आली आहे. या आधुनिक प्राचीन गॅलरीमध्ये भगवानांच्या मूर्ती, आधुनिक कला, घड्याळे, फुलं व कुंड्या, पितळी वस्तू आणि लाकडी गिफ्ट आर्टिकल्ससारखी प्रीमियम उत्पादने उपलब्ध आहेत.


खास ऑफर अंतर्गत,

### एक्सक्लुझिव्ह ऑफिस फर्निचर आणि गिफ्ट गॅलरी एकाच छताखाली

१४,९९०रुपये किमतीचे गिफ्ट आर्टिफॅक्ट्स खरेदी केल्यास ५,००० रुपये किमतीची ऑफिस चेअर अगदी मोफत दिली जाणार आहे.

ग्राहकांच्या सोयीसाठी बजाज ईझी फायनान्सची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

काउचपफी फर्निचर्स, ड्रीमलँड चे संचालक अनिलकुमार अग्रवाल यांनी ग्राहकांना आवाहन केले आहे की त्यांनी काउचपफी फर्निचर्स, ड्रीमलँड, रहाटगाव रोड, अमरावती येथील शोरूमला अवश्य भेट द्यावी आणि या अनोख्या ऑफर्सचा लाभ घ्यावा.




# संत साहित्यातून विश्वाला समृद्ध करा-डॉ. संजय उपाध्ये

**अमरावती/का.प्र.**

साडेसातशे वर्षापूर्वी ज्ञानेश्वर माऊलींनी स्वत: भोगलेले दु:ख बाजुला ठेवत जनकल्याणाकरीता ज्ञानेश्वरी साकारली. या ज्ञानेश्वरीतील पसायदान द्वारे माऊलींनी विश्व कल्याणाची मागणी केली. याच मागणीची स्विकार वर्तमान समाजाला करावा लागणार आहे. कारण विश्व कल्याणाची, शांतीची आणि समृद्धीची अपेक्षा करतांना सर्वप्रथम स्वत:पासून सुरूवात करावी लागणार आहे असा ज्ञानेश्वरी मंत्र अमृत वक्ता डॉ. संजय उपाध्ये यांनी अमृतमंथन व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुफंतांना श्रोता वर्गाला आणि समाजाला दिला.

वैचारिक प्रबोधानातून समाज प्रगल्भ होते, असाच समाज विश्वाचे नेतृत्व करु शकतो याची जाणीव आत्मसात करीत तुषार भारतीय मित्र परिवार मागील १३ वर्षांपासून अमृतमंथन व्याख्यानमालेचा ज्ञानयज्ञ धगधगत ठेवत आहे. यंदा या व्याख्यानमालेचे १३ वे वर्ष असून साईनगर परिसरातील बडनेरा मार्गावरील महेश भवन येथे आयोजीत अमृतमंथन व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प शनिवारी गुफंण्यात आले.



### अमृतमंथन व्याखानमाला दुसरे पुष्प

अमृत वक्ता डॉ. संजय उपाध्ये यांनी ज्ञानेश्वरी व पसायदान या विषयावर श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतांना जो जे वांछिल... या दुसऱ्या पुष्पाद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर अमरावती जिल्हा वारकरी मंडळाचे अध्यक्ष श्यामबाबा नितीच, व्याख्यानमालेचे आयोजक तुषार भारतीय उपस्थित होते. दुसऱ्या पुष्पाची सुरूवात दिपप्रज्वलन तसेच महाराष्ट्र गीताने झाली.

प्रत्येकाने आपापले काम प्रामाणिकपणे केले तर सर्वांच्याच इच्छा पूर्ण होतील. कारण स्वधर्म आचरणारा प्रत्येक जीव केवळ मंगल, पवित्र इच्छाच बाळगणारा असतो. समाजामध्ये जीवन जगतांना आपले कर्तव्य कोणते याची जाणीव भावी पिढीला करून देण्याची जबाबदारी वर्तमान कुटुंबाची, समाजाची आहे. त्याकरीता संत साहित्य एकमेव मार्ग असून प्रत्येकाने आपले आद्य कर्तव्य असून संत साहित्य आत्मसात करणे, त्याचे प्रबोधन युवापीढीमध्ये केल्यास विश्व धर्माची स्थापना होईल. तेव्हाच हा भारत देश विश्वगुरू होईल, तेव्हाच या विश्वात शांतता प्रस्थापित होईल. याकरीता संत साहित्यांना आत्मसात करून प्रथम स्वत:ला आणि नंतर विश्वाला समृद्ध करा असा ज्ञानेश्वरी मंत्र अमृतवक्ता डॉ. संजय उपाध्ये यांनी अमृतमंथन व्याख्यानाचे दुसरे पुष्प : जो जे वांछिल गुंफतांना दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक द्वारे आयोजक तुषार भारतीय यांनी समाजातील गरजूंना मदत करावी, त्यांना व समाजाला सक्षम करण्याचे आवाहन समाजाला केले. यावेळी होतकरू व प्रतिभावंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. संचलन चेतन गावंडे यांनी तर आभार रेखा भुतडा यांनी मानले. व्याख्यानमालेच्या दुसऱ्या पुष्पाला मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते.

# आ.खोडके यांच्या हस्ते बालाजी मंदिर रस्त्याचे भूमिपूजन

**अमरावती/का.प्र.**

शहरातील रेल्वे ओव्हरब्रिज धोकादायक असल्याने सर्वच प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यापार्श्वभूमीवर वाहतूक नियंत्रित करण्यासाठी मुख्य बाजारपेठांना जोडणाऱ्या अप्रोच मार्गावर सुरक्षित वाहतुकीची सुविधा निर्माण व्हावी म्हणून उपयोजना सुरू आहेत. शहरातील पोच रस्त्यांची दुरुस्ती, रुंदीकरण, प्रकाश व्यवस्था, तसेच पार्किंग या संदर्भात सुद्धा सूक्ष्म नियोजन करून उपयोजना करण्यासाठी प्रशासनासोबत सुसंवाद करून तत्पर भूमिका घेतली जात आहे. शहरातील वाढती वर्दळ व रहदारी लक्षात घेता शहराच्या मुख्य बाजारपेठेला जोडणाऱ्या अप्रोच रस्त्यांवर चांगली सुविधा निर्माण करण्यास आपले सर्वोतोपरीने प्राधान्य राहणार असल्याचा विश्वास आ.सुलभा खोडके यांनी व्यक्त केला.

अमरावती महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १३ अंबापेठ अंतर्गत वसंत टॉकीज नजीकच्या बालाजी मंदिर परिसरातील रस्ता काँक्रिटीकरण कामाचे



भूमिपूजन आमदार महोदयांनी कुदळ मारीत व नामफलकचे अनावरण करून विकास कामाचा शुभारंभ केला. वसंत टॉकीज मार्गावरील बालाजी मंदिर येथे विविध धार्मिक उपक्रम होत असून आजूबाजूच्या परिसरात लोक वसाहती व मार्केट दुकाने आहेत. तसेच हा पोच रस्ता दोन रस्त्यांना जोडणारा आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून रस्ता दुर्लक्षित व नादुरुस्त असल्याने स्थानिक भागात समस्या निर्माण झाली होती. अशातच आता आ. सुलभा खोडके यांच्या पुढाकाराने रस्ता काँक्रिटीकरणाचे काम मार्गी लागल्याबद्दल स्थानिक नागरिकांच्या वतीने आमदार महोदयांप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचा यतोचित सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर शहराच्या विकासाला नवे स्वरूप प्राप्त होण्यासाठी नेहमीच नवनवीन संकल्पना मांडून याबाबतचे नियोजनासाठी सदैव अग्रणी राहणारे यश खोडके यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. आगामी सण-उत्सवाचा काळ लक्षात घेता विकास कामे करतांना कुठलीही गैरसोय होवू नये, म्हणून सदरचे काम जलदगतीने व दर्जेदार-गुणवत्तापूर्वक करण्याबाबत सुद्धा संबंधित कंत्राटदाराला आमदार महोदयांच्या वतीने सूचना करण्यात आली. यावेळी स्थानिक भागतील नागरिक, व्यापारी बांधव, महिला भगिनी तसेच सर्व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# संक्षिप्त

## महिला महाविद्यालयात पोषण सप्ताह

**अमरावती-** स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय, अमरावती येथील गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने पोषण सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर होत्या, तर उद्घाटन सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. पुष्पा थोरात यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी त्यांनी पोषण सप्ताह साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना समतोल आहाराचे महत्त्व, मासिक पाळी, गर्भावस्था आदी स्त्रियांच्या विविध अवस्थांमधील पोषणाच्या गरजा यावर शास्त्रोक्त मार्गदर्शन केले. 'सप्तरंगी थाळी' या थीमवर आधारित या स्पर्धेत कनिष्ठ विभागातून सानिया पैठणकर हिने प्रथम, महिमा कोरमकर हिने द्वितीय तर वैष्णवी कुलकर्णी हिने तृतीय क्रमांक पटकावला. वरिष्ठ विभागातून आचल तायडे प्रथम, विधी हिरुळकर द्वितीय आणि प्रियंका वासनिक तृतीय क्रमांकावर राहिल्या. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. संजीवनी मोगरकर व मनीषा जोशी यांनी केले.आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. 'पोषणमूल्यापेक्षा अन्नस्वच्छता आणि सुरक्षितता अधिक महत्त्वाची आहे' या विषयावर झालेल्या स्पर्धेत कस्तुरी शेरेकर हिने प्रथम, पूजा कुलकर्णी हिने द्वितीय आणि रेवती रोंगे हिने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेचे परीक्षण डॉ. मंजुषा धापूडकर आणि प्रा. अपर्णा तीनखेडे यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. भावना वासनिक यांनी केले, तर संचालन व आभार प्रदर्शन डॉ. कल्पना गावंडे यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील प्रा. ईशा नरोटे, डॉ सोनाली धांडे , प्रा. सोनाली पांडे, प्रा. प्रियंका चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## आज ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मोरे यांचे प्रबोधन


**अमरावती-**गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट राधानगर येथे उद्या सोमवार १५ सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठ वाजता जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान देहूचे अध्यक्ष ह. भ. प. पुरुषोत्तम महाराज मोरे यांच्या प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे यात्प्रसंगी अतिथी म्हणून अमरावती विभागीय माहिती आयुक्त रवींद्र ठाकरे, भारत सरकारचे सेवानिवृत्त विशेष सचिव अनिल जोशी नागपूर, गुरुकुंज आश्रम मोझरीचे डॉ. राजाभाऊ बोथे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गाडगेबाबा अध्यासन केंद्राचे अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे उपस्थित राहणार आहेत.समारंभाच्या अध्यक्षस्थानी जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष व गुरुदेव सेवाश्रम ट्रस्टचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सतीश तराळ राहतील.याप्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## 17 ला भारतीय बौद्ध महासभेचा महामोर्चा

**अमरावती-**महाबोधी महाविहार मुक्तीसाठी बुधवार १७सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता अमरावती जिल्हा कचेरीवर मोर्चा काढण्यात येणार आहे.महाबोधी महाविहार हे जागतिक बौद्धांचे पवित्र स्थळ असून त्याचे व्यवस्थापन बौद्ध समाजाच्या ताब्यात यावे, ही बौद्ध समाजाची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे; मात्र शासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याने भारतीय बौद्ध महासभेने संघर्षाची भूमिका घेतली आहे.या मोर्चामध्ये जिल्ह्यातील हजारो अनुयायी सहभागी होणार असून, मागणी मान्य न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा भारतीय बौद्ध महासभेने दिला आहे.मोर्चात समाजातील विविध आंबेडकरी संघटना, समता सैनिक दल, बौद्ध भिक्षु संघ, युवक-युवतींनी हजारोच्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर, प्रा.डा. मुकेश सरदार, गणपत तिडके, प्रा. डा. रमेश बडगे, प्रा. डा. प्रमोद भालेराव, ललित कांबळे, माया धांडे, संगीता सरदार, विद्या वानखडे, उमा वानखडे, मालती मेश्राम, निर्मला नागले, राजेश चौरपगार, पुरुषोत्तम वंजारी, विलास आठवले, राहुल शेंडे, प्रमोद वानखडे, बळवंत गाठे, प्रमोद खाडे, निलेश वानखडे, पत्रकार नयन मोंढे यांनी केले आहे.

## भारतीय बौद्ध महासभेची कार्यकारिणी गठीत

**चांदूर रेल्वे-**भारतीय बौद्ध महासभेची सर्वसाधारण सभा स्थानिक लुंबिनी बुद्ध विहार,मिलिंदनगर येथे उत्साहात पार पडली.यामध्ये भारतीय बौध्द महासभेचे महिला व पुरूष यांची तालुका व शहर कार्यकारिणी सर्वानुमते तालुकाध्यक्षपदी प्रकाश रंगारी, तर महिला शाखेच्या तालुका अध्यक्षपदी ललिता राजेंद्र वानखडे यांची नियुक्ती करण्यात आली.अध्यक्षस्थानी महासभेचे अध्यक्ष सुनिल वानखडे,तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर,जिल्हाध्यक्ष माया धांदे,जिल्हा सरचिटणीस गणपत तिडके,उपाध्यक्षा माधुरी चौरपगार,उपाध्यक्ष विलास आठवले,पुरूषोत्तम वंजारी,संघटक राजेंद्र भटकर,संजय गडीकर,संस्कार विभागा जिल्हा सचिव मीना आठवले यांची उपस्थिती होती. यावेळी भारतीय बौध्द महासभेची तालुका कार्यकारिणीची नियुक्ती करण्यात आली.त्यामध्ये तालुकाध्यक्ष प्रकाश रंगारी, प्रेमचंद अंबादे ,चंद्रपाल मोहोड , ललिता रालेंद्र वानखडे ,सरचिटणीस लक्ष्मी राजेश मेश्राम व अनिता जनार्दन श्रीरामे यांची नियुक्ती करण्यात आली.



### तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव स्पर्धेमध्ये

# उत्तमसरा माध्यमिक शाळेचा प्रथम क्रमांक

**अमरावती/का.प्र.**

तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव २०२५- २६ स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, उत्तमसरा या शाळेने प्रथम क्रमांक प्राप्त करून बाजी मारली.

रेड रोज कनिष्ठ महाविद्यालय, आष्टी येथे घेण्यात आलेल्या भातकुली तालुकास्तरीय नाट्योत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण दहा शाळांचा समावेश होता. विज्ञान नाट्य सादरीकरणासाठी ३० मिनिटांला ५० गुण, नाट्यातील वैज्ञानिक माहितीस ३० गुण व नाट्याच्या परिणामकारकतेस २० गुण



अशा पद्धतीने गुणांकन होते. विज्ञान नाटकाच्या दर्जेदार सादरीकरणाकरिता पोस्टर्स, बॅनर्स, दृकश्राव्य साधन, पार्श्वभूमी इत्यादींचा वापर अपेक्षित होता.जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, उत्तमसरा शाळेतील विद्यार्थ्यांचे 'डिजिटल भारत जीवन सक्षमीकरण' या विषयांतर्गत स्वरचित डिजिटल भारूड परीक्षकांच्या पसंतीस उतरले.शितल भोपाळे व अश्विनी झाडे या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आस्था पातालबंशी, किमया टाकळे,भाविका थोरात, सौंदर्या तेलमोरे, प्रेम गावंडे, अथर्व झाडे, सुमित पडोळे व साहिल बागडे या विद्यार्थ्यांनी नाट्य सादरीकरण केले. शाळाचे मुख्याध्यापक आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांच्या यशासाठी मुख्याध्यापक लोमेश खैरकर, ज्येष्ठ शिक्षक संतोष गुल्हेकर, चांद्रशेखर ब्राह्मणकर,संजय मगर्दे, उमेश बसरे, ज्योत्स्ना हायगले, प्रतिभा नांदणे,भूषण बुरंगे, रेणुका केचे, प्राजक्ता भडके यांनी कौतुक अभिनंदन केले.क्रमांक प्राप्त टीमचे जि.प. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी इंगळे, स.शि. राजेश सावरकर, गजानन येलोने व प्रमोद कांबळे यांनी अभिनंदन केले आहे.

# विभागस्तर स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड

**अमरावती/का.प्र.**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती व अमरावती कुस्तीगीर संघटना यांच्या संयुक्त विदयमाने जिल्हास्तर शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेत सिंधी हिंदी हायस्कुल,अमरावती च्या खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये १७ वर्ष मुली फ्री स्टाईल कुस्ती मध्ये कु. तेजस्वीनी देव या खेळाडूंनी प्रथम क्रमांक प्राप्त करुन विभागस्तर क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,अमरावती व अमरावती स्वॅडाश संघटना याच्या संयुक्त विदयमाने आयोजीत जिल्हा क्रीडा संकुल, तपोवन,



अमरावती रोजी आयोजीत जिल्हास्तर स्वौतश क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.१७ वर्ष मुली या वयोगटात नम्रता विजय तंतरपाळे या खेळाडूंनी चतुर्थ क्रमांकाचे प्राविण्य मिळवुनविभागस्तर स्वॅश क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच १९ वर्ष मुली या वयोगटात वर्षा पंजवानी हिने चतुर्थ क्रमांक व दिक्षा संजु चौरे हिने पाचवा क्रमांक मिळवून प्राविण्य प्राप्त केले आहे तसेच या खेळाडूंची निवड विभागस्तर स्वॅवाश क्रीडा स्पर्धेसाठी झाली आहे.

# अभिनंदन बँकेचा शिक्षक सन्मान सोहळा

**अमरावती/का.प्र.**

शिक्षक दिनाच्या निमित्ताने शांतीलाल मुथ्था फाउंडेशन पुणे व अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक यांच्या संयुक्त विद्यमाने, डॉ. गोविंद कासट यांच्या पुढाकाराने शिक्षकांकारिता कौतुक सोहळ्याचे आयोजन अभिनंदन बँकेच्या कॅम्प शाखेतील प्रशस्त सभागृहात करण्यात आले. यावेळी शिक्षक,मुख्याध्यापक, अध्यापक, प्राचार्य यांचा शिक्षक शिक्षक दिनाच्या निमित्ताने शाल,पुस्तक, मोत्यांची माळ, प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देऊन यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला.

मित्र मंडळीतील मुख्याध्यापक दिलीप सदार व त्यांच्या सोबतच सन्मान झालेले मुख्याध्यापक जीवन गोरे, प्राध्यापक डॉ. वामन जवंजाळ, राजेंद्र पचगाडे, आनंद महाजन, योगशिक्षक राजू डांगे इत्यादी सर्वांनी समस्त शिक्षकांच्या वतीने अभिनंदन बँकेचे व त्यांच्या सर्व सहकारी चमूचे मनस्वी कौतुक व अभिनंदन करून त्यांच्याप्रतीआभार व्यक्त केले.



यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष मुंबईचे आयकर आयुक्त सुरेश चांदेकर, अभिनंदन बँकेचे संचालक सुदर्शनजी गांग, एडवोकेट विजय बोथरा, शिवाजी देठे, ज्येष्ठ समाजसेवक बाबा राऊत, डॉ.गोविंद कासट, डॉ. सुभाष गवई, प्रदीप जैन, ज्येष्ठ साहित्यिका शोभा रोकडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.


## नगर परिषद कार्यालय शेंदुरजनाघाट ता. वरुड जि. अमरावती

जा.क्र.२२२९/२५ दि.१५/०९/२०२५

### जाहीर निविदा सूचना २०२५-२६

या नगर परिषदे मार्फत नगर परिषद शेंदुरजनाघाट जिल्हा अमरावती अग्निशमन विभागा करिता नविन अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी दिलेल्या तपशील प्रमाने अंदाज पत्रक तयार करने करिता दर पुरविण्यात यावे चे कामाची ई-निविदा सूचना http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १५/०९/२०२५ पासून प्रसिद्ध करण्यात आली असून सदर कामाचा Tender Id: 2025_DMA_1218389_1 करिता संबंधितांनी नोंद घ्यावी.

शिक्का

प्रशासक तथा मुख्याधिकारी
नगर परिषद शेंदुरजनाघाट

# लोकशाहीचा जागर आणि महत्त्व

मानवजातीच्या इतिहासातील सर्वात मोठी देणगी म्हणजे लोकशाही होय. जगात आज विविध प्रकारच्या शासनपद्धती अस्तित्वात असल्या तरी लोकशाही हीच एक अशी व्यवस्था आहे जिच्यात प्रत्येक माणसाचे स्थान महत्त्वाचे आहे. सत्ता एका व्यक्तीकडे किंवा गटाकडे केंद्रीत न राहता ती संपूर्ण समाजाच्या, नागरिकांच्या हाती असावी ही लोकशाहीची मूलभूत संकल्पना आहे. त्यामुळे लोकशाही म्हणजे केवळ मतदानाची प्रक्रिया किंवा निवडणुका नव्हेत तर लोकशाही म्हणजे नागरिकांचा सहभाग, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य,समानतेची हमी, न्यायाचा अनुभव आणि परस्पर बंधुभावाची जीवनपद्धती होय. लोकशाही म्हणजे केवळ शासनपद्धती नाही, तर ती जीवन जगण्याची एक संस्कृती आहे. समानता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, सहभाग आणि जबाबदारी या लोकशाहीच्या मूल्यांवरच खऱ्या अर्थाने मानवी समाजाचा विकास होऊ शकतो. म्हणूनच १५ सप्टेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्र संघाने ‘आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन’ म्हणून घोषित केला आहे. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा दिवस म्हणजे जगभरातील देशांना लोकशाही जपण्याची, बळकट करण्याची जाणीव करून देण्यासाठी लोकशाहीच्या मूल्यांचे स्मरण, तिच्या रक्षणाची शपथ आणि नागरिकांच्या सजगतेची आठवण करून देणारा एक जागतिक सोहळा आहे.

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा केवळ औपचारिक उत्सव नाही तर आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचा उद्देश हा जगातील नागरिकांना लोकशाहीची खरी जाणीव करून देणे हा आहे. लोकशाही ही मिळविलेली संपत्ती आहे, परंतु ती टिकविण्यासाठी सतत प्रयत्नांची गरज असते. कारण लोकशाही ही स्थिर राहणारी नसून सतत बदलणाऱ्या परिस्थितीशी सुसंगत ठेवावी लागते. हा दिवस लोकशाहीला भेडसावणाऱ्या संकटांची जाणीव करून देतो. आजच्या काळात जगभरात लोकशाहीसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. जगातील काही देशांत अजूनही हुकूमशाहीचे सावट आहे, काही ठिकाणी निवडणुका होतात, परंतु त्या फक्त नावापुरत्या असतात, तर काही ठिकाणी मतभिन्नतेला दडपले जाते. माध्यमांवर बंधने, नागरिकांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध, अल्पसंख्यांकांवर अन्याय, महिलांची उपेक्षा, दहशतवाद, भ्रष्टाचार, आर्थिक असमानता, धार्मिक कट्टरता, डिजिटल माध्यमांवरील नियंत्रण, सामाजिक विषमता या सर्व गोष्टी लोकशाहीच्या पायाभूत मूल्यांना आव्हान देतात. लोकशाहीचे संरक्षण करणे ही जगातील सर्व नागरिकांची, समाजाची आणि शासनव्यवस्थेची जबाबदारी आहे.

२६ जानेवारी १९५० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्यासाठी लिहिलेले भारतीय संविधान लागू झाले आणि भारताने स्वतःला सार्वभौम लोकशाही गणराज्य म्हणून घोषित केले.लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हेत तर लोकशाही म्हणजे नागरिकांचा सातत्याने सहभाग होय. संसद, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था या सर्व पातळ्यांवर नागरिकांचा सहभाग घडवून आणणे ही खरी लोकशाही आहे. माहितीचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, पत्रकारितेची स्वायत्तता, स्वतंत्र न्यायव्यवस्था, सामाजिक संस्थांची भूमिका आणि विविधतेचा स्वीकार ही लोकशाहीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. तथापि भारतासारख्या विशाल देशात लोकशाही टिकविणे हे सोपे काम नसून आज भारतीय लोकशाही समोर अनेक आव्हाने आहेत. निवडणुकांमध्ये पैसा आणि सत्तेचा दुरुपयोग, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा राजकारणात प्रवेश, मतदारांना फसविणारी आश्वासने, जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरण, ग्रामीण व शहरी भागातील दरी, महिलांचे आणि अल्पसंख्यांकांचे अपुरे प्रतिनिधित्व, शिक्षण व माहितीच्या अभावामुळे नागरिकांचा मर्यादित सहभाग या सर्व समस्या लोकशाहीला कमकुवत करतात. लोकशाही टिकवण्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून व्यापक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता लोकशाहीचा पाया सामाजिक न्यायात आहे. आर्थिक बाजूने लोकशाहीचा विचार केल्यास लोकशाही तेव्हाच अर्थपूर्ण ठरते जेव्हा प्रत्येक नागरिकाला समान संधी उपलब्ध होतात. लोकशाहीमध्ये ‘संधींची समानता’ ही सर्वात महत्त्वाची बाब ठरते. शिक्षण, आरोग्य, रोजगार, सामाजिक सुरक्षा यांची उपलब्धता जर सर्वांना समान प्रमाणात नसेल तर लोकशाही केवळ नावापुरती राहते. आर्थिक विषमता वाढल्यास लोकशाहीचा पाया हलतो. काही लोक अत्यंत श्रीमंत आणि काही अत्यंत गरीब राहिले तर समानतेचा विचार केवळ कागदोपत्री उरतो. त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी आर्थिक न्याय साध्य करणे अनिवार्य आहे. जागतिकीकरण आणि उदारीकरणामुळे आर्थिक विकास झाला असला तरी गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढत चालली आहे. ही दरी लोकशाहीच्या अस्तित्वालाच धोकादायक ठरू शकते. त्यामुळे आर्थिक न्याय साध्य करणे, संसाधनांचे समान वितरण करणे, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात लोकशाहीसमोर नवे प्रश्न उभे राहिले आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती सर्वांपर्यंत झपाट्याने पोहोचत आहे त्यामुळे लोकशाहीमध्ये नागरिकांचा सहभाग वाढला असून आंदोलनांना गती मिळत आहे. परंतु याच माध्यमातून खोटी माहिती, द्वेषपूर्ण प्रचार, ट्रोलिंग, मतप्रभावीत करणाऱ्या मोहिमा यामुळे लोकशाहीची गुणवत्ता धोक्यात येत आहे. माहितीच्या प्रसारात जबाबदारी आणि माध्यम साक्षरता ही लोकशाहीच्या भविष्यासाठी अत्यावश्यक आहेत.



आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा केवळ उत्सवाचा दिवस नाही तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.तरुण पिढी ही लोकशाहीची खरी आशा आहे. तरुणांमध्ये ऊर्जा, नव्या कल्पना, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. शिक्षण, रोजगार, तंत्रज्ञान, सामाजिक माध्यमे या सर्व क्षेत्रांतून तरुणांनी लोकशाही अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून तरुणांना लोकशाही मूल्यांचे भान करून देणे हे शिक्षणव्यवस्थेचेही कर्तव्य आहे.म्हणूनच आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाचे स्मरण करताना आपण प्रत्येकाने लोकशाहीच्या मूल्यांना आत्मसात करणे, त्यांचा प्रसार करणे आणि भावी पिढ्यांसाठी ती अधिक सक्षम ठेवणे हेच खरे कर्तव्य आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
मो. क्र. ९९६०१०३५८२

# जागतिक लोकशाही दिनाच्या निमित्ताने...

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी जागतिक स्तरावर साजरा केला जातो.लोकशाही बळकट करण्यासाठी २००७ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने पारित केलेल्या ठरावाद्वारे या दिवसाची स्थापना करण्यात आली.जगातील लोकशाहीचा विचार करताना लोकशाही मूल्याची घसरण झपाट्याने होत आहे. कारण हुकूमशाहीचा वाढता प्रभाव, अंतर्गत दडपशाही, लोकशाहीच्या तत्त्वांवरील हल्ले आणि लोकशाहीच्या संस्था कमकुवत होणे, ज्यामुळे अनेक देशांमध्ये नागरिक आणि सरकार यांच्यात मतभेद वाढत आहेत. एका नवीन अभ्यासानुसार, विकसनशील किंवा उदयोन्मुख अर्थव्यवस्था मानल्या जाणाऱ्या १३७ देशांमध्ये गेल्या २० वर्षांत लोकशाहीची गुणवत्ता खालावली आहे.

बर्टेल्समन फाउंडेशनच्या ‘ट्रान्सफॉर्मेशन इंडेक्स’ नुसार, आता ७४ लोकशाहींच्या तुलनेत ६३ लोकशाही आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, ज्या राज्यांमध्ये मुक्त निवडणुका संवैधानिक तत्त्वांचे पालन केले जात नाही.त्याठिकाणी लोकशाही धोक्यात येत असते.गेल्या दोन वर्षांत, नवीन भू-राजकीय वातावरण, युक्रेनविरुद्ध रशियाचे आक्रमक युद्ध आणि कोरोनाव्हायरस साथीच्या आजारामुळे, २५ देशांमध्ये निवडणुका पूर्वीपेक्षा मुक्त आणि निष्पक्ष झाल्या नाहीत, असे या अभ्यासात म्हटले आहे, ज्यामध्ये असेही आढळून आले आहे की ३९ देशांमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रेस स्वातंत्र्य वाढत्या प्रमाणात मर्यादित झाले आहे.सत्तेचे केंद्रीकरण झाल्यामुळे लोकशाही प्रक्रिया मंदावत असून नागरिकांच्या संमतीचा अर्थ कमी होत आहे.मुक्त, स्वतंत्र व पारदर्शक निवडणुका लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आवश्यक आहे.मोदी सरकार वर निवडणुका हायजॅक केल्याचा आरोप होत आहे.अशा परिस्थितीत, लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी शिक्षण सुधारणे, आर्थिक समानता, सामाजिक न्याय आणि राजकीय पारदर्शकता यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**प्रा. डॉ.सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

# अभियंता दिन



आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले.१९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले.

विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**

# निवडणूक आयोगाची विश्वासार्हता ?

बिहार राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या आधीच तेथील निवडणूक प्रक्रिया सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. निवडणूक आयोगाने घेतलेला एक निर्णय त्यासाठी कारणीभूत ठरला आहे. निवडणूक आयोगाने बिहारमधील मतदान प्रक्रियेपूर्वी तेथील मतदार यादीचे इंटेन्सिव्ह रिव्हिजन करण्याचे योजले आहे.कोट्यवधी मतदारांच्या यादीचे हे पुनरावलोकन केवळ महिनाभरात पूर्ण होणे अशक्य आहे. त्यामुळेच यामागे काहीतरी काळेबेरे आहे. असा विरोधी पक्षांचा आरोप आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाला काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल या दोन्ही पक्षांनी विरोध दर्शविला आहे. या मतदार यादीचे पुनरावलोकन करताना मतदारांकडून त्यांच्या जन्माचे प्रमाणपत्र आणि त्यांच्या आई-वडिलांचे जन्म दाखले मागितले गेले आहेत. त्याला जोरदार आक्षेप घेतला गेल्यानंतर यात काही प्रमाणात शिथिलता दिली गेली असली तरी मूळ संभ्रमाचे वातावरण कायम आहे.

मुळात २०२४ मध्ये ज्या मतदार यादांच्या आधारे लोकसभेची मतदान प्रक्रिया पार पडली त्याच यादीच्या आधारे विधानसभेची निवडणूक घेणे अवघड नसताना हा प्रश्न निवडणूक आयोग का अवघड करून ठेवत आहे, असा मुख्य आक्षेपांचा भाग असून त्यावर समाधानकारक उत्तर अद्याप मिळालेले नाही, असे विरोधी पक्षांचे म्हणणे आहे.अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने बिहारच्या मतदार यादीवरील महत्वपूर्ण खटल्याची सुनावणी करताना केंद्रीय निवडणूक आयोगाला जोरदार झटका दिला आहे.देशात लोकसभा निवडणूक झाल्यापासून निवडणूक आयोग वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत आहे. खास करून महाराष्ट्र आणि त्यानंतर हरियाणात झालेल्या मतदारावरून आजही अनेक प्रश्नचिन्हे उपस्थित केली जात आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मतचोरीच्या आरोपांचा बॉम्ब फोडला. या बॉम्बफुटीने उडालेल्या शंकाकुशंकांचा धुराळा अजूनही खाली बसलेला नाही. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर अनेक गंभीर आरोप केले. केवळ एकट्या महादेवपुरा विधानसभा मतदारसंघात एक लाखाहून अधिक मतांची हेराफेरी झाल्याने काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव झाला. हे आरोप करताना राहुल गांधींनी अनेक पुरावे दिले.या आरोपांमुळे निवडणूक आयोगाची विश्वासार्हता धोक्यात आली आहे.

**मधुकर चुटे**

# विमर्श आणि नरेटिव्ह!

गत काही वर्षात नरेटिव्ह हा शब्द सर्वत्र गाजतोय.नरेटिव्ह किंवा फेक नरेटिव्ह सेट केल्यामुळे सत्ता हादरल्याचे आपण अनुभवले .त्यामुळे नरेटिव्हचा धसकाही अनेकांनी घेतला.काय आहे नरेटिव्ह?सध्याच्या परिस्थितीचा विचार करता ‘जे खरे नाही तेच सत्य आहे हे लोकांच्या मनावर ठसविणे’ म्हणजे नरेटिव्ह होय. हीच व्याख्या मनामनात रुजली आहे. खोट्याला सत्याचा मुखवटा लावून लोकमनावर भुरळ घालून ठसा उमवटवणे म्हणजे नरेटिव्ह.खरे तर मुलतः नरेटिव्ह म्हणजे नाटक, कवीसम्मेलने, व्याख्याने, पथनाट्ये, सभा यांच्यासारख्या लोकरंजन माध्यमातुन मुद्दा लोकमनावर ठसविणे असा व्यापक आणि सकारात्मक अर्थाने नरेटिव्ह असायचा. पण हल्ली खोट्याला खरे भासविणे या फेक नरेटिव्हलाच नरेटिव्ह म्हणून प्रक्षेपित केल्या जात आहे. त्याअर्थाने नरेटिव्ह नकारात्मक आणि असत्यावर आधारित बनला.नरेटिव्ह डाव्या विचाराच्या किंवा वोकीझम वाल्या अर्ध्या हळकुंडात पिवळ्या झालेल्यांनी फोफावला.याउलट उजव्यांचा विमर्श विषय आहे. विमर्श सत्यावर आधारित असून सत्य प्रस्थापित करणे म्हणजे विमर्श.सध्या विमर्श हा विषय देखिल बराच चर्चेत असून अनेक कार्यकर्त्यांच्या मनात अजूनही स्पष्टता या दोन्ही विषयाबाबत दिसत नाही.

विमर्श समजून घ्यायचा असेल तर त्याआधी ‘विचार’ समजून घेणे जरुरी आहे.आपण विचारविमर्श हा शब्द व्यवहारात नेहमी वापरतो. साधारणतः एका पेक्षा अधिक व्यक्ती जेंव्हा चर्चा करतात तिथे आपण विचारविनिमय किंवा विचारविमर्श शब्द वापरतो.

**पहिले आपण विचार म्हणजे काय? ते पाहू !**

जो विषय, घटना,वस्तू त्याचे नाव काढतांच त्याचे जे स्वरुप डोळ्यासमोर येते,त्याबाबतची संकल्पना आपल्या बुद्धीला ज्ञात होते त्याला विचार म्हणतात.उदा.भगवान श्रीराम , श्रीकृष्ण आपण पाहिले नसले तरी चित्र, मूर्ती पाहून आपला तो विचार पक्का आहे.परिस,अमृत ह्या बाबी आपण पाहिल्या नाही तरी त्यांच्याबाबतचा विचार मेंदूने निश्चित केला आहे. प्रमेय,व्याख्या,चिंतन याबाबतचे काही विचार आपण आपल्या अंतःशक्तीनुसार स्वतःचा विचार स्वतः करतो. विचार, दुर्विचार याबाबतचे स्वरुप किंवा ज्ञान आपल्या बुद्धीला निश्चित आहे.विचाराला इतरांची गरज असतेच असे नाही.विमर्श मात्र चर्चेतून एका पेक्षा अधिक लोकांच्या चिंतनातून होतो.विमर्श म्हणजे एखाद्या तत्वाला समजुन उमजून, तपासून, पारखून तथ्यापर्यंत पोचणे होय.विमर्श म्हणजे एखाद्या गोष्टीचा छडा लावणे.विमर्श म्हणजे विवेचन,समिक्षा,तर्क,परीक्षण आणि बुद्धीच्या कसोटीवर वास्तविकते पर्यंत पोचणे.

बऱ्याचवेळा नरेटिव्ह म्हणजे विमर्श असा अनेकांचा गैरसमज आहे. आता नरेटिव्ह हा विमर्शचा दुसरा ध्रुव बनला आहे.विमर्श हा परकोटीचा सकारात्मक आणि विधायक विचार आहे.विमर्शचा एक छोटा भाग जो नकारात्मक, असत्यावर आधारित असतो त्याला हल्ली नरेटिव्ह म्हणतात. नरेटिव्ह तथ्यावर आधारित नसला तरी दुर्दैवाने तथ्य बनून प्रक्षेपित होतो.खरंतर नरेटिव्ह विघातक आणि विधायकही असतो.पण विधायक नरेटिव्हच्या निष्क्रियतेमुळे विघातक नरेटिव्ह फोफावतो.त्यामुळे प्रत्येक गोष्टीची दखल घेणे क्रमप्राप्त झाले आहे. ‘अन्नुलेखाने मारा’ हा शब्द आता आपल्या शब्दावलीतून काढून टाकला पाहिजे. प्रत्येक फेक नरेटिव्हला वेळीच उत्तर दिले नाही तर अर्थाचा अनर्थ होऊन दूरगामी परिणाम होतात. असो.



विचार हा मेंदूवर ठसलेला असतो पण विमर्श मात्र अनेकांच्या वैचारीक चयापचयातून प्रस्थापित करावा लागतो.भारतीय संस्कृतीत ऋषीमुनींनी संवादातून भारतीय विमर्श प्रस्थापित केला.तो शाश्वत, अभंग आणि अभेद्य आहे. पण त्यावरही आघात करण्यात काही अंशी काहीजण यशस्वी झालेत. त्याबाबत चिंतन जरुरी आहे.

विमर्श तीन प्रकारे विचारात घेतला जातो.१) शाश्वत विमर्श, २)तात्कालिक विमर्श, ३)आपल्याला प्रस्थापित करायचा विमर्श.शाश्वत विमर्श म्हणजे ज्यात आपण परिवर्तन करू शकत नाही. उदा. सुर्य पूर्वेला उगवतो. हा विचार शाश्वत आहे.पण अशा काही शाश्वत विचारांना देखील प्रस्थापित करावे लागते.पृथ्वी गोल आहे हे शाश्वत सत्य असूनही काही धर्मग्रंथात पृथ्वी सपाट असल्याचे नमूद असल्याने आजही विश्वातील मोठा भाग त्यावरच ठाम आहे.

‘हिंदवः सोदराः सर्वे’ हा शाश्वत विमर्श आहे. हिंदू संस्कृतीच जगाला योग्य मार्ग देणारी आहे. एकेश्वरी आणि सेमेटिक संस्कृती जगात विनाशकारी ठरत आहेत.हे सर्व शाश्वत विमर्श आहेत.कारणे काहीही असोत पण दुर्दैवाने शाश्वत बाबी झाकाळल्या गेला.आता बुजल्यागेलेला सत्यविचार पुन्हा प्रस्थापित करणे म्हणजे शाश्वत विमर्श होय. स्त्रीदाक्षिण्य, स्त्री मातेसमान हे गुण आपल्या भारतीय संस्कृतीत नैसर्गिक आहेत.हा शाश्वत विमर्श पण दुर्दैवाने याबाबत आपल्या संस्कृतीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. सतीची प्रथा जोरात शिकविली पण ‘हलाला’ सारखा भयंकर, अमानवीय आणि राक्षसी विचार पुस्तकात आलाच नाही.या सर्व बाबींवर चर्चा करुन सत्य पुनर्स्थापित करणे हा शाश्वत विमर्श होय. आजही भारतात आपले घर आहे पण आपल्या घरात भारत नाही. भारतात शिक्षण आहे पण शिक्षणात भारत नाही.

विमर्शचा दुसरा प्रकार तात्कालिक विमर्श होय.या मध्ये चालू स्थितित एखादा चुकीचा विचार (नरेटिव्ह) कोणाकडून प्रस्थापित होत असेल तर त्यावर तातडीने प्रतिक्रिया हा तात्कालिक विमर्श होय. बहुतेक वेळा हा विमर्श नरेटिव्हच्या विरोधातील असतो. हा विमर्श प्रस्थापित करण्यासाठी बुद्धी,शक्ती आणि पराक्रम लागतो. अनुल्लेख, कंटाळा, आळस आणि ‘काही होत नाही’ हा फाजील आत्मविश्वास तात्कालिक विमर्शसाठी घातक आहे.उदा. ‘संविधान बदलणार’ हा फेक नरेटिव्ह का स्थापित झाला, तर या बाबत आपण पुर्णतः आळशी आणि गाफील होतो. त्यांनी ‘नेसूची लंगोटी’ सोडून नेली आणि आपण दिगंबर झालो तरी आपण ‘चारसो पार’ वरच गुंतून होतो.हा तात्कालिक विमर्श त्वरित प्रस्थापित करणे जरुरीचे आहे.

सध्या जोरात विचार विरोधकांकडून मांडल्या जातो.तो म्हणजे ‘हिंदू विचार म्हणजे केवळ संघविचार’ असा विचार पुढे जाऊन हिंदू म्हणजे फक्त संघवाले बाकी सर्व इतर कोणीतरी.हा सर्वात घातक विचार प्रक्षेपित होत आहे.हे षड्यंत्र सुरु झाले आहे. यावर वेळीच उपाययोजना हा तात्कालिक विमर्श होय. मी विरोधी विचारकांशीही चर्चा करीत असतो.शिक्षणातील पंचकोष विचार हा विद्याभारतीचा विचार आहे म्हणून त्याला ते भगवीकरण म्हणून विरोध करतात.पण पंचकोष हा तैत्तरिय उपनिषद, शंकरभाष्य, विवेकचुडामणी मधिल जुना विचार आहे . विद्या भारतीने त्यातुन पंचकोष घेतला .स्वतः निर्माण केला नाही हे पोचणे जरुरी आहे.शिक्षणाचे भगविकरण नसुन ती चारित्र्यसंपन्न मनुष्यनिर्माणाची प्रक्रिया आहे.

योग हा विषय श्री.रामदेवबाबा निर्मित नसुन तो सनातन विचार आहे. श्री.रामदेवबाबा त्या सनातन योगाचे प्रचारक आहेत.तो आरोग्यासाठी सर्वांना हितकारक आहे.तो केवळ हिंदूंसाठी नाही.हे सर्व तात्कालिक विमर्श आहेत. असो.

तिसरा प्रकार म्हणजे विमर्श जो आम्हाला प्रस्थापित करायचा.उदा. वाढदिवसाला केक हा आपल्या घरात इतका शिरला की तो काढणे कठीण.अगदी पुजनीय शंकराचार्यांच्याही वाढदिवसाला भक्त केक घेऊन जातात.त्यांच्यावरील अतीव प्रेमामुळे नाईलाजाने ते ही कापतात.केक शिवाय वाढदिवस होऊच शकत नाही हा आपला पक्का गैरसमज. आजकाल लग्न प्रसंगी केक कापणे कुलाचाराचा भाग झाला.मम्मी, डैडी, अंटी यात मोठेपणा. इंग्रजांनी घर ताब्यात घेतले.मुस्लिमांनी अनेक वर्ष इथे राज्य केले पण ते संस्कृती म्हणून आम्मीजान,अब्बूजान कधिच आपल्या घरात अतिक्रमित झाले नाही पण मम्मी डैड घुसले. पुन्हा आईबाबा, काकाकाकू, मावशी घरात प्रयत्नपुर्वक प्रस्थास्पित करणे, वाढदिवसाला केक न कापता ओवाळणे असे विमर्श आपल्याला प्रस्थापित करावे लागणार आहेत.

नरेटिव्हचे आयुष्य अल्प असले तरी त्याचा डंख विंचवासारखा त्वरित घातक ठरतो विमर्श मात्र दीर्घायुत्वाय आणि शाश्वत असला तरी त्यासाठी प्रयत्न आणि वाट पाहणे (वेटिंग पिरीएड) महत्वाचा आहे.पण नरेटिव्हचा उतारा विमर्शच आहे.

(लेखक विद्याभारती विदर्भ प्रांत विमर्श विषय प्रमुख आहेत)

**विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी,**
वाशिम. मो.९८२२२६२७३५

## दिवाळी विशेषांक-२०२५

**दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही ‘जनमाध्यम’दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिध्द करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक ‘जनमाध्यम’ तर्फ विनंती...आपले साहित्य atimadham@gmail.Com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सॲप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार ‘जनमाध्यम’कडे राखीव राहील.इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.१० ऑक्टों.२०२५ पर्यत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.**

# पारस औष्णिक विद्युत केंद्रात स्थानिकांना रोजगार द्या – आ. साजिदखान पठाण

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात इंटकच्या कंत्राटी कामगार शाखेचा मेळावा

■ प्रतिनिधी | पारस ■

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय विज कामगार फेडरेशन (इंटक) तर्फे भव्य कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात नव्याने स्थापन झालेल्या इंटक संघटनेच्या कंत्राटी कामगार शाखेच्या नामफलकाचे उद्घाटन आमदार साजिदखान पठाण तथा ज्येष्ठ नेते प्रकाश तायडे यांच्या हस्ते करण्यात आले.

मेळाव्याचे अध्यक्षस्थान इंटक महानिर्मितीचे केंद्रीय सचिव दामोदर चगोले यांनी भूषविले. प्रमुख पाहुण्यांमध्ये आमदार साजिदखान पठाण, ज्येष्ठ काँग्रेस नेते प्रकाश तायडे, माजी सभापती राजीव बोचे, प्रदेश अनुजाती विभागाचे महासचिव महेंद्र गवई, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव अभिलाष तायडे, केंद्रीय महासचिव राजेश रौदले, उपमुख्य अभियंता बागडे व अधीक्षक अभियंता पंधाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेश रौदले यांनी केले. त्यानंतर इंटकचे स्थानिक पदाधिकारी अध्यक्ष मोहन पुंडे, सचिव रोशन देशमुख, कार्याध्यक्ष योगेश घोंगे, उपाध्यक्ष महेश साबळे, सहसचिव सतीश घुले, सहकोषाध्यक्ष राजू धांडे, संघटक अजय शिंपीकर, प्रसिद्धी प्रमुख दारासिंग ठाकूर यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचा सत्कार केला. या मेळाव्यात महेश तायडे यांची अध्यक्ष व बाबूभाई यांची सचिव म्हणून इंटक कंत्राटी कामगार संघटनेत नियुक्ती करण्यात आली. तसेच मुकेश बेले, रवींद्र वाडे, प्रवीण गोमेकर, मनोहर राठोड, विशाल भिसे, दीपक गोटे, अनिल जिराफे यांनी इंटक संघटनेत प्रवेश केला.यावेळी नुकतेच विद्युत सहाय्यक म्हणून



नियुक्त झालेले गणेश मोहोकर, आदित्य कडू, आदेश घाटे, ध्यानेश्वर घोंगे, श्रुती आमले यांचा सत्कार करण्यात आला. तसेच इंटक पदाधिकारी सुभाष काचगुंडे यांचा मुलगा गणेश काचगुंडे याने राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत मिळविलेल्या सुवर्णपदकाबद्दल त्याचा गौरव करण्यात आला. मेळाव्यात मार्गदर्शन करताना राजुभाऊ बोचे यांनी पारस प्रकल्पाचे श्रेय माजी आमदार लक्ष्मणराव तायडे यांना दिले. त्यांनी रोजगार निर्मितीसाठी मंत्रीपद नाकारून हा प्रकल्प आणला, असे त्यांनी सांगितले. महेंद्र गवई यांनी काँग्रेस पक्षाने राबविलेल्या कामगार हिताच्या योजनांचा आढावा घेतला. प्रकाश तायडे यांनी कामगारांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकताना, कामगारांचे कामकाज ८ तासांवरून १२ तास करण्याच्या निर्णयाचा तीव्र विरोध करण्याचा इशारा दिला. तर आमदार साजिदखान पठाण यांनी 'कामगारांवर अन्याय झाल्यास विधानसभेत आवाज उठवू. पारस प्रकल्पात स्थानिकांना रोजगार द्यावा यासाठी अधिकाऱ्यांना सूचित केले आहे,' अशी ग्वाही दिली. अध्यक्षीय भाषणात दामोदर चगोले यांनी इंटक संघटनेची कार्यपद्धती, आगामी आव्हाने व कामगारांच्या प्रश्नांवर संघटनेच्या धोरणांचा ऊहापोह केला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कैलास इंदौर, गणेश करंजकर, गोपाल मानकर, उमेश नरोटे, विनोद राठोड, गजानन देवळे, गोपाल दांदडे, अमित भगत, सुभाष काचगुंडे, केशव फड, गजानन सोळंके, पी.सी. देशमुख, रामेश्वर पवार, उदयसिंह पवार, जगन्नाथ वाघ, भूषण वानखेडे, विजय गिऱ्हे यांच्यासह असंख्य पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. संचालन केशव भगत यांनी केले तर आभार प्रदर्शन इलामे यांनी मानले.

# शिवसेनेतर्फे औरंगजेब दुग्धाभिषेक प्रकरणाचा निषेध

## शुद्धीकरण सोहळा व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहरातील टिळक रोडवरील कपडा बाजार चौकात काही युवकांनी औरंगजेबाच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून हिंदूंच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न केला. हिंदू समाजावर अत्याचार करणारा आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची क्रूर हत्या करणारा औरंगजेब महाराष्ट्राच्या भूमीत गौरवला जावा, ही कोणती मानसिकता आहे असा सवाल शिवसेनेने उपस्थित केला.

या घटनेच्या निषेधार्थ शिवसेनेच्या वतीने आज त्या ठिकाणी गोमूत्र व गंगाजलाने शुद्धीकरण करून विधीवत मंत्रोच्चार करण्यात आला. यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन पं. लोकेशजी तिवारी, पं. देवेंद्रजी शर्मा, पं. राजेशजी सुरोलीया व पं. धीरजजी तिवारी यांच्या हस्ते संपन्न झाले.

दरम्यान, या घटनेबाबत पोलिसांनी गुन्हा दाखल करून



तिघा आरोपींना अटक केली आहे. मात्र, आरोपी हे रिक्षाचालक मजूर असून या प्रकरणामागील खरा सूत्रधार कोण आहे, याचा शोध प्रशासनाने घ्यावा अशी मागणी शिवसेनेने केली आहे.

या वेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अश्विनभाऊ नवले, महानगर प्रमुख योगेश अग्रवाल, शहर प्रमुख रमेश गायकवाड, अविनाश मोरे, शशिकांत चोपडे, पप्पू मोरवाल, सागर पूर्णेय, मधुकर सोनारगन, उपशहर प्रमुख गणेश गोगे, सुमित पानझडे, शिवम पुरोहित, राजेश दांडेकर, भूषण इंदोरीय, सचिन पाचपोर, आकाश दलाल, गोपाल नागपुरे, रवी देशमाने, अविनाश खुनोरे, आकाश वक्ते, अनिकेत दुबे, प्रतीक मानेकर, हेमंत तांदळे, प्रफुल दांदळे, महेश बघेरे, राजेश पिंजरकर, रवींद्र देशमुख, पंकज डोईफोडे, योगेश जवंजाळ, ममता जैन, संगीता शुक्ला, जयश्री पवार, शितल गिरी, उज्वला इंगळे, किशोर गाडगे, नागेश इंगोले, नितीन गांगलवार, संदेश काजळकर, अतुल बोके, गोपाल सरोदे, भावेश नवले, श्याम वाघिले, वैभव बोरचाटे, विक्रम जयसिंगकर, राजेश दुबे, हेमंत सोनार, भानुदास गोंधळेकर, नितेश दुबे, धनराज लोमटे, उमेश लांडगे, प्रतीक आमकर, विनोद अग्रवाल, विकास लाडके यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# दोन वर्षांपूर्वी केलेल्या डांबरीकरण रस्त्याची चाळणी!

## सुकळी–पिंपळखुटा रस्त्यावर जागोजागी खड्डे



'सुकळी–पिंपळखुटा रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी शासनाने ६ कोटी २४ लाख रुपये मंजूर केले होते. परंतु निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने केवळ दोन वर्षांतच रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. अधिकारी व कंत्राटदार यांच्या मिलीभगतीमुळेच ही परिस्थिती निर्माण झाली आहे.'

**जहुर खान,** सरपंच, खेट्री

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सुकळी– चतारी– खेट्री–चांगेफळ–पिंपळखुटा या रस्त्याचे डांबरीकरण प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजने अंतर्गत सन २०२३ मध्ये करण्यात आले होते. शासनाकडून या कामासाठी तब्बल ६ कोटी २४ लाख रुपये मंजूर झाले होते. परंतु कामाच्या गुणवत्तेबाबत सुरुवातीपासूनच शंका उपस्थित होत होत्या. मुरुमाऐवजी पिवळ्या मातीचा वापर केल्याचा प्रकारही त्या वेळी उघडकीस आला होता.

स्थानिक ग्रामस्थांनी निकृष्ट दर्जाचे काम थांबवून वारंवार तक्रारी नोंदवल्या, तरीही संबंधित अधिकाऱ्यांनी व कंत्राटदारांनी दुर्लक्ष करत काम पूर्ण केले. याचा परिणाम असा की केवळ दोन वर्षांतच रस्त्याची चाळणी झाली असून जागोजागी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून नागरिक त्रस्त झाले आहेत.

ग्रामस्थांचा आरोप आहे की अधिकारी व कंत्राटदार यांच्या मिलीभगतीने निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण करून शासनाचे कोट्यवधी रुपये लाटण्यात आले. आज रस्त्याची अवस्था दयनीय असून, शासनाचा निधी अक्षरशः पाण्यात गेल्याचे चित्र आहे. निकृष्ट दर्जाच्या डांबरीकरणाची चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कडक कारवाई करावी तसेच रस्त्याची तातडीने डागडुजी करून प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे.

**६ कोटी २४ लाख रुपये गेले पाण्यात! :** सुकळी–पिंपळखुटा रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी शासनाकडून ६ कोटी २४ लाख रुपये मंजूर झाले. परंतु निकृष्ट कामामुळे दोन वर्षांतच रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून शासनाचा कोट्यवधींचा निधी वाया गेला असल्याचे स्थानिक नागरिक बोलून दाखवत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने लक्ष घालून रस्त्याची डागडुजी करण्याची गरज आहे.

## पोर्टफोलिओचे व्यवस्थापन अधिक चांगल्या पद्धतीने करणे शक्य

**अकोला** : मल्टी असेट्समधील गुंतवणूक वेगवेगळे असेट क्लास वेगवेगळ्या परिस्थितीत कशाप्रकारे कामगिरी करतात यावर अवलंबून असते. इक्विटीजना आर्थिक विकासाचे टप्पे आणि कॉर्पोरेट मिळकतीच्या विस्तारातून लाभ होतो. डेट आउटकमवर व्याजदराचे ट्रेंड्स आणि महागाई चक्राचा परिणाम होतो. सोने आणि चांदी प्रामुख्याने अस्थिरता, जागतिक जोखमीच्या घटना आणि चलनी अस्थिरतेला प्रतिसाद देतात. चालना देणारे असे सर्व घटक परस्परांशी फारसे सुसंगत नसल्यामुळे कोणताच एक असेट क्लास जास्त काळासाठी आघाडीवर राहात नाही.डेटा असे दर्शवतो, की आघाडीचे स्थान बदलत राहाते – काही वर्षांत इक्विटी सर्वात चांगली कामगिरी करतील, काही वेळेस डेट आणि कमॉडिटीजची कामगिरी चांगली होईल.

# प्रारूप प्रभाग रचनावर २३ हरकती प्राप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेची आगामी काळात होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी अकोला महानगरपलिकेची प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यावर हरकती व सुचना मागविण्यासाठी ३ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत वेळ देण्यात आली आहे.

या अनुषंगाने आज दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी, प्रभाग क्रं. येथील न्े इंपेरियल ते टाटा मोटर कडे जाणत्या मार्गावर राष्ट्रीय महामार्ग २०५ क्रॉस न करता मिलिंद विद्यालय ते गजाजनन हॉस्पीटल जवळ हायवे जाडून द्यावे बाबत १ हरकती. प्रभाग क्रं. ११ मध्ये समाविष्ट करण्यात आलेला मनकर्णा प्लॉटचा काही भाग, गवळीपुराचा काही भाग हा प्रभाग क्रं. ७ मध्ये समाविष्ट करण्यात यावा बाबत १ हरकती. राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे क्वार्टर डाबकी रोड, मोठा नाला क्रॉस करून रचना तयार करण्यात आली असून ह्या बाबी नियमांचे उलंघन करून करण्यात आलेल्या आहेत बाबत १ हरकती. मनपा प्रभाग रचना २०२५, प्रभाग रचना क्रं. ७ च्या रचने बाबत १ हरकती. मनपा प्रभाग रचना २०२५ प्रभाग क्रं. ७ व ६ मध्ये फेररचना करणे बाबत १ हरकती मिळून एकुण ५ हरकती प्राप्त झाल्या असून आजपर्यंत एकुण २३ हरकती नोंदविण्यात आल्या आहेत.

# शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालयात आज डॉ. कमलताई गवईंची उपस्थिती



■ प्रतिनिधी | अकोला ■

पंधरा सप्टेंबर या अभियांत्रिकी दिनाच्या निमित्याने श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या बाभूळगांव - अकोला येथील अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयात देशात महत्तम आईचे स्थान प्राप्त असलेल्या माजी लेडी गव्हर्नर प्राचार्या डॉ कमलताई दादासाहेब गवई यांना मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आलेले आहे .आज महाविद्यालयातील स्थापत्य विभागाच्या वतीने साजरा होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत थोरात, प्रमुख पाहुणे म्हणून इंजिनिअर सुनिल हातेकर ( अकोला ) तथा स्थापत्य विभाग प्रमुख डॉ अभिनंदन गुप्ता यांची उपस्थिती लाभणार आहे .या कार्यक्रमाची पूर्व तयारी तथा निमित्याने महाविद्यालयात गेल्या दोन दिवसांपासून विविध विषयांवर विद्यार्थी स्पर्धा संपन्न झाल्या असून या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या सर्वच विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे . त्याच बरोबर या सत्रामध्ये महाविद्यालयातील सर्व विभागातील उल्लेखनिय कार्यकरणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा विशेष आमंत्रित करण्यात आलेले आहे .या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण तथा विद्यार्थी कार्यगौरव डॉ कमलताई गवई यांच्या शुभहस्ते संपन्न होईल . वृक्षारोपण, किनोट मार्गदर्शन अश्या विविध मार्गदर्शनाची मेजवानी या दिनाच्या निमित्याने महाविद्यालयास लाभणार असून माजी राज्यपाल रा . सु . उपाख्य दादासाहेब गवई यांच्या अर्धांगिनी असलेल्या तथा देशाचे सन्माननिय सरन्यायाधिश यांच्या माता असलेल्या डॉ कमलताई गवई ह्या आईच्या वात्सल्याने उपस्थितांना मार्गदर्शन करणार असाल्याने या ऐतिहासिक क्षणाली सर्वांना उत्सुकता सुद्धा लागली आहे .

# घरपट्टी वसुलीत अपहार : ग्रामस्थांची लुबाडणूक

## सावरगाव ग्राम पंचायतचा प्रताप : जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार



'मी रुजू होण्यापूर्वी घरपट्टी वसुलीची १,०४,७३१ रुपयांची रक्कम रजिस्टरमध्ये नोंद झाली आहे. मात्र ती ग्राम पंचायतच्या बँक खात्यात जमा नाही. त्यामुळे खात्यात व रजिस्टरमध्ये तफावत निर्माण झाली आहे. ही बाब ग्राम पंचायत सदस्यांनी अर्जाद्वारे माहिती मागवल्यानंतरच स्पष्ट झाली.'

**समाधान साळोकार,** सचिव ग्राम पंचायत सावरगाव

'ग्रामस्थांची लुबाडणूक करून वसूल केलेली रक्कम अपहार करण्यात आली आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई व्हावी व सरपंचाला अपात्र करण्यात यावे, यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. आठ दिवसात कारवाई न झाल्यास ग्राम पंचायत समोर अन्नत्याग उपोषणाला बसण्याचा इशारा दिला.

**जानू बाबूसिंग राठोड,** ग्राम पंचायत सदस्य, सावरगाव

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर पंचायत समिती अंतर्गत सावरगाव ग्राम पंचायतच्या सरपंच बसंतीबाई राठी, त्यांचे पती राधेश्याम राठी, मुलगा अजय राठी व तत्कालीन सचिव शिवकुमार सर्जे यांनी संगनमत करून ग्रामस्थांची लुबाडणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ग्रामस्थांकडून घरपट्टीच्या नावाखाली तब्बल १,०४,७३१ रुपये वसूल करून ते ग्राम पंचायतच्या बँक खात्यात जमा न करता परस्पर हडप केल्याचा आरोप ग्राम पंचायत सदस्य जानू बाबूसिंग राठोड यांनी केला आहे.

११ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीत त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. शासन नियमाप्रमाणे वसूल केलेली घरपट्टीची रक्कम सात दिवसांच्या आत ग्राम पंचायतच्या बँक खात्यात जमा करणे बंधनकारक आहे. मात्र सरपंच व सचिवांनी ग्रामस्थ व शासनाची दिशाभूल करत ही रक्कम खात्यात जमा न करता अपहार केल्याचा आरोप आहे.

जानू राठोड यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीद्वारे ही तफावत उघड झाली असून तक्रारीसोबत सर्व पुरावेही जोडले आहेत. तसेच, सरपंच पदाचा दुरुपयोग झाल्याने बसंतीबाई राठी यांना अपात्र ठरवावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# अग्रसेन जयंती महोत्सवाची उत्साहात सुरुवात



■ प्रतिनिधी | अकोला ■

सालाबादप्रमाणे यंदाही अग्रवाल समाजाचे कुलदैवत महाराज अग्रसेन यांची जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यास सुरुवात झाली आहे. दि. १४ सप्टेंबर रोजी महाराज अग्रसेन यांच्या प्रतिमेची स्थापना करून पूजा-अर्चना करण्यात आली आणि महोत्सवाचा शुभारंभ झाला.

जयंतीनिमित्त समाजातील युवक-युवती तसेच महिला-पुरुषांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. १४ ते २२ सप्टेंबर दरम्यान राखी बनाव, सापसिडी, चेस, अग्रसेन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा, बॅडमिंटन, झुला सजावट, केबीसी, वेशभूषा, धार्मिक ज्ञान, फुटबॉल, फॅन्सी ड्रेस व नृत्य स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. महोत्सवाचा समारोप २२ सप्टेंबर रोजी शहरातून भव्य शोभायात्रेसह होणार असून, अग्रसेन भवन येथे समारोप सोहळ्यात विविध स्पर्धांच्या विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास समाजातील विजय भारूका, विजय भूत, शाम अग्रवाल, दिनेश अग्रवाल, जुगल अग्रवाल, अनिल भूत, अनुप अग्रवाल, आनंद अग्रवाल, प्रशांत भारूका, प्रमोद अग्रवाल, पंकज अग्रवाल, गोपाल अग्रवाल, गौरव भूत, सचिन अग्रवाल, विशाल अग्रवाल, लखन अग्रवाल, कृष्णा भारूका, अंकुश अग्रवाल, चिंटू भूत, कुणाल निमोदिया, डॉ. चेतन दज्जुका, अश्विन पचेरीवाल, सुनील अग्रवाल, आशिष भूत, नितेश भूत, चेतन पचेरीवाल, जय दज्जुका, मिलन दज्जुका आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचे स्वागत

## संघटन मजबुतीकरण व आगामी निवडणूक संदर्भात चर्चा

■ प्रतिनिधी | अकोला ■

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची पदाधिकाऱ्याची बैठक निमित्त प्रथम अकोला आगमना प्रसंगी पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांचे अकोला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार महानगराच्या वतीने महानगराध्यक्ष मो. रफीक सिद्दिकी यांनी हजारो कार्यकर्त्यांसह भव्य स्वागत करून सत्कार केला. चंदू भाई,नसरुद्दीन शहा करीम शहा, शबाना बी करीम शाह, आबीद तसलीम रायलीवाले, मोहम्मद साकीब पप्पू भाई, यांनी यावेळी महानगर



अध्यक्ष मो. रफीक सिद्दिकी यांच्या मार्गदर्शनात व प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या उपस्थिती पक्षप्रवेश केला. पोलीस लॉन सभागृह येथे पदाधिकारी बैठकीमध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्ता उपस्थित होते.

पदाधिकारी बैठक मध्ये अकोला महानगर अध्यक्ष मो. रफीक सिद्दीकी यांनी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्याकडे महानगराचा कार्य अहवाल सादर केले. यावेळी आगामी निवडणूक संदर्भात व संघटनमजबुतीकरण विषयी महानगर अध्यक्ष मो.रफीक सिद्दिकी व प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी यावर चर्चा केली. यावेळी प्रमुख अतिथी माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, माजी मंत्री गुलाबराव गावंडे ,प्रदेश उपाध्यक्ष श्याम बाबू अवस्ती, प्रदेश उपाध्यक्ष संतोष दादा कोरपे, अकोला निरीक्षक गणेश राय विश्वनाथ जी कांबळे, जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे उपस्थित होते. यावेळी महानगर कार्याध्यक्ष देवानंद ताले, महानगर कार्याध्यक्ष सैय्यद युसुफअली, प्रदेश संघटक सचिव जावेद जाकारीया, महानगर उपाध्यक्ष पापाचंद्र पवार, पश्चिम विधानसभा अध्यक्ष मेहमूद खान पठाण,जमील खान, अजिज भाई,बाबासाहेब घुमरे, एडवोकेट संदीप तायडे, योगेश हुमणे, उमेश खंडारे, वसीम खान, मोहम्मद सालार , शेख रमजान, आनंद वैराळे,अल्ताफ खान,रमेश नाईक, भाऊराव साबळे, काशिनाथ बागडे, मिलिंद गवई,सतीश सरपाते, सैय्यद अन्सार अली,वसीम सिद्दीकी, रेहान सिद्धीकी , मंगला सोनोने, सुलभा घाटे, नाजीमाताई यांच्यासह महानगरातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व कार्यकर्त्यांचे व पदाधिकाऱ्यांचे अकोला महानगर राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्रपवार पक्षाचे पक्षाचे महानगर अध्यक्ष मो.रफीक सिद्दिकी यांनी आभार व्यक्त केले.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २८९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# वर्धेत १७ सप्टेंबरला शेतकरी हक्क परिषद

## किसान युनियनचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकेत राहणार उपस्थित



**वर्धा जनमाध्यम**

शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी निर्णायक लढा उभारण्यासाठी संयुक्त किसान मोर्चा व शेतकरी न्याय हक्क परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने वर्ध्यात महत्त्वाची परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद बुधवार,१७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता सत्यनारायण बजाज वाचनालय, मंगनसंग्रहालया-पुढे, येथे होणार आहे.

या परिषदेला भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकेत, प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू, खासदार अमर काळे, तसेच शेतकरी प्रश्न अभ्यासक विजय जावंधिया व डॉ. अशोक ढवळे, अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सहसचिव डॉ. अजित नवले हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदीतील ७/१२ उतारे कोरे असण्याच्या गंभीर प्रश्नावर या परिषदेत सविस्तर चर्चा होऊन तीव्र आंदोलनाची भूमिका जाहीर होईल, अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

या परिषदेचे आयोजन वर्धा जिल्हा शेतकरी कामगार आंदोलन समन्वय समितीच्या वतीने करण्यात आले असून, अविनाश काकडे, यशवंत झाडे, सुनिल राऊत, मनोज चांदुरकर, सुदाम पवार, किरण ठाकरे, डॉ. सचिन पावडे, प्रमोद भोमले, द्वारका इमडवार, भैय्याजी देशकर आदींनी याबाबतची माहिती दिली.

# लोकअदालतीत 2945 वाहतूक प्रकरणांची निर्गती

**वर्धा /जनमाध्यम**

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात दाखल प्रकरणांची सुनावणी शनिवारी (दि. १३ सप्टेंबर) राष्ट्रीय लोकअदालतीत घेण्यात आली. या सुनावणीत तब्बल २९४५ प्रकरणांची निर्गती होत १८ लाख ७८ हजार ७५० रुपयांचा सरकारी दंड वसूल करण्यात आला.

वाहतूक शाखेकडून बजावलेल्या समन्सप्रमाणे वाहनचालक मोठ्या संख्येने लोकअदालतीत हजर राहिले. दंडाची रक्कम भरून अनेकांनी प्रकरणांची सोडवणूक करून घेतली. वाहनचालकांच्या या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यवाहीला भरघोस यश मिळाले.

'वाहनचालकांनी शिस्त पालन केले तर चलन प्रकरणे व दंडापासून स्वतःची सुटका होईल,' असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी या प्रसंगी केले. त्यांनी नियमांचे काटेकोर पालन करण्याची गरजही अधोरेखित केली.

वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी देखील नागरिकांना नियमांचे पालन करून सुरक्षित आणि शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्थेला हातभार लावण्याचे आवाहन केले आहे.

# महसूल पंधरवड्यानिमित्त शिवार फेरी

## शेतकऱ्यांच्या अडचणींवर चर्चा



**आर्वी जनमाध्यम**

महसूल पंधरवड्या निमित्त ग्रामीण भागातील रस्त्यांचे सीमांकन, क्रमांकन व शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी दिनांक ९ ते ११ सप्टेंबरदरम्यान बाजारवाडा, चोंदी व हरदोली येथे शिवार फेरी घेण्यात आली.

या फेरीत पायमार्ग, गाडीमार्ग तसेच शेतावर जाणाऱ्या अन्य मार्गांचे सर्वेक्षण करण्यात आले.

शिवार फेरीमुळे ग्रामीण रस्त्यांचे स्पष्ट सीमांकन होऊन शेतकऱ्यांना वाहतुकीसाठी सुलभ मार्ग उपलब्ध होणार असल्याचे प्रशासनाने नमूद केले.शिवार फेरीदरम्यान शेतकऱ्यांनी रस्त्यांबाबत होत असलेल्या अडचणी मांडल्या.

विशेषत: नकाशातील व नकाशाबाहेरील रस्त्यांच्या सोयीसुविधा, नवीन रस्ते तयार करण्याच्या गरजा यावर चर्चा झाली.

ग्रामपंचायत अधिकारी संजय यावले, ग्राम महसूल अधिकारी योगेश लथाड, कोमल जयपुरकर, नवज्योत जामनिक, विक्रम पाटील, अर्जुन दांडेकर, संगणक परिचालक विकास गजबे, पोलिस पाटील मंगेश वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुणगौरव उपक्रम इतरांकरिता प्रेरणादायी असतो : प्राचार्य डॉ. सोनारे



**देवळी जनमाध्यम**

'कौतुकाची थाप आपल्या पाठीवर पडली की प्रेरणा मिळते व अधिक काम करण्याकरिता प्रोत्साहित होतो. म्हणून गुण गौरव उपक्रम हा इतरांकरिता प्रेरणादायी असतो, असे प्रतिपादन स्थानिक एस एस एन जे महाविद्यालय येथे नुकताच शिक्षण महर्षी बापूरावजी देशमुख सभागृहात संपन्न झालेल्या गुणगौरव कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सुनिता सोनारे यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुनिता सोनारे तर मंचावर प्रमुख अतिथी म्हणून प्रा डॉ प्रभाकर ढाले, एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर, प्रा. डॉ. संतोष मोहधरे व प्राध्यापक तिवारी उपस्थित होते. गुण गौरव पुरस्कारात स्वर्गीय रामचंद्रजी ढांगे स्मृतिप्रत्यर्थ यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे माजी जनरल सेक्रेटरी स्वर्गीय जगन्नाथ जी ढांगे यांच्याकडून ऋषिकेश चौधरी याला तर रमेश पंत आचार्य यांच्याकडून स्वर्गीय नानाजी आचार्य यांच्या स्मृतीनिमित्त गौरव भास्कर ढोबळे याला रुपये ५०१ रोख देऊन सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयातील प्रियंका घोडाम, कोमल शितळे, पूजा पारखंडे, सौरभ शेंडे, रितेश बुटे, ओम देशमुख, गौरव ढोबळे, रुपेश थूल, पूजा उघडे, राकेश थूल व प्रीती शिरसागर यांना प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या निमित्त सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापकांना पेन देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ ढाले यांनी, संचालन प्राध्यापक श्री. डेबे तर आभार प्रा. वंदना तलमले यांनी मानले

# सीडीईटी इंडस्ट्रीजकडून विद्यार्थ्यांना १३५० शालेय साहित्य वाटप




**आर्वी /जनमाध्यम**

सीडीईटी इंडस्ट्रीज तळेगाव शामजी पंत यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय अभ्यास साहित्याचे वाटप करण्यात आले.

मंडळा येथे आयोजित या कार्यक्रमात आर्वी, आष्टी आणि कारंजा तालुक्यातील सुमारे १३५० विद्यार्थ्यांना रजिस्टर, नोटबुक, ड्रॉइंग बुक, पेन, पेन्सिल, इरेजर, शार्पनर, लंच बॉक्स आणि पाण्याची बाटली यांचे वाटप करण्यात आले.



कार्यक्रमात आर्वी तालुक्यातील मंडळा, लाहादेवी, चिंचोली धांगे, पाचोड तांडा, बेडोना, सावंगी, पोल, पारतोडा, जळगाव बेलोरा, पिपरी, खुबगाव, चोंधी, परगोठान, धानोडी (बहादूरपूर), गव्हाणखेडी, कवाडी, पाचेगाव आणि बोरगाव या गावांतील तर आष्टी तालुक्यात तळेगाव शामजी पंत, काकसदरा, रामदरा, नांदोरा पुनर्वसन, पोरगव्हान आणि उर्दू शाळा तळेगाव शामजी पंत येथील विद्यार्थ्यांना साहित्य वितरित करण्यात आले. तसेच कारंजा तालुक्यातील एकार्जुन, राजवाडी, पांजरा बंगाला आणि नरसिंहपूर शाळेतील विद्यार्थी लाभार्थी ठरले.

या उपक्रमामुळे ग्रामीण व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणार असल्याचे कंपनी प्रतिनिधींनी सांगितले. कार्यक्रमाला जिल्हा परिषद शाळा मंडळाच्या मुख्याध्यापिका जयश्री तायडे, शिक्षिका सुचिता ढोले, शाळा समिती अध्यक्षा श्रीमती रंजना निंबेकर, सरपंच रवींद्र दुर्वे, राजेंद्र पाचोडे, ग्रामपंचायत सदस्य तसेच मान्यवर आणि पालक उपस्थित होते.

कंपनीचे प्रतिनिधी सोमेश्वर साटोणे यांनी सांगितले की या सत्रात आर्वी, आष्टी आणि कारंजा तालुक्यातील सुमारे १५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे.

हा उपक्रम कंपनीचे अधिकारी आर. एस. पैठणकर यांच्या मार्गदर्शना खाली राबविण्यात आला.

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकी चे हे वृत्तपत्र मुद्रक,प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती -४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा ४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक -प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त)-अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष -१३ अंक २८८

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालयः- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन -९८२३०१६३००,९४२२९५६२६८

ई-मेल-atimadhyam@gmail.com

abhiramdeshpande@gmail.com

# पिंपरी पुनर्वसन शाळेत रेडक्रॉसतर्फे आरोग्य शिबीर व शिक्षकांचा सत्कार

**आर्वी /जनमाध्यम**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरी पुनर्वसन येथे इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा आर्वीच्या महिला विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिर, साहित्य वाटप तसेच शिक्षकांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ व इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखेचे संस्थापक डॉ. अरुण पावडे होते. यावेळी नंदकिशोर दीक्षित, रमेश जंवजाळ, डॉ. प्रतिभा पावडे, डॉ. अनिता भुतडा, केंद्रप्रमुख संजय कोहचाडे, मुख्याध्यापक पराग टेकाम, सरपंच रज्जाकभाऊ अली आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व दंत तपासणी डॉ. अभिलाष धरमठोक, डॉ. उमेश गुल्हाने, डॉ. देवेंद्र खंडेलवाल व डॉ. सुभाष बुधवानी यांनी केली. यावेळी केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, माजी मुख्याध्यापिका मनीषा ठाकरे, रवींद्र ठाकरे, अलका टेकाम, रूपाली राजनेकर, उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका तज मुन्नीसा बशीर यांच्यासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शाल-श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.



डॉ. प्रतिभा पावडे यांनी व्यायामाचे महत्त्व व व्यसनापासून दूर राहण्याचे मार्गदर्शन केले. पुनम राठी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व प्रात्यक्षिकातून स्पष्ट केले. अध्यक्ष डॉ. अरुण पावडे यांनी गावाच्या विकासाकरिता विद्यार्थी मोठे होऊन समाजकार्यात पुढे यावेत, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन सुजाता चांडक व रूपाली राजनेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक पराग टेकाम यांनी मानले. या वेळी रेडक्रॉस सोसायटीचे सदस्य, ग्रामस्थ आणि व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजश्री धुर्वे व सदस्यांनी सक्रिय सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी केला.

# पीककर्जाच्या वसुलीचा तगादा : शेतकऱ्यांना आत्महत्येच्या उंबरठ्यावर नेणारे वास्तव

**वर्धा जनमाध्यम**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उपाय योजना करण्यासाठी दरवर्षी पालकमंत्र्यांकडून आढावा बैठका घेतल्या जातात. या बैठकींमध्ये राष्ट्रीयकृत बँकांना स्पष्ट निर्देश दिले जातात की, शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेसे पीककर्ज द्यावे. यामुळे शेतकरी शेती मशागत, पेरणी व इतर कृषी कामांसाठी निधी मिळवून आपले उत्पादन वाढवू शकतील. पण प्रत्यक्षात या निर्णयांचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. कारण निसर्गाने साथ न दिल्याने पिके नष्ट होतात आणि शेतकऱ्यांच्या हातात काहीच उत्पन्न राहत नाही. परिणामी, घेतलेल्या पीककर्जाची परतफेड करण्यासाठी शेतकरी अक्षरशः असमर्थ होतात.

या स्थितीत बँकांचा वसुलीचा तगादा शेतकऱ्यांसाठी मानसिक त्रासाचे मोठे कारण ठरत आहे. शेतकरी थकबाकीची हप्ते भरू शकत नाहीत, अशी विनवणी बँक अधिकाऱ्यांकडे करताच त्यांना मिळणारे उत्तर अधिकच धक्कादायक असते. नातेवाईक किंवा मित्रांकडून पैसे उधार आणा, नाहीतर व्याजावर पैसे घेऊन कर्ज फेडा असे सांगणारे कर्मचारी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. हे ऐकून शेतकऱ्यांची मानसिकता पूर्णपणे खचून जाते.



आधीच हवामानातील अनिश्चितता, उत्पादन खर्चात झालेली प्रचंड वाढ, बाजारपेठेतील दरकपात या कारणांनी शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यात बँकेकडून होणारा तगादा म्हणजे आत्महत्येकडे नेणारा थेट मार्ग ठरत आहे. प्रशासन व शासनाने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर आत्महत्या रोखणे कठीण होईल, असे ग्रामीण भागात वातावरण झाले आहे.

ही हकिगत म्हणजे शेतकऱ्यांच्या हतबलतेचे जिवंत चित्र आहे. शेतकरी आत्महत्या करेल अशी शक्यता या परिस्थितीत नाकारता येत नाही. कारण मानसिक तणाव, कर्जाचा डोंगर आणि बँकेचा दबाव या सगळ्यामुळे शेतकरी मार्गहीन बनत आहे.पीककर्ज शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारे ठरावे, ही शासनाची अपेक्षा असते. परंतु सध्याच्या परिस्थितीत हेच कर्ज त्यांच्या गळफासाचे कारण ठरत आहे. बँकांच्या वसुलीचा तगादा, निसर्गाची अवकृपा आणि उत्पन्नाचा अभाव यामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे. त्यामुळे प्रशासनाने आता तरी जागे होऊन ठोस निर्णय घ्यावेत, हीच शेतकऱ्यांची कळकळीची मागणी आहे.

**शेतकऱ्यांची हकिगत एका शेतकऱ्याने मांडली व्यथा**

पिके नष्ट झाली आहेत, घर चालवायला पैसाही नाही, मग कर्ज कुठून फेडू? आम्ही बँकेच्या दारात विनवण्या करतो. पण आम्हाला सांगितले जाते की, 'पैसे कुठूनही आणा आणि हप्ता भरा.' आम्ही गरीब शेतकरी, आमच्याकडे नातेवाईकांकडूनही देणे घेण्याची ताकद राहिलेली नाही. मग आम्ही काय करू? अशी व्यथा एका शेतकऱ्याने कथित केली,

**प्रशासनाने जबाबदारी घ्यावी**

शेतकऱ्यांचा प्रश्न हा केवळ शेतीपुरता नाही, तर तो समाजाच्या अस्तित्वाशी निगडीत आहे. कारण शेतकरी म्हणजे देशाचा अन्नदाता. आज हा अन्नदाता बँकांच्या तगाद्याने आत्महत्येच्या दारात उभा आहे. पालकमंत्री व जिल्हा प्रशासनाने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. फक्त बैठकींमधील घोषणा पुरेशा नाहीत, तर प्रत्यक्ष शेतकऱ्यांना दिलासा मिळेल अशी यंत्रणा उभी करण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र कर्जमाफी योजना, कर्जवसुलीवरील तात्पुरता स्थगिती आदेश, तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीच्या भरपाईचा त्वरित लाभ देणे या सारख्या उपाययोजना प्रशासनाने तातडीने करणे गरजेचे आहे, असे आव्हान आशिष पावडे यांनी केले आहे, अन्यथा शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण आणखी वाढेल आणि त्याची जबाबदारी प्रशासनावरच येईल हे मात्र तितकेच खरे !.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आज नाशिकमध्ये 'आक्रोश मोर्चा'

## शरद पवारांच्या नेतृत्वाखाली आंदोलन; सरकारवर अमर काळेंची टीका

**वर्धा /जनमाध्यम**

निवडणुकीपूर्वी भाजपने दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनाची अजून पूर्तता न झाल्याने नाराज शेतकऱ्यांचा आक्रोश अखेर रस्त्यावर उतरणार आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट)तर्फे आज, १५ सप्टेंबर रोजी नाशिकमध्ये 'आक्रोश मोर्चा' काढण्यात येणार असून पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

राज्यातील शेतकऱ्यांची अतिवृष्टी, कर्जबाजारीपणा, सोलर योजनांतील अडचणी, वन्यप्राण्यांचे नुकसान आणि येलो मोझॅक रोगामुळे स्थिती बिकट झाली आहे. परंतु, सरकारने आतापर्यंत कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नसल्याने संताप वाढला आहे.

'शेतकऱ्यांचा प्रश्न हा केवळ शेतीचा नाही, तो जगण्याचा प्रश्न आहे. भाजप सरकार कुंभकर्णी झोपेत असून राज्यकर्त्यांना जागे करण्यासाठी आम्हाला रस्त्यावर यावं लागत आहे,' अशी तीव्र टीका खासदार अमर काळे यांनी केली.

मोर्चाला शेतकरी, शेतमजूर, युवक व पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान खासदार अमर काळे यांनी केले आहे ,

# कुऱ्हा परिसरात खरिप हंगाम नापिकीच्या छायेत

## -ओला दुष्काळ जाहीर करा -आर्थिक मदतीची शेतकऱ्यांची मागणी



**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** यावर्षी सुरूवातीपासून सततच्या पावसाने खरिप हंगाम शेतक-यांच्या हातातून गेला आहे. पेरणी केलेल्या तिवसा तालुक्यातील कुऱ्हा परिसरातील सर्व पिके यात सोयाबीन, कपाशी,तुर,मुंग व इतर पिके म्हणजे भाजीपाला सुध्दा सततच्या पावसाने पिके धोक्यात येवून नापिकीच्या मार्गावर आहे. ओला दुष्काळ परिस्थिती सध्या तरी दिसत आहे.

तेव्हा यावर्षीचा खरिप पिकांचा हंगाम सर्व शेतकऱ्यांच्या हाती येण्याच्या स्थितीत सध्या तरी नाही. यात सोयाबीन पिकाची परिस्थिती अतिशय भयानक असून शेतकऱ्यांना पिक काढणे सुध्दा खर्चापायी कठीणच आहे तसेच कपाशीचे पीक सुध्दा अति पावसाने पऱ्हाट्या पिवळ्या पडून पडल्या. परंतु आधी पकडलेले बोंडे सुध्दा सडण्यांची स्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे कपाशी पिके सुध्दा शेतकऱ्यांनी लावलागवड केलेला खर्च सुद्धा निघणे कठीण आहे.तेव्हा कपाशीची सुध्दा नापिकीच्या अवस्थेत आहे.त्याच प्रमाणे तुर सुध्दा सततच्या पावसाने पिवळी पडली असून त्याचे सुध्दा पिक होईल किंवा नाही याची सुध्दा शाश्वती नाही. तुर पिकांची सुध्दा नापिकी आज तरी वाटत आहे.यावर्षी शेतकऱ्यांनी खरिप हंगामात पिके अतोनात खर्च करूनही सतत पावसामुळे पिके सर्व धोक्यात म्हणजे नापिकीच्या छायेत आहेत. ओला दुष्काळ म्हणून शासनाने जाहीर करावा व या भागातील सर्व शेतकऱ्यांच्या शेतीमधील सर्व्हे करून त्यांना आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी शेतकरी वर्ग करित आहे.

# दर्यापूर बस स्थानकातून माहूर दर्शनासाठी विशेष बस

## रविवारी दर्शनासाठी ३ बसेस रवाना

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर बस्थानकातुन माहूर गडावरील रेणुका माता मंदिर दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांना विशेष बसची व्यवस्था करण्यात आल्याने भक्तांनी आनंद व्यक्त केला. आठवड्यातील रविवार व मंगळवारी या दिवशी विशेष बस सोडण्यात येणार आहेत.

रविवारी सकाळी सात वाजता तीन बसेस दर्यापूर बस्थानकातून सोडण्यात आल्यात. यावेळी दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांचे स्वागत प्रतिभा साहित्य संघांचे तालुकाध्यक्ष विनोद शिंगणे यांनी केले तसेच बसचे पूजन व हार अर्पण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र एसटी कामगार सेना प्रादेशिक सचिव मोहन टेकाडे, स्नेहल अडगोकार, सागर गावंडे, विठ्ठल बैलमारे, वाहन परीक्षक



संतोष ढोरे, चालक राजू आपोतीकर, उमेश आठवले, गोपाल धर्माळे,सागर मोरे, संदीप आपोतीकर, मंगेश कोलटक्के, गणेश राऊत, शाम गादे, अमोल कात्रे, पांडुरंग खांडवळ, संतोष जाधव, सुनील कोरपे, राजू चुटे, विजय भगत भक्तांच्या स्वागतासाठी उपस्थित होते.

तसेच शेंगाव येथील संत गजानन महाराज दर्शन, माहूर येथील रेणुकामाता दर्शन, दत्तशिखर दर्शन, अनुसया माता दर्शन या ठिकाणी जाणाऱ्या भक्तांनी आधी बुकिंग करणे आवश्यक असल्याचे डेपो व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले.

# स्व.आनंदराव पाटील विद्यालयात शिक्षक दिन

**तिवसा/प्रतिनिधीः-** अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त वेल्फेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित स्व.आनंदराव पाटील माध्यमिक विद्यालय तिवसा येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने विद्यालयामध्ये स्वयंशासित विद्यालय हा उपक्रम राबविण्यात आला. शाळेतील निवडक विद्यार्थ्यांनी विविध विषयाचे अध्यापन करून शिक्षकाची भूमिका बजावली. मुख्याध्यापक म्हणून श्रेयस अमर तायडे याने भूमिका बजावली तसेच शिक्षक म्हणून ओम केने, स्वप्निल होले, खुशबू कुयटे, श्रावणी नांदणे, भूमिका



गजरे यांनी भूमिका बजावली.

शाळेचे मुख्याध्यापक पद्माकर लव्हाळे व इतर शिक्षकांनी शिक्षक विद्यार्थ्यांचे कौतुक केले. उत्कृष्ट शिक्षकाची भूमिका बजावणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक पद्माकर लव्हाळे, शिक्षक शरद सरदार, माधुरी कदम, प्रांजली देशमुख, वैशाली सोमवंशी, सुलोचना कठाणे, रणजीत पावडे, राजेंद्र हिवसे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजना व नियोजना करिता शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# पी. आर. पोटे कॉलेज ऑफ आयुर्वेद येथे आयुर्वेद प्रदर्शनी

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग यांच्या परिपत्रकानुसार आयुर्वेद दिन सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्यामसुंदर भुतडा आणि शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. रणजीत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम राबविण्यासाठी समिती निवडण्यात आली. त्या समितीच्या मार्गदर्शनाखाली आज दि.१४ सप्टेंबर २०२५ रोजी स्वामी विवेकानंद सभागृह पि.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रूप अमरावती येथे आयुर्वेद प्रदर्शनी



चे आयोजन केले होते.ह्या प्रदर्शनामध्ये विविध आयुर्वेदिक औषधी वनस्पतीचे तसेच विद्यार्थ्यांनी बनवलेल्या मॉडेल्स चे प्रदर्शन करण्यात आले.ह्या प्रदर्शनादरम्यान भेट देणाऱ्या पाहुण्यांच्या प्रश्नांना उत्तम प्रकारे उत्तर दिले.नोडल ऑफिसर डॉ. स्वाती धामणीकर, डॉ.भैरवी देशमुख,डॉ .अंकिता कोरडे ह्यांनी प्रदर्शनी च्या यशस्वी आयोजनासाठी प्रयत्न घेतले.

# जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त गजानन काकडे यांचा सत्कार

**लेहेगाव/प्रतिनिधीः-** नुकताच जिल्हा परिषद अमरावती जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा पार पडला. यामध्ये सुप्रसिद्ध कवी, भजन मंडळाचे हार्मोनियम वादक , गायक गजानन काकडे मुख्याध्यापक जि.प.शाळा सालोरा पं.स.तिवसा यांना त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यासाठी जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार नियोजन भवन , जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे श्वेता सिंघल विभागिय आयुक्त अमरावती विभाग, संजिता महापात्र, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.



त्यानिमित्त दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी विनायकराव धुळे अध्यक्ष गुरुकृपा भजन मंडळ रहाटगाव यांचे अध्यक्षतेखाली व गंगाधरराव ठाकरे , दिवाकरराव वाघ यांचे प्रमुख उपस्थितीत गुरुकृपा भजन मंडळाचे पदाधिकारी तथा सदस्य गण यांनी गजानन काकडे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले आणि यथोचित सत्कार केला.

यावेळी गुरुकृपा भजन मंडळाचे पदाधिकारी व सदस्य गजानन नेहारे (अध्यक्ष , अमरावती जिल्हा पाटबंधारे कर्मचारी सहकारी पतसंस्था अमरावती ) , प्रकाश कांडलकर , मुनेश्वर उमप, नरेंद्र गुल्हाणे , नरेश राऊत , नंदकिशोर पाचघरे , प्रदिप मांडवकर , राजेंद्र कुटे , संजय बेले, सुनिल अडिकणे ,संजय उमप, नरेंद्र टाले , विजय गावंडे, अशोक पकडे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सर्वांनी आपल्या मनोगतातून त्यांचे कार्यांचा गौरव केला. प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रकाश कांडलकर यांनी, तर आभार प्रदर्शन नरेश राऊत ( ग्रामपंचायत अधिकारी ) यांनी केले.

# पूर्णा माय स्वच्छता अभियान

## -पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांचा अभिनव उपक्रम

**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** तालुक्यात सार्वजनिकच नव्हे तर, घरगुती गणेशोत्सवांनी, मोठ्या उत्साहात श्री गणेशाचे विसर्जन केले.विसर्जन करून सर्व घरी आलेत.पूर्णामायने ही श्री गणेशाच्या मुर्त्यांसह, दहा दिवसांच्या निर्माल्याला ही आपल्या जलात सामावून घेतले.मात्र पूर्णामायच्या पाण्यात पीओपीच्या तशाच पडून राहिलेल्या मुर्त्या,तर निर्माल्यामुळे नदी तीरावर निर्माण झालेले घाणीचे साम्राज्य.यामुळे पूर्णामायचा जीव कासावीस झाला होता.याचा सर्वच गणेश भक्तांना विसर पडला. मात्र याला अपवाद ठरले ते , निर्मिती पब्लिक स्कूल चे विद्यार्थी.या शाळेच्या विद्यार्थ्यांनी 'माझी शाळा, सुंदर शाळा' हा उपक्रम,शाळेपूरता मर्यादित न ठेवता 'पर्यावरणाचे संवर्धन म्हणजेच निसर्गाचे रक्षण.



या जाणिवेतून,'पूर्णा माय स्वच्छता अभियान' मोहीम राबविली.या शाळेच्या चिमुकल्यांनी पूर्णा नदीच्या पात्रातील, गणपती विसर्जन स्थळांची संपूर्ण स्वच्छता केली. विद्यार्थ्यांच्या या कृतीमुळे, पूर्णा मायचे नीर ही खळखळा वाहायला लागले.अन् पूर्णामायने मोकळा स्वास घेतला. निर्मिती पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांनी प्रशासनालाच नव्हे तर,समाजालाही स्वच्छतेचा नाविन्यपूर्ण संदेश दिला आहे.हे शाळेचे विद्यार्थी वयाने लहान असले तरी,त्यांच प्रबोधनात्मक कार्य खूप मोठ आहे.याची दखल घेऊन प्रशासनानेच नव्हे तर, समाजाने ही या विद्यार्थ्यांचे कौतुक करने क्रमप्राप्त आहे. विद्यार्थ्यांच्या या शाळा बाह्य उपक्रमाला संस्थेचे अध्यक्ष भास्करराव टोम्पे यांचे सह, मुख्याध्यापक तुषार खोंड, सर्व शिक्षक, शिक्षिका यांनी सहकार्य केले.

**'माझी शाळा, सुंदर शाळा' उपक्रमातून स्वच्छतेचा संदेश**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात जिल्हास्तरीय मिनीगोल्फ स्पर्धा संपन्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अमरावती येथील शारीरिक शिक्षण विभाग आणि अमरावती मिनीगोल्फ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय मिनीगोल्फ स्पर्धा सिंगल, डबल आणि सांघिक या गटात दिनांक १० आणि ११ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडली.

या स्पर्धेचे उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ. कमलाकर पायस (सचिव, श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती) हे



होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संगीता येवतीकर (जिजामाता क्रीडा पुरस्कार प्राप्त) या होत्या. या स्पर्धेत अंडर १४, १७ आणि १९ वयोगटातील विविध शाळेतील २५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील विजेते खेळाडू अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व या खेळाच्या विभागीय स्तरावरील स्पर्धेत करतील म्हणून ही स्पर्धा महत्त्वाची मानली जाते. ही स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या भव्य क्रीडांगणावर पार पडली. अमरावती जिल्ह्यातील खूप कमी शाळा आणि महाविद्यालयात मिनीगोल्फ चे मैदान उपलब्ध आहे, त्यापैकी हे एक महाविद्यालय आहे.

या स्पर्धेला परीक्षक म्हणून पवन डोईफोडे, ज्योती किर्दक, सोनाली वानखडे, आदेश डोंगरे, रोहित नांदुरकर, आणि श्रुती बडेरे यांनी काम पाहिले. तर या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. सुनील कुमार यांच्यासह प्रणिता सदाशिव, नंदिनी गवई, रीना तायडे, तनिष्का इंगोले, वैष्णवी थोरात, रोहित, सिमरन, नयना, हर्षल, अनुराग, श्रवण या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# शिरखेड येथे अशोक सरस्वती बौद्ध यांचे धम्म प्रवचन

**काटपुर/प्रतिनिधीः-** शिरखेड येथील सिद्धार्थ बौद्ध विहारात बौद्ध धम्म प्रबोधनकार अशोक सरस्वती बौद्ध यांचे धम्म प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाध्यक्ष राजू वानखडे, राजेंद्र पारवे, दिलीप बोरकर, भागवतराव इंगळे, वसंतराव इंगळे, नरेश खराते, प्रकाश इंगळे, अमोल सरवटकर, लव्हाळे, माजी सरपंच सुनंदा तागडे, इत्यादी मान्यवरांचे




उपस्थितीत धम्म प्रबोधनाचा कार्यक्रम घेण्यात आला.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते आदर्शांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास राऊत यांनी केले. बौद्ध धम्म प्रबोधनकार अशोक सरस्वती बौद्ध यांनी बौद्ध धम्म व आजची वास्तविक परिस्थिती यावर उपस्थितांना आपल्या प्रबोधनातून मार्गदर्शन केले. यावेळी शिरखेड येथील बौद्ध उपासक-उपासिका तसेच सावरखेड, लाडकी, विष्णोर, काटपूर, नेरपिंगळाई, येथील बौद्ध उपासकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता राजेंद्र पारवे,प्रदीप खराते, प्रभाकर खराते, विकी थोरात, दिलीप बोरकर, गोवर्धन खराते, प्रज्वल गावंडे, व महिला संघाने परिश्रम घेतले.

# परिणय बंध सभागृह रामनाममय

## दशकपूर्ती वर्ष : १३ कोटी रामनाम नवरात्र उत्सवाची सांगता

### -श्रीराम महाराज सेवा मंडळाचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राम नामानेच प्रभू श्रीराम आपली जीवन नौका पार नेतात, हा विश्वास प्रभू श्रीराम आराध्य दैवत असलेल्या भाविकांना आहे. 'श्रीराम जय राम जय जय राम'... असा रामनाम जप ,परिणय बंध सभागृहात (व्यंकटेश लॉन ) १३ कोटी रामनाम नवरात्रात रात्रंदिन गेले दोन दिवस मोठया श्रद्धेने सुरु आहे. श्रीराम महाराज सेवा मंडळाचे वतीने आयोजीत १३ कोटी रामनाम जप यज्ञाचे हे दहावे वर्ष असून भाविक विशेष उत्साहाने रामनाम जप करीत आहेत .





आता १२ आणि १३ तारखेपासून परिणय बंध सभागृहात व्यंकटेश लॉन

या वर्षी १३ तारखेच्या दुपारपर्यंत सुमारे ८ कोटी रामजप झाला असून १४ सप्टेबर रोजी जप आणि सांगता सोहळा परिणय बंध येथे आयोजित केला होता.

आयोजक श्रीराम महाराज सेवा मंडळाचे वतीने अतिशय शिस्तबद्ध रामनाम नवरात्र उत्सवाची अनेक दिवस पूर्वतयारी सुरु असते. यासाठी वरचेवर बैठकी आणि विविध कमेटी बनविल्या जातात. या वर्षी दि. ७ ते १४ सप्टेंबर या कालावधीत , राम नाप जप श्रीराम महाराज यांच्या आशीर्वादाने व रामभक्तांच्या मोठया प्रतिसादात प्रारंभीच्या टप्प्यात ७ तारखेपासूनच घरी सुरु झाला. घरी केलेल्या जपाची नोंदणी भाविकांनी आयोजकांकडे केली आहे . परिसरात प्रत्यक्ष उपस्थित राहून जपाचा दुसरा टप्पा संपन्न होतोय.

परिणय बंधमध्ये प्रवचन, कीर्तन,भजन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . ह .भ. प . पूजनीय मंदाताई गंधे , ह .भ. प . श्री. राजेंद्र जोशी यांचीही कीर्तनसेवा महाराजांच्या चरणी अर्पण झाली. अमृता खातखेडकर यांचे महाराजांच्या सहवासात आलेले दिव्य अनुभव व त्यांचे चरित्र यावर श्रवणीय प्रवचन झाले.

कीर्तनकार राघवेंद्र देशपांडे यांचे समर्थ सद्गुरूच्या जीवन चरित्रावर कीर्तन झाले. सद्गुरू श्री श्रीराम महाराज यांनी रामनाम जपाला फार महत्त्वाचे स्थान दिले आहे. ते म्हणतात, 'मुखी नाम ,जिवाला आराम'.

# मनपा आयुक्तांची ट्रान्सस्पोर्ट नगर, तारखेडा येथे पाहणी

## - अतिक्रमण हटविण्यासह जागा विकसित करण्याचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी १२ सप्टेंबर रोजी ट्रान्सस्पोर्ट नगर, ट्रान्सस्पोर्ट मार्केट, अबुबकार नगर, सोपीयान नगर परिसरातील नाली, अतिक्रमण, भंगार साहित्य तसेच प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत तारखेडा येथे सुरु असलेल्या बांधकामांची पाहणी केली.

या पाहणीदरम्यान आयुक्तांनी संबंधित विभागांना तत्काळ अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सदर जागा विकसित करण्याबाबतही त्यांनी आदेश दिले. बाजार परवाना विभाग व अतिक्रमण विभागाला अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्याचे सक्त निर्देश देण्यात आले.

महानगरपालिकेच्या या कार्यवाहीमुळे संबंधित परिसरात स्वच्छता, शिस्तबद्ध विकास आणि नागरिकांसाठी आरोग्यदायी वातावरण उपलब्ध होणार आहे. या पाहणी दरम्यान आयुक्तांनी परिसरातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. सदर नागरिकांच्या समस्या निराकरण करण्याचे संबंधीत अधिका-यांना निर्देशित करण्यात आले.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निर्देश दिले की, ट्रान्सपोर्ट नगर, ट्रान्सपोर्ट मार्केट, अबुबकार नगर व सोपीयान नगर परिसरातील अतिक्रमण तातडीने हटवून जागा स्वच्छ व सुशोभित करावी. भंगार साहित्य पूर्णपणे काढून टाकावे तसेच सदर जागा विकसित करण्याची कार्यवाही तातडीने हाती घ्यावी. बाजार परवाना विभाग व अतिक्रमण विभागाने कठोर कारवाई करून नागरिकांना स्वच्छ व सुसंस्कृत परिसर उपलब्ध करून द्यावा.



महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आवाहन केले की, नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करू नये. स्वच्छता आणि शिस्तबद्ध विकासासाठी प्रशासनाला सहकार्य करावे. आपला परिसर सुंदर, हिरवागार आणि स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा.

यावेळी तारखेडा येथील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सुरू असलेल्या बांधकामांचीही त्यांनी पाहणी केली. कामांना गती देऊन दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देत, या योजनेंतर्गत नागरिकांना त्वरित दिलासा मिळावा असेही त्यांनी सांगितले.

या पाहणी दरम्यान शहर अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, बाजार परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त दिपक खडेकार, उदय चव्हाण, उपअभियंता विवेक देशमुख, अभियंता आनंद जोशी, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु डिक्याव, राजेश राठोड, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ११**

आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### ज्ञानयोगी डॉ.श्रीकांत जिचकार यांची जयंती

**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्र येथे ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. संचालन व ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली. जयंती कार्यक्रमाला डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. संदीप जोशी तसेच विद्यापीठातील कर्मचारी उपस्थित होते.



### नशा मुक्त भारत अभियान

**चांदूर रेल्वे**-विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित महिला आर्ट्स कॉमर्स कॉलेज, चांदुर रेल्वे येथे नुकतेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने नशा मुक्त भारत अभियान उपक्रमांतर्गत मार्गदर्शन व नशा मुक्ततेची शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार देशमुख, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पूर्ती लाखोडे ग्रामीण रुग्णालय चांदुर रेल्वे, प्रमुख पाहुणे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजय कापसे, भूगोल विभागप्रमुख प्रा. संजीव भुयार हे होते. पूर्ती लाखोडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून समाजात असलेले व्यसन आणि त्याचे दुष्परिणाम याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच तंबाखू, गुटखा, दारू यामुळे होणारे रोगांविषयी माहिती दिली.प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिता एस. धुर्वे यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. शीतल रोकडे यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या प्रमाणावर विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### संत अच्युत महाराज पुण्यतिथीनिमित्त भावांजली

**अमरावती**-श्रीसंत अच्युत महाराज यांच्या १३ व्या पुण्यतिथीनिमित्त बडनेरा येथील जुन्यावस्तीत श्रीकांत रहाटगावकर यांचे निवासस्थानी



गुरुदेव सेवा मंडळाचे जीवन-प्रचारक तथा दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे व संच यांच्या भक्ती भावांजलीचा संगीतमय कार्यक्रम झाला.यावेळी तबल्याच्या साथीला प्रशांत दुधे तर टाळ व सहगायनाच्या साथीला सर्वश्री राजेंद्र इंगोले, गणेश खंडार, निलेश रुमणे, मनोज संभे, अशोक रुमणे व सुनील तायडे आदी सहकलाकार होते. कार्यक्रम घडवून आणण्यास शरदराव रहाटगावकर, श्रीकांत रहाटगावकर, महेश रहाटगावकर व परिवारातील सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे शेवटी सामुहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमास दत्तात्रय रहाटगावकर, संत गाडगेबाबा रक्तपेढीचे संचालक सोपान गोडबोले, बंडोपंत जोशी, श्रीरंग वेळुकर, सचिन जोशी, श्याम खानझोडे, त्र्यंबक पांडे, शरद बाळापुरे, विर्द्या देव, साक्षी सहस्त्रभोजने, रश्मी देशपांडे, रंजना रहाटगावकर, रोहिणी देशपांडे, अनिता रहाटगावकर, कमलाबाई झलके श्याम बडनेरकर, सुरेश वानखडे, अनिल पोकळे यांचेसह बहुसंख्येने भक्तमंडळी आवर्जून उपस्थित होती.

### डॉ. पंजाबराव देशमुख रूग्णालय येथील रूग्णांसाठी रूग्णवाहिकेची व्यवस्था

**अमरावती :-** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात सर्वच प्रकारच्या अत्याधुनिक सेवा उपलब्ध आहे व शासनाच्या आरोग्य सेवेच्या योजनांचा लाभ गरजू रूग्णांना मोठ्या प्रमाणात होत आहे. रूग्ण भरती करीता आणण्याविषयी असलेल्या अडचणी लक्षात घेऊन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व रूग्णालय प्रशासन यांनी रूग्णांनासाठी रूग्णवाहिका उपलब्ध करून दिलेली असून त्याचे नाममात्र शुल्क १००/- रूपये प्रती फेरी आकारले जाईल. ही सुविधा फक्त अमरावती शहरातील रूग्णांसाठीच आहे. संबधितांनी रूग्णवाहिकेकरीता आकस्मिक कक्षाचा दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२३२३ व भ्रमणध्वनी क्रमांक ८७६७५४७०३३ या क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.अनिल देशमुख व वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे यांनी केले आहे.


## निधन

### रमेश धर्माळे



**अमरावती** -येथील रहिवासी रमेशराव विठोबाजी धर्माळे यांचे (शनिवार दि.१३) दुपारी ३ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार हिंदू स्मशानभूमीत पार पडला.त्यांच्या निधनाने धर्माळे कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी,मुलगा सुनील,सून नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

### ज्ञानेश्वरराव ठाकरे



**नांदगाव खंडेश्वर**-तालुक्यातील खंडाळा खुर्द येथील सेवानिवृत्त शिक्षक ज्ञानेश्वरराव दौलतराव ठाकरे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी,२ मुले, २ मुली व बराच आप्त परिवार आहे. ते कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रमोद ठाकरे यांचे काका होते.

# पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील निवडणुकांचा बिगूल वाजला

**अमरावती/का.प्र.**

निवडणूक आयोगाने राज्यातील पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील मतदार नोंदणीचा कार्यक्रम जाहीर करताच राजकीय वर्तुळात चैतन्य पसरले असून आगामी विधानपरिषद निवडणुकांचा बिगुलच फुंकला गेला आहे. या निवडणुकीत खास करून अमरावती शिक्षक मतदारसंघ व नागपूर पदवीधर मतदारसंघ सर्वाधिक चर्चेत राहणार असून, विदर्भातील या दोनही निवडणुका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिष्ठा पणाला लावणाऱ्या ठरणार आहेत.

२०२६ मध्ये रिक्त होणाऱ्या एकूण पाच विधानपरिषद मतदारसंघात निवडणुका होणार आहेत. त्यात औरंगाबाद, पुणे, नागपूर पदवीधर तसेच अमरावती, पुणे शिक्षक मतदारसंघ यांचा समावेश आहे. सध्या या मतदारसंघात अनुक्रमे सतीश चव्हाण, अरुण लाड, अभिजित वंजारी, किरण सरनाईक



व जयंत आसगावकर हे आमदार आहेत. त्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपणार आहे. १ नोव्हेंबर २०२५ पासून मतदार नोंदणीला सुरुवात होणार असून ३० सप्टेंबर रोजी पब्लिक नोटीस प्रसिद्ध केली जाणार आहे. १५ ऑक्टोबरला वृत्तपत्रांमध्ये अधिकृत जाहिरात प्रसिद्ध होईल. आक्षेप नोंदविण्यासाठी २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर दरम्यान मुदत असेल. अंतिम मतदार यादी ३० डिसेंबर रोजी जाहीर केली जाईल. या निवडणुका पक्षीय चिन्हांवर लढवल्या जात नसल्या तरीही राजकीय समीकरणांचा थेट प्रभाव जाणवतो. महायुती व महाआघाडी दोन्ही गट या निवडणुकीत प्रतिष्ठेचा प्रश्न करून रणसंग्राम रंगवतील, हे निश्चित आहे. विशेषतः अमरावती आणि नागपूरमधील निकालावरून विदर्भातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळणार आहे. त्यामुळे, पुढील वर्षी होणाऱ्या विधानपरिषद निवडणुका केवळ उमेदवारांची कसोटी ठरणार नसून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठीही राजकीय प्रतिष्ठेची मोठी परीक्षा ठरणार आहे.

### अमरावती : 'पैठणी' निवडणुकीची आठवण

अमरावती शिक्षक मतदारसंघात सध्या अपक्ष आमदार किरण सरनाईक विराजमान आहेत. २०२० मधील निवडणुकीत त्यांनी महाविकास आघाडीचे श्रीकांत देशपांडे यांचा पराभव केला होता. त्यावेळी झालेल्या 'पैठणी वाटप'च्या चर्चेने संपूर्ण निवडणूक गाजली होती. आता फडणवीस मुख्यमंत्री असल्याने,या मतदारसंघात महायुती उमेदवाराची निवड आणि प्रचार मोहिमेवर विशेष लक्ष केंद्रीत होणार आहे.

### नागपूर : भाजपला धक्का, काँग्रेसचा विजय

नागपूर पदवीधर मतदारसंघातून सध्या काँग्रेसचे अभिजित वंजारी हे आमदार आहेत. त्यांनी माजी महापौर संदीप जोशी यांचा पराभव करून भाजपचा गड ढासळवला होता. भाजपने मावळते आमदार अनिल सोले यांना तिकीट नाकारताच नाराजी वाढली आणि त्याचा परिणाम निकालावर झाला. त्यावेळी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री व देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षनेते होते. या पार्श्वभूमीवर आता फडणवीस मुख्यमंत्री असताना ही निवडणूक भाजपसाठी प्रतिष्ठेची ठरणार आहे.

## नगरपंचायत निवडणुकीसाठी अनेक जण इच्छूक

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आता जवळ आल्याने नांदगाव तालुक्यात राजकीय मोर्चे बांधणीला वेग आला जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपंचायत ची निवडणूक होत असल्याने सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले मात्र नांदगाव नगरपंचायत च्या निवडणुकीसाठी अनेक जण इच्छुक असल्याचे दिसून येत. नगरपंचायत मध्ये प्रशासकीय राजवटीला साडेचार वर्षाचा कालावधी होत आह.त्यामुळे आगामी होत असलेल्या नगरपंचायत च्या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षाच्या इच्छुक कार्यकर्त्यांची उत्सुकता वाढली शिवाय नांदगाव नगरपंचायत च्या निवडणुकीत प्रथमच नगराध्यक्षाची निवड ही जनतेमधून होत असल्याने मतदारांमध्ये सुद्धा उत्साह दिसत आहे.

नगरपंचायतची प्रथम निवडणूक पार पडली त्यामुळे सन २०२० मध्ये नगरपंचायतची पुन्हा निवडणूक होणे अपेक्षित होती परंतु प्रभाग रचनेमध्ये विसंगती असल्या च्या आक्षेपकामुळे निवडणूक न होता नगरपंचायत मध्ये प्रशासकीय राजवट सुरू झाली आगामी होऊ घातलेल्या नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस आणि भाजपा या प्रमुख पक्षामध्ये लढत होण्याचे संकेत आहे परंतु नगराध्यक्ष पदासाठी अनेक इच्छुकांची नावे समोर येत आहे. काँग्रेसकडून माजी नगराध्यक्ष अक्षय पारस्कर काँग्रेसचे तालुका अध्यक्ष निशांत जाधव शहर अध्यक्ष अमोल धवसे यांची नावे चर्चेत आहे शिवाय हल्ली केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता असून मतदारसंघाचे नेतृत्व सुद्धा भाजपाचे आमदार प्रताप अडसड यांच्याकडे असल्याने नगराध्यक्ष पदासाठी भाजपकडून इच्छुकांची संख्या अधिक असली तरी भाजपाचे राजेश पाठक, माजी नगराध्यक्ष संजय पोफळे, प्रदीप जोशी हे पक्षाकडे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी दावेदारी करणार असल्याचे समजते शिवाय शिवसेना ठाकरे गटाकडून प्रकाश मारोटकर नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविण्याची तयारी करीत आहे.

त्याशिवाय इतरही राजकीय पक्षाचे इच्छुक नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या शर्यतीत असून वेळेवर राजकीय युती आघाड्यांचे व गटा तटाचे कोणते राजकीय समीकरण जुळते यावर सर्वकाही अवलंबून आहे.

## अभियांत्रिकी दिनानिमित्त मार्गदर्शन
### डॉ. कमलताई गवईं यांची उपस्थिती

**अकोला**-अभियांत्रिकी दिनाच्या निमित्याने श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या बाभूळगांव-अकोला येथील अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयात देशात महत्त्व आईचे स्थान प्राप्त असलेल्या माजी लेडी गव्हर्नर प्राचार्या डॉ कमलताई दादासाहेब गवई यांना मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आलेले आहे.

महाविद्यालयातील स्थापत्य विभागाच्या वतीने साजरा होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रशांत थोरात, प्रमुख पाहुणे म्हणून इंजिनिअर सुनिल हातेकर ( अकोला ) तथा स्थापत्य विभाग प्रमुख डॉ अभिनंदन गुप्ता यांची उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमाची पूर्व तयारी तथा



निमित्याने महाविद्यालयात गेल्या दोन दिवसांपासून विविध विषयांवर विद्यार्थी स्पर्धा झाल्या असून या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या सर्वच विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे. त्याच बरोबर या सत्रामध्यो महाविद्यालयातील सर्व विभागातील उल्लेखनिय कार्यकरणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा विशेष आमंत्रित करण्यात आलेले आहे.या सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण तथा विद्यार्थी कार्यगौरव डॉ कमलताई गवई यांच्या शुभहस्ते संपन्न होईल. वृक्षारोपण, किनोट मार्गदर्शन अश्या विविध मार्गदर्शनाची मेजवानी या दिनाच्या निमित्याने महाविद्यालयास लाभणार असून माजी राज्यपाल रा. सु. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या अर्धांगिनी असलेल्या तथा देशाचे सन्माननिय सरन्यायाधिश यांच्या माता असलेल्या डॉ कमलताई गवई ह्या आईच्या वात्सल्याने उपस्थितांना मार्गदर्शन करणार असाल्याने या ऐतिहासिक क्षणाली सर्वांना उत्सुकता सुद्धा लागली आहे.

## प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख यांना राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्कार प्रदान

**अमरावती/का.प्र.**

सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये स्वतःच्या कार्याचा अमिट ठसा जिद्दीने उमटविणाऱ्या प्राचार्य डॉ स्मिता देशमुख यांना पुणे येथे प्रतिष्ठित जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स च्या वतीने अतिशय दिमाखदार सोहळ्यामध्ये आदर्श प्राचार्य पुरस्काराने गौरविण्यात आले.

शिक्षण आणि समाज विकासामध्ये शिक्षक आणि प्रशासकांची भूमिका लक्षात घेऊन शिक्षकदिन आणि संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. समारंभाध्यक्ष महाराष्ट्र एज्युकेशन



सोसायटीचे अध्यक्ष एअर मार्शल डॉ. भूषण गोखले, प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स चे संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपक शहा यांच्या हस्ते व प्राचार्य सुधाकरराव जाधवर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या समारंभात पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना आदर्श कुलगुरू, सीओईपी टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुनील भिरूड यांना आदर्श कुलगुरू, शिक्षणाधिकारी प्रा. भाऊसाहेब कारेकर यांना आदर्श शिक्षण सेवक, डॉ. रामदास झोड यांना आदर्श संस्थापक तसेच प्रा. चेतन दिवाण यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या सन्मानाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## जि.प.निवडणूक संदर्भात शिवसेना शिंदे गटाची आढावा बैठक

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपंचायत ग्रामपंचायत निवडणुका लवकरच होणार आहे त्याच अनुषंगाने नांदगाव खंडेश्वर शिवसेना शिंदे गटाच्या वतीने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक विश्रामगृह येथे उत्साहात पार पडली.

शिवसेना मुख्यनेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने जिल्हा प्रमुख निशांत हरणे व उपजिल्हा प्रमुख सुनिल केणे शिवसेना ज्येष्ठ नेते प्रशांत वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली



तालुक्यातील सर्व शिवसेना पदाधिकारी आढावा बैठकीला उपस्थित होते. आढावा बैठकीत शिवसेना येणाऱ्या आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपंचायत ग्रामपंचायत निवडणुकीत पक्षाचे जास्तीत जास्त सदस्य कसे निवडून आणता येतील. या पार्श्वभूमीवर शिवसेना सदस्य नोंदणी, आणि कार्यपद्धती यासंबंधी सखोल चर्चा या बैठकीत करण्यात आली. तालुका प्रमुख पवन ठाकरे यांनी सांगितले. उपस्थितांना येणाऱ्या निवडणुकी संदर्भात मार्गदर्शन केले. व तालुक्यात भगवा फडकवण्याचा संकल्प केला. या बैठकीला राजेंद्र लेंडे, माया देशमुख, सुधिर खंडार, रवि राऊत, विलास धांडे, गणेश पाडर, मनोज जैन, अमोल शिरभाते, विवेक भगत, शैलेश पिंजरकर, संदीप चौधरी, निरंजन कारमोरे, महादेव महाजन, योगेश गुंजाळ, महादेव खित्ते, राहुल हजारे, विवेक भगत व अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## मनपा आयुक्तांची संत गाडगेबाबा प्रशासकीय प्रबोधिनीला भेट



### विद्यार्थ्यांशी संवाद साधला

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी कॅम्प परिसरातील महिला व बाल विकास विभागामार्फत संचालित संत गाडगेबाबा प्रशासकीय प्रबोधिनी (अभ्यासिका व ग्रंथालय) या ठिकाणी भेट देऊन तेथील सुविधा, व्यवस्थापन आणि परिसराचा आढावा घेतला.

या दौऱ्यात आयुक्तांनी अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि परीक्षेसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंका व समस्यांवर त्यांनी उपयुक्त सूचना दिल्या आणि यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या अभ्यासपद्धतीबाबत मार्गदर्शन केले.परिसराची पाहणी करत पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. तसेच अभ्यासिकेतील सुविधांमध्ये सुधारणा करण्याचे आणि आवश्यक बाबी त्वरित उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.ही भेट अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली असून महानगरपालिकेच्या पुढाकारामुळे भविष्यात आणखी सुधारणा आणि सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. संत गाडगेबाबा प्रशासकीय प्रबोधिनी येथे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी आवाहन केले की, आपल्या स्वप्नांवर विश्वास ठेवा, कठोर परिश्रम करा आणि सातत्य ठेवा. तुमचे यश हे केवळ वैयक्तिक न राहता समाजाच्या विकासासाठीही प्रेरक ठरलं पाहिजे. महानगरपालिकेच्या वतीने आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. या अभ्यासिकेचा जास्तीत जास्त लाभ घ्या, ङ्अमरावतीचं नाव उज्वल करा असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे. कार्यक्रमावेळी उपायुक्त नरेंद्र वानखडे, शिक्षणाधिकारी व महिला व बाल विकास अधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी भूषण पुसतकर, अभियंता राजेश आगरकर, कर्मचारी अमोल साकुरे, श्रीधर हिवराळे, प्रवीण चौधरी, प्रज्वल शेंडे व खुशबू बैस उपस्थित होते.

## संत अच्युत महाराजांना भाविकांची मौन श्रद्धांजली
### दोन मिनिटांसाठी श्री क्षेत्र शेंदूरजना बाजार स्तब्ध; राज्याच्या कानाकोपऱ्यातुन भाविकांची हजेरी

**तिवसा/का.प्र.**

विदर्भाचे ज्ञानेश्वर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र शेंदूरजना बाजार येथील गुरुमाऊली श्री संत अच्युत महाराज यांना (ता.१३)रोजी ठीक १० वाजून १० मिनिटांनी मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन शेंदूरजना बाजार येथे हजारो भाविक या सोहळ्यासाठी उपस्थित झाले होते.



श्री संत अच्युत महाराज यांचे तिथीनुसार भाद्रपद वद्य सप्तमी या दिवशी व ७ सप्टेंबर रोजी महाराजांचे देहावसान झाले होते .या दिवसाला स्मरून महाराजांच्या जीवन कार्याची माहिती आज या पुण्यतिथी सोहळ्याप्रसंगी उपस्थित भाविकांना व्यासपीठावरून करून देण्यात आली. आजच्या या सोहळ्याला संत सचिन देव महाराज, अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाचो सरचिटणीस जनार्दनपंत बोथे गुरुजी,सुधीर दिवे,डॉ अनिलपंत सावरकर, कण्हेरकर महाराज, रायजीप्रभु शेलोटकर, सयाजी महाराज, श्रीकांत महाराज, सागर पासेबंद, अशोक देवते, भोजराज देवते, सदगुण ठोसर, धिरज केने, कृष्णाजी गिरधर, श्री मोकासदार, डॉ उजवणे, लक्ष्मीकांत वेरुळकर, डॉ आशिष धर्माळे, देविदास सावरकर, शरद असेरकर, डॉ विजय देवळे आदी मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित होते.

भक्तिमय वातावरणात गुरुमाऊली श्री संत अच्युत महाराज यांच्या महासमाधी स्थळी ठीक १० वाजता उपस्थित हजारो भाविक भक्तांनी मौन श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी अगदी २ मिनिटांसाठी श्री क्षेत्र शेंदुरजना बाजार येथील गुरुमाऊली संत अच्युत महाराज यांचा आश्रम परिसर स्तब्ध झाला होत'चलाना हमे. नाम गुरू का चलाना'. अशी अनेक गीते रघुनाथ कर्डीकर व त्यांच्या संचाने गुरुचरणी अर्पण केली व 'ओम अच्युताय नम :' चा गजर करून या श्रद्धांजली सोहळ्याचा समारोप केला. श्रद्धांजली सोहळ्यानंतर संत अच्युत महाराज संस्थानचे अध्यक्ष डॉ अनिलपंत सावरकर यांनी महाराजांच्या जीवनकार्याची माहिती, संस्थानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची व आगामी काळात होणाऱ्या कार्याची माहिती मांडली.

# जिप-पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी काँग्रेस सज्ज

## -विधानसभा निहाय प्रभारी जाहीर -प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक

**-झेडपीवर पुन्हा झेंडा फडकविणार: बबलू देशमुख**

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजेच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका आता काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून काँग्रेसने संघटनात्मक पातळीवर कंबर कसली आहे. रविवारी काँग्रेस भवन येथे सहा विधानसभा सर्वांची बैठक प्रभारींच्या उपस्थितीत तसेच जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेली. या बैठकीला तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष तसेच विविध महत्त्वाचे पदाधिकारी उपस्थित होते.बैठकीस प्रमुख अतिथी म्हणून खासदार बळवंत वानखडे, नवनियुक्त जिल्हाप्रभारी सिद्धार्थ हत्तीअंबिरे, तसेच प्रदेश सरचिटणीस हरिभाऊ मोहोड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संघटनात्मक कामकाजाबरोबरच आगामी निवडणुकीत जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये काँग्रेसचा झेंडा फडकवण्यासाठी ठोस रणनिती आखण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांच्या बळावर जनतेपर्यंत पोहोचून काँग्रेसची विचारधारा दृढ करण्याचे निर्देश या बैठकीत देण्यात आले.विशेष म्हणजे जिल्हा काँग्रेसने प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी प्रभारी नियुक्त करून संघटनाला नवे बळ दिले आहे. धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघासाठी अक्षय राऊत (सचिव), तिवसा मतदारसंघासाठी धनंजय देशमुख (बुलढाणा), दर्यापूर मतदारसंघासाठी



प्रशांत पाचडे (सचिव), मेळघाट मतदारसंघासाठी संजीवनी बिऱ्हाडे (अकोला), अचलपूर मतदारसंघासाठी संजय खाडे (सचिव) तर वरुड-मोर्शी मतदारसंघासाठी जावेद अन्सारी (सचिव) यांची प्रभारी म्हणून निवड करण्यात आली आहे.

ही नियुक्ती म्हणजे फक्त नावे जाहीर करणे नसून आगामी निवडणुकीसाठी काँग्रेस कार्यकर्त्यांना मिळालेली प्रेरणा आहे. प्रत्येक विधानसभा प्रभारी आपल्या मतदारसंघातील तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून संघटनाला गती देणार आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या रणांगणात काँग्रेसचा झेंडा पुन्हा फडकवण्यासाठी या नियुत्त्या महत्त्वपूर्ण ठरणार आहेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. बैठकीला हरिभाऊ मोहोड,सुधाकरराव भारसाकळे, प्रमोदराव दाळु, महेंद्र सिंह गेलवार, किशोर देशमुख, नामदेवराव तनपुरे, अमित गावंडे, श्रीनिवास सूर्यवंशी,श्रीकांत जोडपे,श्रीकांत बोंडे,सहदेव बेलकर, अमोल होले, प्रदीप देशमुख,वैभव वानखडे, पंकज वानखडे, भूषण कोकाटे, शेख मुख्तार भाई,प्रदीप मुंदडा,आतिश शिरभाते, पवन बेलसरे, राहुल बोडके आदींची उपस्थिती होती.

■ आजवर जिल्हा परिषद मध्ये काँग्रेसचा झेंडा राहिलेला आहे, हीच परंपरा पुढेही कायम राहील, आगामी निवडणुकीसाठी आता प्रत्येकाने सज्ज होणे गरजेचे आहे.
काँग्रेसचे विचार घराघरात पोहोचून पुन्हा एकदा जिल्हा परिषदेवर काँग्रेसचा झेंडा फडकवा.
**-जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख**

# जो जिंकतो तोच जगण्याची प्रवृत्ती कायम ठेवतो : डॉ संजय उपाध्ये

**-अमृत मंथन व्याख्यानमालेचे समारोपीय पुष्प संपन्न**

**अमरावती/प्रतिनिधीः-** परंपरांमध्ये जगताना काळानुसार वर्तमानातील बदल आचरणात आणायला हवेत. स्वत:च्या उणिवांवर सतत चर्चा करण्यामुळे आत्मविश्वास कमी होईल. आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रतिसादाचा ठेवा म्हणजेच जो जिंकलो तोच जगण्याची प्रवृत्ती कायम ठेवण्याचे प्रतिपादन व्याख्याते डॉ. संजय उपाध्ये यांनी केले.



वैचारिक प्रबोधनातून समाज प्रगल्भ होतो असा समाज विश्वाचे नेतृत्व करू शकतो याची जाणीव आत्मसात करीत तुषार भारतीय व मित्र परिवार मागील तेरा वर्षापासून अमृत मंथन व्याख्यानमालेचा ज्ञानयज्ञ धगधगत ठेवत आहे . यंदा तेरावे वर्ष असून साईनगर परिसरातील बडनेरा मार्गावरील महेश भवन येथे आयोजित अमृत मंथन व्याख्यानमालेचे समारोपीय पुष्प रविवारी गुंफण्यात आले . मुख्य वक्ता डॉ. संजय उपाध्य यांनी जिंकलो असे म्हणा या विषयावर श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी अध्यक्ष म्हणून संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल चे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य आयोजक तुषार भारतीय , माजी महापौर चेतना गावंडे प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ. संजय उपाध्ये म्हणाले, ‘जीवन जगत असताना सतत जिंकण्याचा विचार मनात आणा. जो जिंकतो तोच जगण्याची प्रवृत्ती कायम ठेवतो. भूतकाळ बदलता येत नाही, भविष्यकाळ माहिती नाही; त्यामुळे वर्तमानात जगा. प्रत्येक नवीन चूक हे प्रगतीचे लक्षण आहे.

समारोपीय सत्र मध्ये डॉ. उपाध्ये म्हणाले, ’जन्मासह मृत्यू असतो. आपल्या हातात फक्त जगणे असते. त्यामुळे हसतखेळत, सहज जगता आले पाहिजे. शारीरिक व्याधी कोणालाही चुकल्या नाहीत; पण दृष्टिकोन बदलला तर व्याधीदेखील सुसह्य होतात. ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांचा समन्वय साधून उत्तम आयुष्य जगता येते.’ ’नका नका आठवू पुन्हा त्या गतकाळातील खुणा, आजवरी जे जगलो ते मी जिंकलो ऐसे म्हणा,’ या कवितेने त्यांनी निरुपणाचा समारोप केला.तुषार भारतीय मित्र परिवारातर्फे आयोजित तेराव्या अमृत मंथन व्याख्यानमालेचा आज समारोपीय सत्रा मध्ये श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सभागृहाबाहेर सुद्धा उभे राहून व्याख्यानमालेचा आस्वाद घेतला.

व्याख्यानमालेचा प्रारंभ दीप प्रज्वलन व महाराष्ट्र गीताने करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य आयोजक तुषार भारतीय यांनी केले तर संचलन ज्योती चांदुरे आणि आभार प्रदर्शन मंदार नानोटी यांनी मानले. व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी प्रदीप पात्रीकर, राजू भगत, अनुप येवतीकर, विजय देशपांडे, राजेश जगताप, गोपाल दलाल, ज्ञानेश्वर टाले, सौरभ गाडबैल , रेखा भुतडा, लता देशमुख यांनी अथक परिश्रम घेऊन व्याख्यानमाला यशस्वी केली.

# जिल्ह्यात शिवसेनेचे अभिनव आंदोलन हिंदुस्तान- पाकिस्तान मॅचचा निषेध

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा भरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने माझं कुंकू माझं देश असे अभिनव आंदोलन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सौभाग्याचं लेणं कुंकू पाठविण्यात आले.



आज हिंदुस्तान- पाकिस्तान ही मॅच असून या मॅचचा निषेध करून प्रंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागील काही दिवसा अगोदर जम्मू काश्मीर या परिसरात झालेला हल्ला विसरले का आणि तो हल्ला झाल्यानंतर मेरा देश मेरा सिंदूर अशी अभिनव घोषणा करून आता इंडिया पाकिस्तानची मॅच मोदी खेळत खेळवत आहे, याचाच निषेध करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महाराष्ट्र भर आंदोलन केलं जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून अमरावती जिल्ह्यात अमरावती, अंजनगाव, दर्यापूर, चिखलदरा टी पॉइंट अशा विविध ठिकाणी आंदोलन केले गेले. या आंदोलनात असंख्य महिला सहभागी होऊन त्यांनी प्रंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कुंकू पाठवून अनोख्या पद्धतीने निषेध केला. हे आंदोलन अमरावतीमध्ये सह संपर्कप्रमुख प्रतिभा बोपशेट्टी व जिल्हा संघटिका मनीषा टेंबरे यांच्या नेतृत्वात अमरावतीमध्ये तसेच अंजनगाव येथे जिल्हा जिल्हा संघटिका ज्योती अवघड यांचे नेतृत्वात, परतवाड्यामध्ये जिल्हा संघटिका सृष्टी वाघमारे यांचे नेतृत्वात, दर्यापूर मध्ये जिल्हा संघटिका अलका पारडे यांच्या नेतृत्वात करण्यात आले. यावेळेस सर्व शिवसेनेचे पदाधिकारी महिला आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाच्या विरुद्ध घोषणाबाजी करण्यात आली. जय भवानी जय शिवाजी, हिंदुस्तान जिंदाबाद पाकिस्तान मुर्दाबाद अशा प्रचंड घोषणा देण्यात आल्या.

# मोर्शीत एकाचा मृत्यू, दुस-याचा आत्महत्येचा प्रयत्न

## - एक बेपत्ता, नागरिकांत चिंतेचे वातावरण

**मोर्शी/प्रतिनिधीः-** रविवारी (१४ सप्टेंबर) रोजी मोर्शी तालुक्यात तीन गंभीर घटना पुढे आल्या आहेत. अप्पर वर्धा धरणावर एका युवकाने नदीत उडी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला, मोर्शी आठवडी बाजार परिसरात एका वृद्धाचा मृतदेह आढळला, तर माडू नदीत १८ वर्षीय तरुण वाहून गेला. या सलग घटनांमुळे परिसरात भीती व हळहळ व्यक्त होत आहे.

अधिक माहितीनुसार, अप्पर वर्धा धरणावर ३७ वर्षीय जयहरी गुलाबराव निकम (रा. आसोना) यांनी पुलावरून नदीत उडी



घेतली. परिसरातील युवकांनी तत्काळ त्याला बाहेर काढून जीव वाचवला. मात्र, तो बेशुद्ध झाला होता. उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे प्रथमोपचारानंतर त्याला अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेच्या तपासात हा आत्महत्येचा प्रयत्न होता की पोहण्याचा प्रयत्न, याबाबत संभ्रम आहे.

### मोर्शीत ६५ वर्षीय वृद्धाचा मृतदेह आढळला

मोर्शी आठवडी बाजार परिसरात १४ सप्टेंबर रोजी सकाळी मधुकर जाणे (रा. खंबीत बेलोरा) या ६५ वर्षीय वृद्धाचा मृतदेह आढळला. व्यसनाधीनतेमुळे मृत्यू झाला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

### माडू नदीत तरुण वाहून गेला-

खोलवाटपुरा (मोर्शी) येथील १८ वर्षीय कुणाल किशोर बागडे हा शनिवारी मित्रांसह मौजमजेकरिता माडू नदीत उतरला असता पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. रविवारी अमरावती व बैतूल येथील बचाव पथकांनी कसोशीने शोध घेतला; मात्र कुणालचा मागमूस लागला नाही. ही घटना मध्यप्रदेशातील आठनेर पोलीस स्टेशन हद्दीत घडल्याने पुढील तपास तेथील पोलिस करीत आहेत.

# एस.टी.च्या धडकेत व्यापाऱ्याचा मृत्यू

## -शेकापुर शेतशिवारात अपघात

**वरुड/प्रतिनिधीः-** भरधाव एस.टी. बस आणि विरुद्ध दिशेने येणा-या दुचाकीच्या अपघात व्यापा-याचा मृत्यू झाला. १३ सप्टेंबर रोजी रात्री शेकापुर शेतशिवारात झालेल्या या अपघातात वाठोडा (पुनर्वसन) येथील विठ्ठलराव चंपतराव चवडे (५५) यांचा जागीच मृत्यू झाला.

चवडे हे वरुड शहरातील इंदिरा चौकातील माँ शेरावली डूम सप्लायर्स अँड प्लास्टिक आयटम्स दुकानाचे चालक व मालक होते. रोजच्या प्रमाणे त्यांनी सायंकाळी ७.३० वाजता दुकान बंद केले आणि घरी परतण्यास सुरुवात केली. परंतु, नागपूर-वरुड मार्गावरून येणाऱ्या भरधाव एस.टी. (क्र. एमएच २० जीसी ३८८४) ने त्यांची दुचाकी (क्र. एमएच ३१ एएक्स ८७८०) चिरडली. एका क्षणात सर्व काही संपले. अपघात इतका भीषण होता की चवडे यांचा जागीच मृत्यू झाला. घटना पाहून मार्गावरील नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. जमाव वाढल्याचे लक्षात येताच एस.टी. चालकाने बस थेट पोलीस ठाण्यात नेऊन उभी केली. वरुड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व मृतदेह ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला. दरम्यान, बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. या घटनेमुळे चांदस व वाठोडा गावांमध्ये शोककळा पसरली आहे. सोमवारी चवडे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

# रुबाबदार बाबा होणार पिंजराबंद

**वर्धा :** समुद्रपूर तालुक्यात बाबा नामक प्रसिद्ध असलेला वाघ आज पिंजरा बंद करण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न होत आहे. हा वाघ दुसरा तिसरा कोणी नसून चार छाव्याना जन्म देणाऱ्या आणि एक छाव्याचा रस्ता अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वाघाच्या पिल्ल्यांचा बाप आहे, त्याला वनविभागाने अधिकृत नामकरण केले आहे.

‘टीएम-१’ या वाघाला पिंजराबंद करण्याचे आदेश वनविभागाला मिळाले असून चंद्रपूर येथील तज्ज्ञांची टीम समुद्रपूरात दाखल झाली आहे. गेल्या काही दिवसांत या वाघाने तब्बल ९ पाळीव जनावरे ठार केल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वनविभागाचे सुमारे ४० अधिकारी व कर्मचारी सध्या जंगलात वाघाचा शोध घेत असून त्याला बेशुद्धीचे डॉट मारून पिंजराबंद करण्याची तयारी आहे. मुसळधार पावसामुळे मोहिमेत अडचणी येत असल्या तरी वाघ लवकरच ताब्यात घेण्यात येईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# पोलिसांच्या खोट्या गुन्हयाविरोधात बडनेरातील हिंदू युवकांचा ‘एकता मार्च’

**अंजनगाव बारी/ प्रतिनिधीः-** गणपति विसर्जन शोभायात्राचे निमित्त करुण पोलिसानी बडनेरा शहरातील गणपती मंडळावर आपसात वाद केल्याबद्दल अत्यंत खोटा व बिनबुढ़ाचा गुन्हा दाखल केला असा आरोप करीत तसेच काही नियमीत गणपती मंडळ, नवदुर्गादेवीउत्सव मंडळ यांच्या शोभायात्रा मार्ग बदलविन्याचा प्रयत्न पोलिसांमार्फत केला जात होता. या विरोधात बडनेरा शरातील सर्व गणपती मंडळ व गावकऱ्यांनी एकत्र येऊन बडनेरा पोलिस ठाण्यावर मोर्चा काढला.



सविस्तर वृत्त असे की दि. ६/९/२०२५ अंनत चतुर्थी निमित्त बडनेरा शहर नवीवस्ती येथील सर्वच गणपती मंडळ विसर्जन शोभायात्रा काढतात. त्या दरम्यान वीर राणा गणेश उत्सव मंडळ , लड्डा प्लाट, नविवस्ती बडनेरा यांनी आपल्या शोभायात्रा साउंड वर श्री हनुमान चालीसा हे गाने वाजून हनुमान चालीसा गायली. परंतु काही तथाकथित हिंदूउत्सव विरोधी लोकांनी या विरोधात तक्रार करत सर्वच गणपती मंडळाचा मार्ग बदलण्याची अनुचित मागणी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकड़े केल्याची महिति आहे.

त्याचे निमित्त पुढे करत बडनेरा पोलिसानी वीर राणा मंडळाने मागून येणाऱ्या बजरंग गणेशउत्सव मंडळाचा मार्ग रोखुन धरला व वाद केला असा बिनबुढ़ाचा खोटा गुन्हा वीर राणा मंडळावर नोंदवला. त्यामुळे गावात व दोन मंडळात परस्पर अविश्वास व संभ्रमाची स्थिती निर्माण झाली होती. तसेच पोलिसांतर्फे काही गणपती उत्सव, नवदुर्गा उत्सव मंडळाने शोभायात्रा मार्ग बदल करण्याचा प्रयत्न होत आहे ही माहिती बडनेरा नगरवासियाना व मंडळाना मिळताच सर्व गणपती मंडळ, नवदुर्गामंडळ सर्व हिंदू संघटनांनी एकत्र येऊन बडनेरात काल रात्री साय. ८ वाजता मोठ्या संख्यात हिंदूशक्ति एकता मार्च काढला व बडनेरा पोलिस ठाण्यावर धडक दिली होती.

# ॲडिशनल कमिश्नरच्या घरात चोरट्यांचा धाडसी शिरकाव

## २ लाखांहून अधिक मुद्देमाल लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गणेडीवाल लेआऊटमधील निर्मल कलश अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या ॲडिशनल कमिश्नरच्या घरात अज्ञात चोरट्यांनी चोरी करून तब्बल २ लाख ५७ हजारांचा मुद्देमाल उडवला. ही घटना १३ सप्टेंबर रोजी उघडकीस आली.

फिर्यादी रामदास देविदास सिध्दभट्टी (वय ५७), ॲडिशनल कमिश्नर, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती हे वैद्यकीय रजेवर गेल्या महिनाभरापासून पुण्यात मुलाकडे होते. दरम्यान, शेजारी राहणारे अनिल पानोडे यांनी रात्री ८ वाजता फोनवर संपर्क साधत फ्लॅटचा दरवाज्याचा कडी-कोंडा तुटलेला असल्याची माहिती दिली. तातडीने अमरावतीत दाखल झालेल्या सिध्दभट्टी यांनी घर उघडले



असता, आतले सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. बेडरूममधील कपाट उघडे होते तर लोखंडी लॉकर जबरदस्तीने फोडलेला दिसला. तपासणीदरम्यान रोख २ ते २.५ लाख रुपये, अंदाजे ३ हजार रुपयांची नाणी, तसेच काही कपडे, ब्लॅंकेट व शर्ट गायब असल्याचे स्पष्ट झाले. एकूण २ लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला असून, घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# दिनकरराव काटोले यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** दुर्गा विहार निवासी दिनकरराव काटोले यांचे दीर्घ आजाराने वयाच्या ८५ व्या वर्षी दुःखद निधान झाले. मृत्यूपूर्वी महिनाभर त्यांच्यावर दवाखान्यात उपचार सुरू होते.



काल दिनांक १४ सप्टेंबर रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. सायंकाळी हिंदू स्मशान संस्था अमरावती येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत्युपश्चात त्यांच्या मागे पाच मुली, पाच जावई, नातू- नातवंडे आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# मालकी हक्काच्या वादातून थेट बुलडोजर फिरविले

## -दस्तुरनगरात घर जमीनदोस्त -१५ लाखांचे नुकसान, गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** दस्तुरनगरातील एका घराच्या मालकी हक्काच्या वादातून थेट बुलडोजर फिरविण्यात आल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी उघडकीस आली. या धक्कादायक प्रकारात घरमालकाचे तब्बल १५ लाखांचे नुकसान झाले असून, राजापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संजय अर्जुनदास तरडेजा (वय ४४, रा. द्वारकानाथ कॉलनी) हे कपड्याचे व्यापारी असून त्यांचे दस्तुरनगरात जुने घर होते. काही वर्षांपासून या घराच्या मालकीवरून शेजारी



संजयकुमार कल्लुमल मंथान यांच्यासोबत वाद सुरू होता. तरडेजा यांनी नवीन घर घेतल्याने जुने घर रिकामे होते. या घरात अतिक्रमण करणाऱ्यांबाबत तरडेजांनी यापूर्वी पोलिस तसेच तहसील कार्यालयातही तक्रारी केल्या होत्या. दरम्यान १४ सप्टेंबर रोजी संजय तरडेजांना भाच्याचा फोन आला – ‘तुमच्या घरावर बुलडोजर चालवलं जातंय.’ तातडीने घटनास्थळी धाव घेतली असता, बुलडोजर निघून गेला होता; पण त्यांचे घर पूर्णपणे जमीनदोस्त झालेले दिसले. आतली सर्व रचना उद्ध्वस्त झाली होती. अंदाजे १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीने पोलिसांना सांगितले. तरडेजांच्या म्हणण्यानुसार, गैरअर्जदारांनी खोटे कागदपत्र तयार करून घरावर बेकायदेशीर हक्क मिळवण्याचा प्रयत्न केला. अखेर राजापेठ पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली आहे.

# अवैध गोवंश वाहतूक; ३८ जनावरांना जीवनदान

## -स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** गोवंशांची अवैधरित्या कत्तलीसाठी वाहतूक करणाऱ्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली. या धाडसी कारवाईत तब्बल ३८ गोवंश जनावरांना जीवदान मिळाले असून, दहा चाकी ट्रकसह एकूण १९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी गोवंश वाहतूक व कत्तलीला आळा घालण्यासाठी विशेष पथक तयार केले आहे. त्यानुसार १४ सप्टेंबर रोजी पो.उपनिरीक्षक विशाल रोकडे यांना गुप्त माहिती मिळाली की, नांदगाव-खांडेश्वरकडून अमरावतीकडे एका दहा चाकी ट्रकमध्ये जनावरे निर्दयतेने कोंबून नेली जात आहेत. पथकाने चोरमाउली परिसरात नाकाबंदी केली. मात्र, ट्रक चालकाने थांबण्याऐवजी थेट पोलिसांच्या सरजंटला धडक देत पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी शौर्य दाखवत ट्रकचा पाठलाग करून तो थांबवला. तपासात चालक आमिर अली दाउद अली (वय २९) व त्याचा साथीदार मोहम्मद रिजवान मोहम्मद मुस्तफा (वय ४०), दोघे रा. वंदेई नगर, नागपूर हे अवैध वाहतुकीत गुंतलेले असल्याचे समोर आले. तपासणीदरम्यान

### -ट्रकसह १९ लाखांचा मुद्देमाल जप्त

ट्रकमध्ये ३८ गोवंशीय जनावरे आढळली. या जनावरांची किंमत सुमारे ४ लाख रुपये, तर ट्रकसह एकूण १५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अशा प्रकारे एकूण १९ लाख रुपयांचा माल जप्त करून जनावरांना जीवदान देण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उपनिरीक्षक विशाल रोकडे, अंमलदार संतोष तेलंग, दीपक पाल, राजेश कासोटे, दीपक पाटील, मारोती वैद्य व चालक किशोर सुने यांनी केली.